# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | १९९८ |
| वर्ष | : | तिसरे |
| अंक | : | ४ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : २४**

विद्या प्रसारक मंडळाचे
मासिक
# दिशा
वर्ष तिसरे / अंक ४ / ऑक्टोबर १९९८

## संपादकीय

### अमेरिकेचे दुटप्पी विज्ञान धोरण

मे १९९८ मध्ये भारताने केलेल्या अणुचाचण्यांमूळे भुगर्भात जेवढे हादरे बसले नाहीत. तेवढे हादरे या चाचण्यांमुळे जगातील काही देशांना बसले.

जगामध्ये शांतता प्रस्थापित करणे, मानवअधिकारांचे उल्लंघन होत नाही ना यावर पाळत ठेवणे, अण्वस्त्रांचा प्रसार थांबवणे याची जबाबदारी अमेरिकेने आपल्या डोक्यावर घेतललेली दिसते. वर वर बघता हे कार्य जरी मानवतावादी वाटले तरी वस्तुस्थिती निराळीच आहे. खरे म्हणजे हे कार्य 'युनायटेड नेशन्स' या सर्व राष्ट्रांच्या संघटनेकडे सोपविले गेले आहे.

गेल्या शंभर वर्षांचा इतिहास बघता पारंपरिक आणि अणुविज्ञानावर आधारीत अस्त्रांची निर्मिती व विक्री अमेरिका, रशिया, चीन, फ्रान्स आणि इंग्लंड या आजच्या अण्वस्त्रसज्ज राष्ट्रांनी सर्वात आधी केली आहे. जगातील सर्व नियम व संकेत धाब्यावर बसवून केवळ 'व्यापारी' व 'आर्थीक फायदा' हा दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेऊन या राष्ट्रांनी अनेक 'आततायी' संघटना व राष्ट्रांतर्गत 'फुटीर' गटांना शस्त्रे पुरविली आहेत. या सर्व गोष्टी उघड असतानाही जणू आपण त्यातले नाहीच असा निर्लज्ज आविर्भाव आणत ही सर्व राष्ट्रे आता भारताला शांततेचे डोस पाजत आहेत.

काही लैंगिक रोगांवरील औषधांच्या चाचण्याकरिता, तसेच अणुविज्ञानाच्या संदर्भात मानवी शरीरांवर काय परिणाम होतात या करिता प्राण्यांवर प्रयोग केले जातात. अमेरिकमध्ये असे प्रयोग काळ्या स्वयंसेवकांवर केल्याचे आता सिद्ध झाले आहे. इतक्या मोठ्या अमानुषपणाचे उदाहरण जगात दुसरे कोठलेच मिळणार नाही. C.I.A. या अमेरिकेच्या गुप्त संघटनेने अनेक राष्ट्रांच्या अध्यक्ष व प्रमुखांचे खून घडवुन आणल्याचे किंवा तसे अयशस्वी प्रयत्न केल्याचे देखील आता उघड झाले आहे. जगातील पहिला अणुबॉम्बस्फोट हिरोशिमा व नागासाकीवर अमेरिकेनेच केला. व्हिएतनाम युद्धामध्ये जैविक व रासायनिक अस्त्रांचा वापर अमेरिकेने केल्याचे आता उघडकीस आले आहे. हा सगळा इतिहास ज्ञात असतानाही अमेरिकेने आज मानवतावाद, आणि अण्वस्त्रप्रसार रोखण्याची जबाबदारी आपल्या डोक्यावर आहे असा बेगडी आव आणला आहे, अमेरिकेने भारतावर आज अनेक आर्थिक निर्बंध लादले आहेत. अमेरिकेचा ढोंगी व दुटप्पीपणा येथेच थांबत नाही. विज्ञानाला जशी जात,पात, धर्म, व राष्ट्रीय सीमा नसतात, तशीच त्या वैज्ञानिकालाही असू नये या विचाराबद्दल कोणाचेच दुमत होण्याचे कारण नाही. आज जगामध्ये राष्ट्राराष्ट्रांमध्ये अनेक वाद कारणांवरून आहेत. विज्ञानाच्या अनेक शाखा असुन त्यांच्या जागतिक संघटनाही आहेत. या संघटनेचे सभासद, कोठल्याही वैज्ञानिकाला किंवा राष्ट्राला होता येते. या संघटनाच्या सभा

कोठल्याही देशात होऊ शकतात. अशा एखाद्या संघटनेची सभा भारतात झाली तर, तर भारतपाक अथवा भारतचीन यांचे संबंध कसेही असले तरी या देशांच्या वैज्ञानिकांना भारत प्रवेश नाकारू शकत नाही. हाच नियम जगामध्ये अशी सम्मेलने घेणाऱ्या सर्व राष्ट्रांना लागू आहे. उठता बसता मानवी अधिकाराच्या गप्पा मारणाऱ्या अमेरिकेला मात्र हा नियम लागू नाही असे दिसते. आर्थिक निर्बंधाबरोबरच अमेरिकेने भारतीय वैज्ञानिकांच्या मुक्त प्रवेशावर बंदी टाकली आहे. या संदर्भात असलेले जागतिक संघटनांचे सर्व नियम व संकेत अमेरिकेने धाब्यावर बसविले आहेत.

आर. चिदंबरम् हे आपल्या अटॉमिक एनर्जी कमिशनचे अध्यक्ष आहेत. १५ ते १७ जुलै या कालावधीत International Union of Crystallgraphy या जागतिक वैज्ञानिक संघटनेची अर्लीग्टन, अमेरिका येथे परिषद होती. या आंतरराष्ट्रीय संघटनेच्या कार्यकारी मंडळाचे ते उपाध्यक्ष आहेत. रीतिप्रमाणे श्रीयुत चिदंबरम् यांनी अमेरिकेच्या मुंबईतील दुतावासाकडे प्रवेशपरवान्या करीता अर्ज केला. चिदंबरम् यांचे पारपत्र (Passport) हे राजदूत श्रेणीतले आहे. सर्व साधारणपणे अशा व्यक्तिंना प्रवेश परवाना हा तात्काळ देण्यात येतो. चिदंबरम् यांना तोंडी कळविण्यात आले की पोखरण येथील अणुचाचणीच्या पार्श्वभूमीमुळे दुतावासाला अमेरिकेतील वरीष्ठांकडे चौकशी करूनच निर्णय देता येईल. चिदंबरम् यांचे कागदपत्र शुल्कासकट त्यांना परत करण्यांत आले. तांत्रिक दृष्ट्या परवाना नाकारला गेला नव्हता. चिदंबरम् यांनीच आपले कागदपत्र परत घेतले असे दाखविण्यात आले. ही शुद्ध फसवणुक होती. चिदंबरम् हे अमेरीकन सरकारनी योजलेल्या किंवा त्यांच्या राष्ट्रीय विज्ञान संस्थेच्या परिषदेला जात नव्हते. एका आंतरराष्ट्रीय संस्थेच्या परिषदेला की ज्याचे ते एक पदाधीकारीही आहेत, उपस्थित राहयला जात होते.

कृष्णलाल हे नॅशनल फिजीकल लॅबोरेटीचे एक वैज्ञानिक, अणुविज्ञानाशी त्यांचा तसा काडीमात्र संबंध नाही. चिदंबरम् ज्या परिषदेला जात होते त्याच आंतर्रराष्ट्रीय Crystallagraphy परीषदेचे कृष्णलाल हे सभासद. १९९९ साली आंतरराष्ट्रीय स्तरावर होणाऱ्या जागतिक परीषदेची पूर्वतयारी करण्याकरिता या सभा आयोजित केल्या होत्या. कृष्णलाल यांनी आपल्या प्रवेशाकरिता परराष्ट्रमंत्रालया तर्फे नवी दिल्ली येथील अमेरिकन दूतावासाकडे अर्ज केला. तांत्रीक दृष्ट्या तो न नाकारता अशीच कारणे देऊन त्यांना तो परत देण्यात आला. जी. एम्. देशीराजू हैद्राबाद विद्यापीठातील रसायनशास्त्राचे एक प्राध्यापक, अमेरिकेतील याच परिषदेकरता जाण्याकरिता, त्यांचे सर्व साधारण पारपत्र चेन्नई येथील अमेरिकन दूतावासाकडे दिले. त्यांना प्रवेश देण्यात आला. इंदिरा गांधी सेंटर ऑफ ॲटोमिक रिसर्च, कल्पकम (IGCAR), टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च, मुंबई (TIFR) व Institute of Physics, भुवनेश्वर, या 'संस्थांमधील वैज्ञानिकांनाही अमेरिकेमध्ये प्रवेश नाकारण्यात आला. TIFR च्या मोहीत रंधरीया यांचे प्रकरण मजेशीर आहे. हे अमेरिकेमधील Argonne National Laboratory ला भेट द्यावयास जात होते. ते स्वतः त्या संस्थेमध्ये ८ वर्षे होते. ते अमेरिकेचे ग्रीन कार्ड होल्डर आहेत. ग्रीन कार्ड धारकाला अमेरिकेत प्रवेश परवान्याची गरज लागत नाही. त्यांना सांगण्यात आले की ANL मध्ये ते काम करू शकणार नाहीत. त्यांना हवे असल्यास त्यांनी विद्यापीठात थांबावे व ANL चे वैज्ञानिक त्यांना तेथे येऊन भेटतील. ज्या संस्थेमध्ये स्वतः काम केले त्या संस्थेमध्ये प्रवेश नाकारण्याइतकी दुसरी अपमानास्पद गोष्ट नाही. मोहीत रंधेरीया यांनी न जाणे पसंत केले.पुढील गोष्ट याहीपेक्षा मजेशीर आहे. एस्.एम्. चित्रे हे NASA चे ज्येष्ठ खगोल शास्त्रज्ञ . ते अमेरिकेतच होते व त्यांच्या अमेरीकेतील कार्यक्रमामध्ये NASA या जगप्रसिद्ध संस्थेमध्ये त्यांना भाषण द्यावयाचे होते, पण अमेरिकेतच त्यांना कळविण्यात आले की NASA मध्ये त्यांना प्रवेश देता येणार नाही, व म्हणून त्यांचे भाषण रद्द करण्यात आले.

दक्षिण आफ्रिकेतील वंशवादी सरकार जेव्हा अस्तित्वात होते तेव्हा युनोने ठराव करून दक्षिण अफ्रिका व तेथील विज्ञानसंस्था व वैज्ञानिकांच्या हालचालींवर

(मलपृष्ठ ३ वर)




# दिशा

वर्ष तिसरे / अंक ४ / ऑक्टोबर १९९८

**संपादक**
डॉ. विजय वा. बेडेकर

**सहसंपादक**
श्री. प्रकाश ल. वैद्य

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ,
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२.

**वार्षिक देणगी**
रु. २०० / -

**मुद्रक :**
परफेक्ट प्रिण्ट्स,
२२, ज्योती इंडस्ट्रियल इस्टेट,
नूरीबाबा दर्गा रोड,
ठाणे - ४०० ६०१.

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. विजय वा. बेडेकर | मुखपृष्ठ |
| २) | सुभाषित | प्रा.(डॉ) मोरेश्वर दि. पराडकर | ३ |
| ३) | भारतीय मूर्तीशिल्प(१) | डॉ. र.पु. कुलकर्णी | ५ |
| ४) | रघुदिग्वीजय : इतिहास आणि राजनीतिशास्त्र यांचा समन्वय | डॉ. सौ. मंजुषा गोखले | ११ |
| ५) | 'अमर्त्यसेनच्या निमित्ताने' | श्री. यशवंत साने | २२ |
| ६) | अमर्त्य कुमार सेन - अर्थशास्त्राचा मानवी चेहरा | डॉ. अशोक धोपेश्वरकर | २७ |
| ७) | ग्रंथांच्या वाढत्या किंमती : महिती उपलब्ध होण्यातील अडसर | प्रा. मोहन पाठक | २९ |
| ८) | महाविद्यालयीन वार्ता | प्रा. मोहन पाठक | ३३ |

# लेखक - परिचय

१. ***डॉ. विजय वा. बेडेकर***

वैद्यक व्यावसायिक, अनेक शैक्षणिक, सांस्कृतिक आणि सामाजिक संस्था आणि चळवळींशी निगडित, अध्यक्ष - प्राच्यविद्या अभ्यास संस्था, भारत सहकारी बँक, सत्य शोध संस्था; अनेक परिसंवादांचे संयोजन, संशोधनपर लिखाण, *शोध अंधश्रध्देचा* या पुस्तकाचे लेखक.

२. ***प्रा. (डॉ) मोरेश्वर दि. पराडकर***

संस्कृत आणि हिंदी भाषेचे पंडित, अनेक वर्षे संस्कृतचे अध्यापन; आणि प्राचार्य म्हणून पेंढारकर कॉलेज, डोंबिवली मधूननिवृत्त. बंबई हिंदी विद्यापीठाचे मानद कुलपती; संस्कृत,इंग्रजी, हिंदी आणि मराठी मधून विपुल संशोधनपर लिखाण. स्तबक या पुस्तकाचे लेखक.

३. ***श्री. रघुनाथ पु. कुलकर्णी***

अभियंता म्हणून शासकीय सेवेतून निवृत्त. प्राचीन भारतीय शिल्पशास्त्राचा विशेष अभ्यास व संशोधन. अभियांत्रिकी संशोधन पत्रिकांतून अनेक संशोधनपर लेख प्रसिद्ध. *काश्यपसंहिता* या शिल्पशास्त्रावरील संस्कृत ग्रंथाचे मराठीत भाषांतर. प्राचीन वास्तुशास्त्रावर हिंदी, मराठी व इंग्रजीत ग्रंथरचना.

४. ***डॉ. (सौ.) मंजुषा गोखले***

संस्कृत प्राध्यापक, अनेक शोध निबंध प्रकाशित

५. ***श्री. यशवंत साने***

पोर्ट ट्रस्ट मधून निवृत्त, विविध सामाजिक, राजकिय व आध्यात्मिक विषयांवर लिखाण.

६. ***डॉ. अशोक घोपेश्वरकर***

जोशी बेडेकर कला वाणिज्य महाविद्यालयात अर्थशास्त्राचे अध्यापन. अर्थशास्त्रामध्ये मुंबई विद्यापिठाची Phd. पदवी. अर्थशास्त्राचा गाढा व्यासंग व चिंतन.

७. ***प्रा. मोहन पाठक***

गेली २०-२२ वर्षे वि.प्र. मंडळाच्या बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या ग्रंथालयात सेवा, मराठी व ग्रंथपालन शास्त्राचे गेली १६ वर्षे अध्यापन. मुंबईच्या साहित्य संघातून 'साहित्य विशारद' ही पदवी प्राप्त. १९७५ पासून सातत्याने अनेक नियतकालिकांतून विविध विषयांवर विपुल लेखन. ठाण्यातील साहित्यिक, सामाजिक, सांस्कृतिक संस्थांशी घनिष्ठ संबंध.

# सुभाषित

गवीशपत्रो नगजार्तिहारी कुमारतातः शशिखण्डमौलिः ।
लङ्केशसम्पूजितपादपद्मः पायादनादिः परमेश्वरो नः ॥ १ ॥

रत्नैर्महार्हैस्तुतुषुर्नदेवाः न भेजिरे भीमविषेण भीतिम् ।
सुधां विना न प्रययुर्विरामं न निश्चितार्थाद् विरमन्ति धीराः ॥२॥

यद्यपि बद्धः शैलैर्यद्यपि गिरिमथनमुषितसर्वस्वः ।
तदपि परभीतभूधररक्षायां दीक्षितो जलधिः ॥३॥

कन्दुको भित्तिनिक्षिप्त इव प्रतिफलन् मुहुः ।
आपतत्यात्मनि प्रायो दोषोऽन्यस्य चिकीर्षितः ॥ ४ ॥

सुप्राकृतोऽपि पुरुषः सर्वं स्त्रीजनसंसदि ।
स्तौति गर्वायते चापि स्वमात्मानं न संशयः ॥५॥

## डॉ. मो. दि. पराडकर

या वेळेस सुभाषितांची सुरवात जाणून बूजून परमेश्वराच्या स्तुतीने केली कारण त्याने रक्षण केल्यामुळे ही सुभाषितांची माला चालू राहिलेली आहे आणि त्याने प्रेरणा दिली तर ही चालू राहील असा विश्वास आहे. 'अनादिः परमेश्वरो नः पायद् 'म्हणजे ज्याचा आरंभ माहीत नाही तो परमेश्वर आमचे रक्षण करो. परमेश्वर हे साधारणपणे शंकराला उद्देशून वापरतात. श्लोकाच्या उरलेल्या अंशात या शंकराची विशेषणे आहेत. १) गवीश पत्रः गवीश गो+ईश म्हणजे नंदी हे प्रसिद्धच आहे. शंकराच्या देवळासमोर नंदीची मूर्ती असते. किंबहुना नंदीला नमस्कार करून शंकराच्या देवळात प्रवेश करण्याची प्रथा आहे. २) नगजार्तिहारी नगजा म्हणजे पर्वताची कन्या (नगात् जायते इति) पार्वती तिची आर्ति म्हणजे पीडा दूर करणारा. ३) कुमारतातः कुमारस्य नाम कार्तिकेयस्य तातः म्हणजे पिता हे प्रसिद्धच आहे. ४) शशिखण्डमौलिः शशिखण्डं म्हणजे चंद्राची कोर मौलौ नाम शिरसि यस्य सः शंकराच्या डोक्यावर चंद्राची कोर असते. ५) लङ्केश म्हणजे लङ्काधिपती (लङ्केश्वर म्हणून शंकराचा उल्लेख दूरचित्रवाणीवरील 'ॐ नमः शिवाय' मध्ये होत असतो.) ज्याच्या चरणकमलांचे (पादपद्म) पूजन केले तो. शंकर हा शिवभक्त , याने केलेली शिवस्तुती प्रसिद्ध आहे. असा हा अनादि परमेश्वर आमचे रक्षण करो. अशी ही प्रार्थना एका हरदासाने म्हणजे शिवभक्ताने कीर्तनात केली. कीर्तन हे नारदपीठ आणि नारद तर विष्णुभक्त म्हणून प्रसिद्ध. शैव आणि वैष्णव यांचे अमत नाही हे माहीत असूनही कीर्तनकाराने हे धाडस केले आणि विठ्ठलभक्तांनाही खूश करून टाकले. ही खुबी संस्कृतच्या लवचिकतेची किंवा संस्कृतमध्ये असणाऱ्या श्लिष्ट शब्दांच्या उपयोग करणाऱ्या कीर्तनकाराच्या प्रतिभेची. 'अनादिः परमेश्वरः' यात ही खुबी आहे. आरंभीचे अक्षर नसलेला परमेश्वर हा रमेश्वर म्हणजे रमेचा, लक्ष्मीचा पति अर्थात् विष्णूच होतो. तो आमचे रक्षण करो हा अर्थ संस्कृतज्ञ विठ्ठलभक्तांनी घेतला. पहिले अक्षर वगळण्याची ही किल्ली सर्व विशेषणात वापरावयाची. (१) 'ग' हे अक्षर गाळले तर 'वीशपत्र' हा शब्द तयार होतो. वि म्हणजे पक्षी वीश म्हणजे पक्षिराज गरूड, गरुड हे विष्णूचे पत्र म्हणजे वाहन. (२) 'न' गाळून 'गजार्तिहारी' हे विशेषण गजेन्द्रमोक्ष करणाऱ्या विष्णूचे, त्यानेच सुसरीने पाय धरून ठेवलेल्या हत्तीची पीडा नाहीशी केली. (३) 'कु' हे अक्षर गाळले की मार म्हणजे प्रद्युम्न (मदनो मन्मथो मार :...इत्यमरः) त्याचा पिता हा श्रीकृष्ण म्हणजे विष्णु (४) 'श' अक्षर गाळले तर 'शिखण्ड मौलिः' म्हणजे मस्तकावर शिखण्ड किंवा तुरा धारण करणारा, कृष्णावतारात विष्णूच्या डोक्यावर तुरा होताच ना ! (५) 'लं' हे अक्षर काढून टाकले तर विष्णू 'केशसंपूजितपादपद्मः' होतो. क म्हणजे ब्रह्मदेव, ईश-म्हणजे शंकर या दोघांनी ज्याच्या चरणकमलांनी पूजा केली तो रमापति विष्णु 'नः पायात्'. थोडक्यात संस्कृतज्ञ कीर्तनकाराच्या म्हणजे पर्यायाने या सुभाषितकाराच्या श्लिष्ट शब्दप्रयोगामुळे शैव आणि वैष्णव दोघेही संतुष्ट झाले; एकाने शंकराची स्तुती मानून विष्णूच्या स्तुतिपर अर्थाकडे दुर्लक्ष केले तर दुसऱ्याने विष्णूची प्रशंसा मानून शंकराच्या स्तुतीकडे लक्ष दिले नाही.

२) या श्लोकात समुद्रमंथनाच्या पुराणांत गाजलेल्या कथेकडे संकेत आहे. देवांनी आणि दानवांनी मंदर पर्वताकडून मंथनदंडाचे काम करण्याची अनुमती मिळवली आणि वासुकी हा सर्पराजही दोरी (दोरच तो) व्हायला राजी झाला. प्रचंड सागर घुसळण्याचे काम सुरु झाले. 'लक्ष्मीः, कौस्तुभ, पारिजातक, सुरा...यांत नमूद केलेली अनमोल

रत्ने मिळाली. एकेका रत्नाचे वर्णन करणे सोपे नाही तरीही संतुष्ट झाले नाहीत (न तुतुषुः); नंतर 'भीमविष' म्हणजे भयंकर विष असणारे हालाहाल भयंकर उष्णतेतून निर्माण झाले त्याच्या दाहक विखाऱ्याने सम्पूर्ण विश्व जळून जाण्याचा धोका निर्माण झाला परंतू अमृतसिद्धी हे लक्ष्य हस्तगत झाले नव्हते म्हणून देव विषाचे चटके सोशीतच राहिले. जगाच्या कल्याणासाठी भगवान शंकराने ते विष पिऊन टाकले; तो स्वतः 'नीलकण्ठ' झाला पण देव आणि दानव दोघेही वाचले. अर्थात् देवांचा निर्धार अमृतप्राप्ती शिवाय म्हणजे 'सुधां विना' विश्रांती घेण्याचा नव्हताच. इतक्या कष्टांचे फळ म्हणून साक्षात् धन्वंतरी अमृतकुम्भ घेऊन बाहेर आले. श्रमांचे चीज झाले. दानव इतके होई पर्यंत थांबावयाला तयार नव्हते परंतु त्यांनाही अमृत हवे होते म्हणून ते देवांबरोबर राहिले. म्हणून देवांच्या दृढनिर्धाराची प्रशंसा 'न निश्चितार्थाद् विरमन्ति धीराः ' म्हणजे खंबीर वृत्तीचे लोक ठरवलेली गोष्ट करण्यापासून परावृत्त होत नाहीत. कितीहि अडचणी आल्या तरी त्यांचा प्रयत्न ध्येयसिद्धीपर्यंत अविरत चालू रहातो. हालाहल ही आपत्तीच होती; परंतु या आधीची देखणी रत्ने मिळाल्यावरही त्यांनी थांबणे पसंत केले नाही; ते मोहाला बळी पडले नाहीत, अडचणींनी खचले नाहीत. म्हणूनच त्यांना अमृत मिळाले व ते 'अमर' झाले. हा 'बोध आहे खरा' हे सुभाषित वाचतांना लॉंग फेलो या अमेरिकन कवीच्या चार ओळींची आठवण होते.

Heights by great men reached and kept
Were not attained by sudden flight
But they while their companions lept
Were toiling upward in the night

३) शरणागत शत्रूलाही अभय द्यावे असे संस्कृती सांगते. लाकुडतोड्यालाही छाया देणारा वृक्ष हा आमचा आदर्श. परंतु या सुभाषितात सागराच्या विस्मयकारक औदार्याची गोष्ट सुभाषितकाराने सांगितली. ह्या सुभाषिताचा अर्थ समजण्यासाठी मात्र पूर्वी प्रचंड पर्वतांना पंख होते आणि ते इच्छेनुसार उडून कोठेही जाऊन बसत; त्यामुळे ऋषींचे आश्रम पर्वताखाली गडप होण्याचा जसा धोका उत्पन्न झाला तसे सर्व प्राणिमात्रांना भय वाटू लागले हे लक्षात घेऊन प्रतापी इन्द्राने या पर्वतांचे पंख वज्राने कापण्यास सुरवात केली ही कथा पुराणात आली हे माहीत हवे. यामुळेच 'पर्वतपक्षशातनः' असे नाव इंद्राला मिळाले. परंतु मैनाकासारखे काही हुशार पर्वत इन्द्राच्या या मोहिमेतून निसटले आणि त्यांनी सागराचा आश्रय घेतला. 'यद्यपि वद्धःशैलेः ' या शब्दात याकडे इशारा आहे. या पर्वतांपैकी मंदर पर्वताने रवी होण्याचे कबूल करून सागराला घुसळण्याच्या कामात देव-दानवांना मदत केली. सागर घुसळण्याचा परिणाम म्हणजे सर्व रत्ने बाहेर काढून रत्नाकराला नागवण्याचाच प्रकार. यात मंदर पर्वताचा स्वतःचा फायदा काहीच नव्हता तरी ही या 'गिरि' ने म्हणजे पर्वताने मंथनात भाग घेतला. म्हणूनच समुद्राला 'गिरीमथनेन मुपति सर्वस्वं यस्य सः' असे म्हटले. म्हणजे पर्वतांनी बांधले आणि पर्वताने मंथन करून सर्वस्व लुबाडण्यास मदत केली तरीही पंख कापण्याच्या इन्द्राच्या मोहिमेला घाबरून मदतीसाठी धाव घेणाऱ्या 'मैनाक' भूधराला म्हणजे पर्वताला आश्रय देण्याबाबत 'जलधी' ने काचकूच केली नाही; कारण त्याने घाबरलेल्या पर्वतांचे रक्षण करण्याची दीक्षा आपणहून घेतली होती. ही झाली पुराणाची कथा परंतु सर्व वैर विसरून शरणागताचे प्राणपणाने रक्षण करणारे महात्मे सुभाषितकाराला अभिप्रेत असावेत; त्यांचेच अवघ्या दोन ओळीत, सागराचे उदाहरण घेऊन त्याने वर्णन केले असे म्हटले पाहिजे.

४) या श्लोकात व्यवहारातल्या चेण्डूचे उदाहरण घेऊन 'इच्छी परा ते येई घरा' हे मर्म खुबीने सांगितले. भित्तिनिक्षिप्तः म्हणजे भिंतीवर पुन्हा पुन्हा (मुहुः) म्हणजे आपटलेला चेण्डू पुन्हा उसळी घेऊन आपल्याकडेच येत (प्रतिफलन) असतो. त्याचप्रमाणे 'अन्यस्य' म्हणजे दुसऱ्याचे अनिष्ट करू इच्छिणाऱ्याला स्वतःलाच (आत्मानि) साधारणपणे ते अनिष्ट भोगावे लागते. दुसऱ्यासाठी खणलेल्या खड्ड्यात माणूस स्वतःच पडतो. दुष्टांच्या अनुभवाला पुष्कळवेळा हे येते. पूतनेने विश्वमोहक रूप घेऊन कृष्णाला मांडीवर घेतले आणि आपला विषदिग्ध स्तन त्याच्या मुखात त्याला मारण्यासाठी (म्हणजे

(पान क्र. २१ वर)

# भारतीय मूर्तिशिल्प(१)

डॉ. र. पु. कुलकर्णी

भारतीयांनी बांधलेली उत्तुंग, सौंदर्यशास्त्रदृष्ट्या अत्यंत सुरुचिपूर्ण व भव्य देवालये जशी जगप्रसिद्ध आहेत; तशीच भारतीयांनी निर्मिलेली सुंदर मूर्तिशिल्पे देखील जगविख्यात आहेत. भारतीय मूर्तिशिल्पाचे वैशिष्ट्य म्हणजे त्या मूर्तींच्या चेहऱ्यावरील असलेला सात्त्विक व राजस भाव. देवमूर्ती स्मितहास्य करणारी असावी असा नियमच मुळी मूर्तिशिल्पशास्त्रींनी घालून दिलेला आहे. त्यामुळे अगदी वैवस्वान म्हणजे यमाची मूर्ती देखील क्रूर दाखवली जात नाही. नृसिंहरूपी विष्णूची मूर्ती शौर्य, वीर्य यांचे प्रतीक म्हणून दिसते. हिरण्यकशिपूचे पोट फाडून आतडे बाहेर काढलेले आहे अशा या मूर्तीत देखील बीभत्स, अक्राळविक्राळ पणा किंवा तत्सम भाव दिसून येत नाही. भक्ताला धीर देणारी, पराक्रमी, उद्यत आयुधांची तरीही शांत भाव असलेली देवमूर्ती उत्तम समजतात.

'दिशा' मासिकाच्या मागील अंकांत भारतीय मंदिरशिल्पाविषयी माहिती देण्यात आली होती. आता भारतीय शिल्पाबद्दल थोडक्यांत तोंडओळख देण्यात येत आहे.

शिल्पशास्त्रविषयक पुस्तकांत साधारणतः देवालयांचे प्रकार, त्यांची मापे, त्यांच्यावरील अनेकानेक प्रकारची नक्षी वगैरेंची माहिती असतेच, परंतु पुन्हा मूर्तीशिल्पाबद्दल देखील माहिती दिलेली असते. दक्षिण भारतीय शैलीच्या देवालयांची माहिती देणाऱ्या शिल्पशास्त्राच्या पुस्तकांमध्ये काश्यपशिल्प, मानससार, शिल्परत्न वगैरे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. या प्रत्येक ग्रंथात प्रथम देवालयांची माहिती देऊन त्यांच्या अनुषंगाने येणारे मंडप, देवालयाभोवती असलेल्या एक किंवा अनेक तटांच्या भिंती, त्यांच्यातून प्रवेश करण्यासाठी असलेली उत्तुंग प्रकारची गोपुरे यांचीही माहिती दिलेली असते. त्यानंतर मुख्य देवालयामध्ये जी देवमूर्ती पूजेसाठी स्थापन करतात तिची माहिती देतात. नुसती देवालयाची माहिती तिच्यातील देवमूर्तीच्या माहिती शिवाय देणे म्हणजे प्रिन्स ऑफ डेन्मार्क शिवाय हॅम्लेट नाटक किंवा रामाशिवाय रामायण ! यासाठी जे शिल्पशास्त्राचे ग्रंथ देवालयांच्या निर्मिती विषयक माहिती देतात ते देवमूर्ती कशी घडवावी त्याची देखील माहिती देतात. याशिवाय या मुख्य देवमूर्तीच्या मंदिराभोवती तिच्या परिवारदेवतांची लहान लहान देवालये असतात. त्यांची संख्या आठपासून बत्तीसपर्यंत वाढू शकते. तेव्हा या परिवारदेवतांची देखील माहिती या शिल्पशास्त्रविषयक ग्रंथांत असते. ग्रंथातील विषयाच्या परिपूर्णतेसाठी ही माहिती आवश्यकच असतते. यातील परिवारदेवतांची जरी नुसती लक्षणेच दिलेली असतात तरी खुद्द मुख्य देवालयात जी मूर्ती स्थापावयाची तिची संपूर्ण मापे देखील देतात. ब्रह्मा, विष्णू, शिव यांच्या मूर्ती १२४ अंगुळे उंचीच्या करतात; पार्वती, लक्ष्मी, सरस्वती वगैरे देवींच्या मूर्तींची उंची १२० अंगुळे असते. ही झाली मूर्तीची उंची. परंतु मूर्तीचा चेहरा, नाक, कान, डोळे, केस तसेच खांदे, छाती, पोट, कंबर, मांड्या, पोटऱ्या, पावले, हात, हातांची बोटे वगैरेंच्या लांबी, रुंदी, जाडींची मापे देतात. मूर्ती काठीसारखी सरळसोट उभी असावी की तिला थोडासा, काहीसा जास्त किंवा बराच असा बाक असावा इत्यादी माहितीही दिलेली असते. शंकराची नृत्यमूर्ती काठीसारखी सरळसोट कशी असणार, तिला तीन ठिकाणी बाक दिलेला असतो. देवाची मूर्ती सुंदर प्रमाणबद्ध दिसण्यासाठी कलाकाराला ज्या मापाच्या व इतर प्रकारच्या क्लृप्त्या माहिती असाव्या लागतात त्यांचा परिचयही येथे दिलेला असतो.

येथे लक्षात ठेवण्याची आणखी गोष्ट म्हणजे मूर्तीचा सारखेपणा. बहुतेक पुस्तकांत, निदान वर उल्लेखिलेल्या तिन्ही ग्रंथांत मूर्तीच्या अंगोपांगांची तिच्या मापांची व निरनिराळ्या अवयवांची ठेवण कशी असावी, तिच्या निरनिराळ्या हातांत कोणती आयुधे असावीत

याबद्दलची माहिती प्रामुख्याने शंकराच्या मूर्तीबद्दल दिली आहे. विष्णुमूर्तीबद्दलची अशी माहिती काही आगम ग्रंथांत आहे पण तसे ग्रंथ थोडे. परंतु तसे पाहता मूर्ती शंकराची असो की विष्णूची, तिच्या अवयवांची मापे सारखीच असणार फरक असलाच तर बाह्य स्वरूपाबद्दल.

शंकराच्या मूर्तीत तिच्या मस्तकावरील जटाजूट मुकुटाप्रमाणे रचलेला असतो तर विष्णूच्या डोक्यावर नेहमीच किरीट प्रकारचा मुकुट असतो. हातात धारण केलेली शस्त्रे वेगळी असतात. तेव्हा या काहीशा बाह्य फरकाकडे लक्ष दिले तर जो शिल्पी शंकराची मूर्ती तयार करतो त्याला याच माहितीच्या आधारावर विष्णुमूर्ती घडविणे अवघड नाही. लक्ष्मी आणि पार्वती यांच्या मूर्ती सारख्याच असतात. मात्र लक्ष्मी विष्णूजवळ तर पार्वती अथवा गौरी शंकराजवळ उभी असते. हातांतील आयुधांत थोडा फरक असेल तेव्हढाच . किंबहुना काही वेळाला मूर्ती हुबेहूब सारख्याच घडविलेल्या असतात. फक्त त्यांच्या हातांतील आयुधे व त्यांची वाहने यामुळेच त्यांची ओळख पटते. सप्तमातांमध्ये ब्राह्मी, वैष्णवी, माहेश्वरी, कौमारी, इंद्राणी, वाराही, वारसिंही यांच्या मूर्ती सारख्याच असतात. फक्त ब्राह्मीच्या हातात पोथी, कमंडलू, स्रुक, स्रुव या आहुती देतांना वापरावयाच्या पळ्या असतात तर माहेश्वरीच्या हातात त्रिशूळ असतो; वैष्णवी शंख, चक्र, गदा धारण केलेली असते तर इंद्राणीच्या हाती वज्र असते. त्याशिवाय ब्राह्मीच्या मूर्तीच्या खाली तिचे वाहन हंस दाखविलेला असतो. तसेच वैष्णवी वगैरेंची गरुड, मोर, ऐरावत हत्ती अशी वाहने दाखविलेली असतात. या वाहनांवरून ती ती मूर्ती कोणत्या मातेची आहे याची कल्पना येते. नाही तर मूर्तींची एकूण मापे, निरनिराळ्या अवयवांची मापे, त्यांची ठेवण, वस्त्रे व अलंकार एक सारखीच असतात. तेव्हां पार्वतीची मापे दिली म्हणजे इतर देवतांच्या मूर्तींची मापे सांगितल्यासारखी होतात.

काश्यपशिल्प हा शिल्पीजनांत बराच मान्यता पावलेला व त्यातल्या त्यात प्राचीन असा शिल्पशास्त्रावरील ग्रंथ आहे. मूर्तिशिल्पाबद्दलची काश्यपशिल्पात जी माहिती दिली आहे तिच्या आधारे मूर्तिशिल्पाची थोडक्यात तोंड ओळख अनेक लेखांच्या रूपाने द्यावयाचा विचार आहे.

**काश्यपशिल्पातील मूर्तिकला**

काश्यपशिल्पांत पटल ४६ पासून ८५ पर्यंत मूर्ति कलेसंबंधी माहिती मिळते. पटल ४६ ते ४८ त्यांत मुख्यतः प्रमुख देवतेच्या मंदिराच्या चोहोबाजूस ज्या परिवारदेवता असतात, त्यांच्या मूर्तींची लक्षणे दिलेली आहेत. मुख्य मंदिर मध्य भागी असून त्या त्या परिवारदेवतेचे स्थान कुठल्या दिशेला असावे एवढेच नव्हे तर परिवारदेवतांच्या संख्येनुसार त्यांची स्थापना तीन किंवा पाच प्राकारांमध्ये कोठे कोठे असावी त्याचीही माहिती दिली आहे.

त्यानंतर पटल ४९मध्ये शिवलिंगाविषयी सांगोपांग माहिती दिली आहे. त्यात शिवलिंग जर पाषाणाचे करावयाचे असेल तर त्यासाठी पाषाणाची निवड कशी करावी, त्या पाषाणात कोठले दोष असू नयेत याचीही सविस्तर माहिती दिली आहे. लिंगपीठाविषयी माहिती पटल ५८ मध्ये दिली आहे. शिवलिंग व लिंगपीठ यांच्यात काही दोष किंवा दोष नसले तरी ते चुकून राहिल्यास मंदिर बांधणाऱ्या शिल्पीला व त्याच्या मालकाला त्यामुळे काही भय असू नये म्हणून लिंग व लिंगपीठ यांचा लक्षणोद्धार कसा करावा याची माहिती अनुक्रमे पटल ४९ व ५९ यांमध्ये दिली आहे.

शंकराच्या प्रतिमा तयार करावयाच्या असतील तर प्रतिमेच्या तालमानाची व त्या तालमानाला अनुसरून निरनिराळ्या अवयवांची मापे यांची माहिती असावयास हवी. उत्तम दशताल ते सात तालापर्यंतच्या मूर्तींच्या बाबतीत ही माहिती पटल ५० ते ५७ पर्यंत दिली आहे. तालमान हे प्रतिमेची उंची देते. एक ताल म्हणजे बारा अंगुलांचे माप. तेव्हा दहा तालांची मूर्ती १२० अंगुले उंचीची असते. प्रतिमा ज्या आसनावर उभी असेल त्याच्या वरपासून ते प्रतिमेच्या डोक्याच्या केसांच्या हद्दीपर्यंत ही उंची धरतात. डोक्यावरील मुकुट, जटाभार वगैरेंची उंची या तालमानात येत नाही. काहींच्या मते एकताल म्हणजे मनगटाच्या मुळापासून पसरलेल्या तळव्याच्या मधल्या बोटाच्या टोकापर्यंत अंतर (आकृती १).



आकृती १ : तालाचे माप

साधारणपणे कोणत्याही तालमानाचे तीन प्रकार होतात उत्तम, मध्यम व अधम ताल. हे प्रत्येक तालमानाचे तीन प्रकार दहा ते पाच तालापर्यंत होतात. त्याहून प्रतिमेची उंची लहान असेल तर त्या मापाचे आणखी तीन प्रकार करीत नाहीत. दहा ताल प्रतिमेची उंची १२० अंगुले असते, पण हे झाले मध्यम दशतालाचे माप. उत्तम दशताल म्हणजे ११६ अंगुले उंचीची मूर्ती. तेव्हा तक्ता १ मध्ये दिल्याप्रमाणे १२ अंगुलांच्या पटीने येणारी उंची ही मध्यम तालाची असते. त्याहून उंची चार अंगुलांनी वाढविली म्हणजे उत्तम तालाचे माप होते. याउलट उंची चार अंगुलांनी कमी केली तर ते अधम तालाचे माप होते. या तक्त्यातच कोठल्या देवतेची मूर्ती किती ताल मापात करतात त्याचीही माहिती काश्यपशिल्पावरून दिली आहे.

**अंगुल हे माप :**

मूर्तीची उंची अंगुलांत आहे तेव्हा अंगुलाच्या मापाची माहिती असणे आवश्यक आहे. अंगुलाचे तीन प्रमुख प्रकार आहेत : मानांगुल, मात्रांगुल व देहलब्धांगुल.

यांतील मानांगुल हे माप अपरिवर्तनीय आहे. अणु नावाच्या धान्याचे किंवा तिळाचे अथवा तांदळाचे दाणे यांच्या मापापासून मानांगुलाचे माप मिळविता येते. हे माप अशा रीतीने मिळवावयाच्या बऱ्याच पद्धती पूर्वापार चालत आल्या आहेत. बौधायन शुल्बसूत्रांत ३४ अणु किंवा १४ तिळाचे दाणे यांच्या रुंदीला एकमेकास चिकटून ठेवले म्हणजे जे लांबीचे माप येते त्याला अंगुल म्हणावे असे सांगितले आहे (१.३-५). मानव शुल्बसूत्रांत (१०.१.४.१-४) सहा कमल परागांच्या अग्रांची एकत्र जाडी ही एक वासरू झालेल्या तीन वर्षाच्या गाईच्या केसाच्या जाडीइतकी असते असे दिले आहे. पुढे गाईच्या सहा केसांच्या जाडीइतकी जाडी मोहरीच्या दाण्याची असते. सहा मोहरीचे दाणे एकमेकांस लागून ठेवले म्हणजे एका यवाच्या जाडीइतके माप मिळते व असे सहा यव त्यांच्या जाडीला लागून ठेवले म्हणजे येणारी लांबी एक अंगुल इतकी असते. अशी अगदी सूक्ष्म परिमाणापासून अंगुलांचे माप मिळविण्याची पद्धत दिली आहे. शिल्पशास्त्राच्या ग्रंथांत अंगुलांचे माप हे उन्हाच्या कवडशात दिसणाऱ्या परमाणूंपासून सुरुवात करून दिलेले असते. मात्र येथे सहा यवांनी मिळणारे अंगुलांचे माप हे कनिष्ठ अंगुलांचे असून अनुक्रमे सात व आठ यवमाध्यांनी मध्यम व उत्तम अंगुलांचे माप मिळते असे म्हटलेले आहे. काश्यपशिल्पात तांदुळाच्या दाण्याच्या मापाने अंगुलाचे माप दिले आहे. तांदुळांचे पांढरा, मोठा, तांबडा, सुगन्धी व सोनेरी रंगाचा असे पाच प्रकार सांगून दोन तांबड्या तांदुळांनी एका अंगुलाचे माप मिळते असे सांगितले आहे.

अंगुलाचा दुसरा प्रकार मात्रांगुल. यजमानाच्या उजव्या हाताच्या मधल्या बोटाच्या मधल्या पर्वाची जाडी किंवा लांबी हे माप अंगुलाइतके असते. यजमानाच्या देहावरून अंगुलाचे माप ठरवावयाची ही रीत फार पूर्वीपासून प्रचलित आहे. मानव शुल्वसूत्रांत (१०.१.४.५) यजमानाची उंची जमिनीपासून त्याच्या वर केलेल्या हाताच्या (मधल्या बोटाच्या अग्रा) इतकी घेऊन ती १२० अंगुले आहे असे समजून एक अंगुलाचे माप घ्यावे किंवा यजमानाच्या बोटाच्या पर्वामधील अंतर एक अंगुल समजावे असे सांगितले आहे.

शरीराच्या निरनिराळ्या अवयवांची मापे व त्यांचे परस्परांशी प्रमाण ही माहितीदेखिल श्रौतसूत्रकालाइतकी (इ.स.८०० वर्षे किंवा त्या अगोदर) जुनी आहे असे म्हणण्यास हरकत नाही. शुल्बसूत्रांत, जी श्रौतसूत्रांचा एक भाग आहेत, शरीराच्या निरनिराळ्या अवयवांची जी मापे दिली आहेत त्यावरून हे समजून येते व तालमानांत जी मूर्तीच्या शरीराच्या अवयवांची मापे दिली आहेत त्यांचे मूळ शुल्बसूत्रांत एक जानु म्हणजे ३२ अंगुले हे माप दिले

आहे; म्हणजे जमिनीपासून गुडघ्यापर्यंतचे अंतर म्हणजे मुखापर्यंतचे अंतर ३२ अंगुले असते. आपस्तव शुल्वसूत्रांत नाभीपर्यंत अन्तर ६४ अंगुले व एक आस्य म्हणजे मुखापर्यंतचे अंतर ९६ अंगुले असते असे दिले आहे. याचाच अर्थ मानवी शरीराच्या उंचीचे तीन समान विभाग पाडलेले आहेत व ते प्रत्येकी ३२ अंगुलांचे आहेत. निरनिराळ्या तालमानांतील मूर्तींच्या या मापांचा अभ्यास केल्यास हे जमीन ते गुडघा, गुडघा ते नाभी व नाभी ते मुख यांचे प्रमाण थोड्याफार फरकाने तसेच ठेवण्यात आले आहे असे दिसेल. इतर मापासंबंधी तसेच म्हणता येईल. किंबहुना मापे घेण्यासाठी मनुष्याच्या हाताच्या मापापासून सुरुवात केली गेली असे म्हटले तरी चालेल, व त्याचीच परिणती म्हणजे एक ताल म्हणजे मनगटापासून पसरलेल्या तळहाताच्या मधल्या बोटाच्या अग्राइतके अंतर हे शेवटी शरीराच्या मापाचे प्रमाणमाप घेतले गेले. एक प्रादेश किंवा एक वितस्ती किंवा एक अर्व ही सर्व मापे १२ अंगुलांची लांबी दाखवितात. हे अंतर म्हणजे पसरलेल्या हातातील अंगठ्याच्या अग्रापासून करंगळीच्या अग्रापर्यंत अंतर. हल्ली देखील आपल्याला एखाद्या वस्तूची साधारण लांबी पाहिजे असेल तर आपण आपल्या हाताने अशा रीतीने माप घेतो इतके हे माप सोईस्कर आहे. म्हणूनच ते अगदी पहिल्यापासून प्रचारात आले असावे; नंतर त्याचा व अंगुलमापाचा संबंध जोडण्यात आला असावा. १४ तिळांचे दाणे किंवा सहा कमल परागांपासनू अथवा परमाणूंपासून सुरुवात करून अंगुलाचे माप ठरविणे ही नंतरची गोष्ट झाली. अंगुलांचे अपरिवर्तनीय असे शास्त्रशुद्ध माप असावे यादृष्टीने परिणतावस्थेतील माप झाले. एक व्यायाम किंवा व्याम म्हणजे दोन्ही हात जमिनीशी समांतर परस्परविरुद्ध दिशांना पसरले म्हणजे त्या हातांच्या पसरलेल्या मधल्या बोटांच्या टोकांमधील अंतर हे मापदेखील ९६ अंगुलेच असते व ते श्रौतसूत्र काळापासून निश्चित झाले आहे. तेव्हा मानवी शरीराच्या अवयवांच्या मापावरून अंगुलाचे माप मिळविणे व मानवी शरीराच्या निरनिराळ्या अवयवांची अंगुल परिमाणात मापे सांगणे ही मूर्तिकलेतील मापांबद्दलची परिस्थिती फार पूर्वीपासून प्रचलित असावी असे दिसते.

या मापांबद्दलचे शिलालेखांतील उल्लेखही देता येतील. हात हे माप राज्यव्यवहारात राजाच्या हाताच्या मापाने ठरविले जाई. वैल्लभट्टस्वामी देवालयातील शिलालेखात जमिनीची मोजणी राजाच्या हाताच्या मापाने (परमेश्वरीय हस्त) केली असे उल्लेख आहे. तसेच शिवचंद्र हस्त म्हणजे शिवचंद्र राजाच्या हाताचे माप अशा अर्थी उल्लेख शिलालेखात मिळतो. एवढेच नव्हे तर काही बंगाली शिलालेखांत सुतारकामाचा हात (दर्वीकर्महस्त) असेही उल्लेख मिळतात. आतापर्यंत उत्तर आर्कोट जिल्ह्यात नारायणवनम् या गावाजवळी कंपुलपालियम् या देवळातील देवीच्या पायाचे माप वापरीत असत. देवीच्या पायांची लांबी आहे २६ सें.मी.

मूर्तीची उंची दिलेल्या अंगुलांच्या मापाने ठरविता येते, त्याप्रमाणे अंगुलाच्या तिसऱ्या प्रकारच्या मापाने ठरविता येते. हा अंगुलाचा तिसरा प्रकार मात्र गमतीचा आहे. देहलब्धांगुल अंगुलांचे माप मूर्तीच्या मधल्या बोटाच्या मधल्या पर्वाच्या लांबीचे माप. हे माप मूर्ती तयार करावयाच्या अगोदर ठरवावयास हवे. हे माप कसेही बदलू शकते. दहा ताल मूर्तीची उंची असते १२० अंगुले. आता मूर्तीचे देहलब्धांगुलाचे माप समजा दोन सें. मी. असले तर पुन्हा दहा तालच २४० सें.मी. ; पण जर मूर्तीच्या देहलब्धांगुलाचे माप समजा १/२ सें.मी. असेल तर पुन्हा दहा तालच उंचीच्या मूर्तीची उंची मात्र ६० सें. मी. मात्र मूर्तीच्या निरनिराळ्या अवयवांची लांबी ही देहलब्धांगुलावरूनच घेतलेली असल्याने मूर्तीची २४० सें. मी. असो की ६० सें.मी. असो; या दोन मूर्तींच्या अवयवांच्या लांबी, रुंदी वगैरेंची परस्परप्रमाणे सारखीच असणार व दोन्ही मूर्ती दहाताली आहेत असेच त्यांचे माप सांगितले जाईल. तेव्हा शंकराची मूर्ती उत्तम दहा ताल (१२४ अंगुले) मापाची असली गणपतीची एकटी मूर्ती जर असेल व ती तालमानाप्रमाणे पाच ताल (६० अंगुले) उंचीची असेल तरीही गणपतीची मूर्ती शंकराच्या मूर्तीपेक्षा कितीतरी पट मोठी असू शकेल व तरीही तालमानाप्रमाणे सर्व अवयवांची मापे अचूक असतील. याउलट शंकर, उमा व स्कंद अशी तिघांची 'सोमास्कंद' एकत्र मूर्ती असेल तर त्यांची उंची

शंकराच्या देहलब्धांगुलाच्या प्रमाणात असल्याने, उमा, शंकराच्या मुखाइतक्या किंवा त्याच्या स्तनसूत्राच्या इतक्या उंचीची असेल तर स्कंद शंकराच्या गुडघ्याच्या उंचीचा असेल व त्यांचे परस्परप्रमाण योग्य असेल. तेव्हा देहलब्धांगुल हे माप मूर्तीच्या मापासाठी तरी फारच सोईस्कर आहे व त्याबाबतीत भारतीय मूर्तिकारांच्या मापांच्या सर्जनशीलतेबद्दल कौतुकच करावयास हवे.

मातीची मूर्ती कशी करावी, उत्तम चुन्याचा लेप तीवर कसा लावावा व नंतर रंगकाम कसे करावे याचीही माहिती पुढील पटलात दिली आहे. मूर्तीसाठी वापरावयाची माती कोठून आणावी, तिचे स्थिरीकरण कसे करावे, तसेच ही माती ज्या लाकडी सांगड्यावर थापून मूर्ती तयार करावयाची त्या लाकडी सांगाड्याचे (शूलाचे) संपूर्ण वर्णन दिले आहे.

**मूर्तीचे प्रकार** - मूर्तीचे चार प्रमुख प्रकार आहेत. ते म्हणजे-

१) **चित्रजा**-कागदावर, कापडावर, भिंतीवर किंवा भांड्यांवर काढलेले चित्र.

२) **लेपजा**-मातीची मूर्ती किंवा मूर्ती आतून कागदाची, कापडाची कशाचीही केलेली असो, तिला बाहेरून मातीचा किंवा चुन्याचा लेप दिलेली.

३) **पाकजा**-मातीची मूर्ती पण भाजलेली किंवा धातू वितळवून तयार केलेली मूर्ती. मेणाच्या ठशावरून तयार केलेली-Cire purdue method-धातूची मूर्ती.

४) **शस्त्रोत्कीर्ण**-लाकूड, दगड रत्न अशा कठीण पदार्थामधून कोरून काढलेली मूर्ती. ज्या पदार्थापासून मूर्ती तयार केली असेल त्यावरून मूर्तीचे सात प्रकार होतात :

१) **मृण्मयी** -मातीची कच्ची किंवा पक्की, हाताने घडविलेली किंवा साच्यातील .

२) **दारुघटिका** -लाकडाची मूर्ती. उदाहरणार्थ पुरी येथील पुरुषोत्तम, बलराम व सुभद्रा यांच्या लाकडाच्या मूर्ती.

३) **लोहजा**- धातूची बनविलेली, जिला वर पाकजा म्हटले आहे अशी.

४) **रत्नजा**-रत्नावर कोरीव काम करून बनविलेली मूर्ती.

५) **शैलजा**-दगडाची, वाळूच्या दगडाची वगैरे.

६) **गन्धजा**-चंदन उगाळून त्याच्या गन्धापासून तयार केलेली मूर्ती.

७) **कौसुमी**-निरनिराळ्या फुलांच्या मांडणीने तयार केलेली मूर्ती.

शुक्रनीतिसारात (४.४७२) पुन्हा ज्या पदार्थांपासून मूर्ती तयार केली त्यावरून तिचे आठ प्रकार दिले आहेत. यातील उत्तरोत्तर पदार्थांच्या मूर्ती या अधिकाधिक टिकाऊ असतात.

१) **सैकती**-ओल्या वाळूची, शिवलिंग वगैरे क्षणभंगुर मूर्ती

२) **पैष्टी**-पिठापासून केलेली मूर्ती

३) **लेख्या**-आलेखलेली

४) **लेप्या**-वर सांगितलेली लेपजा.

५) **मृण्मयी**-मातीची.

६) **वार्क्षी**-वृक्षापासून म्हणजे लाकडापासून बनविलेली.

७) **पाषाण**-अखंड दगडाची.

८) **धातू** -सोने, चांदी, तांबे, पितळ, लोखंड, पंचधातू यांच्यापासनू बनविलेल्या मूर्ती.

काश्यपशिल्पात (५०.१-९) मूर्तीचे तीन प्रकार दिले आहेत.


१) अर्धचित्र २) चित्र व ३) चित्राभास

केवळ पुढचा भाग उठावाने दाखविलेला असतो ते अर्धचित्र. सर्व अवयव पुढून, पाठीमागून संपूर्णपणे दाखविलेले असतात ते चित्र. कापडावर, भिंतीवर, उठाव खोली वगैरे दाखवून जे चित्र काढतात त्याला म्हणतात चित्राभास.

द्रव्याच्या वापराप्रमाणे मूर्तींचे प्रकार होतात. विटा, माती, लाकूड, दगड, लोखंड, तांबे, चांदी व सोने. उत्तरोत्तर द्रव्ये ही उत्तम द्रव्ये होत.

याचप्रमाणे मूर्तीचे तिच्या भावाभिव्यक्तीप्रमाणे तीन प्रकार होतात. ते म्हणजे सात्त्विक, राजस व तामस. एकाच देवतेच्या अशा निरनिराळ्या मूर्ती असू शकतात. तामस किंवा उग्रमूर्तीत पुन्हा अभिचारमूर्ती म्हणजे जादूटोणा करताना पूजावयाच्या मूर्तीचाही उपप्रकार असतो. सात्त्विक मुद्रेतील मूर्तीचे हात योग, अभय व वरदमुद्रेत असतात. पुष्कळदा त्या मूर्तीची इंद्र व इतर क्षुद्र देवता पूजा करीत आहेत असे दाखविलेले असततते. राजसी मुद्रेच्या हातात शस्त्रे धारण केलेली असतात. दोन हात अभय व वरद मुद्रेत असतात. ही मूर्ती पीठावर किंवा तिच्या वाहनावर बसलेली दाखवितात. भरपूर व वस्त्रे घातलेली अशी ही मूर्ती असते. असुरांना मारीत असलेली मूर्ती तामस समजतात.

आकृती २ मध्ये मूर्तींच्या हातांत धारण केलेली निरनिराळी शस्त्रे दाखविली आहेत.



तक्ता

| तालाचा प्रकार | उंची (अंगुले) | मूर्तींची नावे |
|---|---|---|
| उत्तम दशताल | १२४ | ब्रह्मा, विष्णू, महेश्वर |
| मध्यम दशताल | १२० | उमा, सरस्वती, उषा, भूमि, दुर्गा, लक्ष्मी, सप्तमाता, ज्येष्ठा |
| अधम दशताल | ११६ | चंद्र, सूर्य, अश्विनी, ऋषी, ग्रह, शर्व, षण्मुख, चण्डेश, क्षेत्रपाल, इंद्र, लोकपाल, शेष, गुरू. |
| उत्तम नवताल | ११२ | अष्टवसू, विघ्नेश, लोकपाल, दैत्येश, यक्षेश, नागेश, सिद्ध, गंधर्व व शिवाच्या अष्टमूर्ती. |
| मध्यम नवताल | १०८ | यक्ष, अप्सरा, अस्त्रमूर्ति, मरुद्गण, विद्याधर |
| कनिष्ट नवताल | १०४ | असुर, सिद्ध, गंधर्व, पितर |
| उत्तम नवताल | १०० | - |
| मध्यम आठताल | ९६ | पिशाच, माणसे |
| कनिष्ट आठताल | ९२ | - |
| सात ताल | ८४ | पिशाच, वेताळ, प्रेत |
| सहा ताल | ७२ | कुबडी माणसे, प्रेत |
| पाच ताल | ६० | कुबेर, कुबडा, विघ्नेश्वर |
| चार ताल | ४८ | बालक, वामन, खुजीमाणसे |
| तीन ताल | ३६ | बालक, भूत, किन्नर |
| दोन ताल | २४ | किन्नर, |
| एक ताल | १२ | कासव |

• • •

# रघुदिग्विजय : इतिहास आणि राजनीतिशास्त्र यांचा समन्वय

डॉ. सौ. मंजुषा गोखले

संस्कृत काव्यशास्त्र सांगते, की प्रतिभा, व्युत्पत्ती आणि अभ्यास हे काव्यनिर्मितीचे हेतू आहेत. प्रतिभा हे काव्याचे बीज खरे; पण व्युत्पत्तीच्या खतपाण्याने प्रतिभेची निगराणी केली जाते, तेव्हाच काव्याचा वेलू गगनावरी जातो.

व्युत्पत्ती या काव्यकारणाची व्याप्ती खरोखर अमर्याद आहे. त्यात कवीने अभ्यासावयाच्या शास्त्रांची यादी न संपणारीच आहे. पण केवळ शास्त्रे पढणे हा कवीच्या जाणिवा समृद्ध करण्याचा एकमेव मार्ग नव्हे. आपली सगळी ज्ञानेंद्रिये सजग ठेवून कवीला अनुभवांचे ग्रहण करावे लागते. भोवतालची राजकीय, सामाजिक परिस्थिती निरखून तिचा अन्वयार्थ लावावा लागतो. इतिहासाची वर्तमानाशी सांगड घालावी लागते. ग्रंथातील ज्ञानाची व्यावहारिक उपयुक्तता अजमावावी लागते. मधमाशीप्रमाणे ज्ञान आणि अनुभव यांचे थेंब थेंब गोळा करून तो आपले विश्व समृद्ध बनवतो ! व्युत्पत्ती म्हणजे कवीने घडविलेले स्वतःचे समृद्ध व्यक्तिमत्त्व!

मात्र एवढ्याने 'कवी' होता येत नाही, कारण केवळ शास्त्रज्ञान आणि अनुभव यांचे मिश्रण म्हणजे काव्य नव्हे. प्रतिभेच्या परीसस्पर्शाने आपल्या संचित सामग्रीला नवी झळाळी, नवे रूप मिळवून द्यावे लागते. वास्तवामध्ये कल्पिताचे अद्‌भुत रंग भरून एक नवीच सृष्टी कवी साकारतो. कवीच्या प्रतिभेचे हेच तर अलौकिक कार्य आहे !

विशेषतः कालिदासासारख्या महाकवीच्या बाबतीत तर प्रतिभा आणि व्युत्पत्ती यांची गळामिठीच पडलेली दिसते. विविध ज्ञानभांडारे आणि संपन्न अनुभवविश्व त्याच्यापुढे हात जोडून उभी असतात. त्यांवर प्रतिभेची जादुई फुंकर घालून कालिदास काव्याचे प्रासाद उभे करतो.

कालिदासाच्या काव्यांमध्ये तो ज्या काळात, ज्या वातावरणात होऊन गेला, त्या काळाचे, त्या परिस्थितीचे प्रतिबिंब स्वच्छपणे उमटलेले आहे असे अभ्यासकांना कालिदासीय परिशीलन करताना जाणवते.[१] म.म.वा.वि. मिराशी यांसारख्या विद्वानांनी कालिदासाचा काळ इ.स. ४०० च्या सुमारास निश्चित केला असून तो गुप्त सम्राट द्वितीय चंद्रगुप्त याच्या पदरी होता असे सिद्ध केले आहे.[२] हा काळ भारताचे सुवर्णयुग म्हणून ओळखला जातो. रघुवंशासारखे महाकाव्य रचण्याची प्रेरणा त्याला या काळानेच दिली असावी.[३] 'दिलीप, रघु, अज या आदर्श राजांचे चित्रण अनुक्रमे चंद्रगुप्त पहिला, समुद्रगुप्त आणि द्वितीय चंद्रगुप्त या राजांना डोळ्यांसमोर ठेवून केलेले आहे.' असे मत प्रा. एच्.वी.भिडे यांनी मांडले आहे.[४] विशेषतः रघुवंशातील चौथ्या सर्गातील रघूच्या दिग्विजयाचे परिशीलन करताना असे जाणवते की कालिदासाचे जरी रामायण, महाभारत आणि तत्कालीन पुराणादि ग्रंथ यांच्यावर प्रभुत्व असले, तरी रघुदिग्विजयाच्या चित्रणासाठी त्याला या ग्रंथांचा फारसा उपयोग झालेला आहे असे म्हणता येत नाही. वायुपुराण, विष्णुपुराण यांत इक्ष्वाकु-वंशाची माहिती आली असली तरी रघूच्या नावापलीकडे त्याच्याबद्दल काहीच सांगितलेले नाही.[५] पद्मपुराणात थोडीफार माहिती मिळते; पण मिराशींच्या मतानुसार कालिदासाने पद्मपुराणाचा उपयोग केलेला नसून पद्मपुराणकारानेच रघुवंशाचा उपयोग करून घेतला आहे.[६] अशा परिस्थितीत रघुदिग्विजयाला कोणत्या प्राचीन ग्रंथाचा आधार आहे हे खात्रीपूर्वक सांगता येत नाही. उलट, कालिदासाने त्याला ज्ञात असलेल्या ऐतिहासिक माहितीच्या आणि त्याच्या काळात घडत असलेल्या घटनांच्या पायावर रघुदिग्विजयाची इमारत उभी केलेली आहे असे म्हणता येते.[७]

रघूचे दिग्विजयी सम्राट म्हणून चित्रण करण्याची प्रेरणा कवीला मिळावी अशी गुप्तसम्राटांची विजयमालिका कालिदासाच्या डोळ्यांसमोर घडत होती. पहिल्या चंद्रगुप्ताने इ.स. ३२० ते ३३० या काळांत गुप्त, साम्राज्याचा पाया घातला. त्याचे राज्य प्रयाग, अयोध्या, साकेत, पाटलिपुत्र या भागात होते.[८] त्याचा मुलगा समुद्रगुप्त या महत्त्वाकांक्षी राजाने दिग्विजय करून नेपाळपासून दक्षिण भारताच्या पूर्व किनाऱ्याने मद्रासपर्यंत साम्राज्यविस्तार केला. त्याच्या दिग्विजयाचे सविस्तर वर्णन 'अलाहाबादप्रशस्ती' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या स्तंभलेखात मिळते. त्याचा पुत्र शकारि-विक्रमादित्य द्वितीय चंद्रगुप्त याने बंगालपासून अफगाणिस्थानच्या सीमेपर्यंत आपली सत्ता प्रस्थापित केली. शकसत्रपांचा पराभव करून पश्चिम भारत अमलाखाली आणला आणि वाकाटकवंशाशी मैत्रीचे राजकारण करून दक्षिण भारतही छत्राखाली घेतला. मेहरौली, मथुरा, उदयगिरी वगैरे पुराभिलेखांच्या आधारे त्याच्या कामगिरीवर प्रकाश टाकता येतो. अशा रोमहर्षक घटनांनी संपन्न असलेल्या परिस्थितीचा कविमनावर जो प्रभाव पडला, त्याच्या खुणा रघुदिग्विजयात जागोजाग उमटल्या आहेत.[९]

हा सगळा कालखंड गुप्त सम्राटांच्या दृष्टीने मोठाच घडामोडीचा होता. वेगवेगळ्या राजांशी मैत्रीच्या अगर शत्रुत्वाच्या संबंधांचा गोफ विणला जात होता. साहजिकच राजनीतीच्या -विशेषतः परराष्ट्र व्यवहारविषयक धोरणांच्या-उपयोजनेला विशेष महत्त्व होते. त्यामुळे चाणक्यापासून चालत आलेल्या राजनीतिशास्त्राच्या परंपरेला महत्त्वाचे स्थान मिळाले असले पाहिजे. किंबहुना चाणक्याच्या मते राजनीतिशास्त्र आहे तेच मुळी विजिगीषू राजासाठी![१०] गुप्तांसारखा विजिगीषू राजांनी चाणक्याची तत्त्वे आणि संकल्पना प्रत्यक्षात आणलेल्या दिसतात.[११] राजनीतिशास्त्राचा प्रभाव रघुदिग्विजयाच्या चित्रणावर पडलेला साहजिकच दिसतो.[१२]

सारांश, प्राचीन ऐतिहासिक संदर्भ, तत्कालीन घटिते आणि राजनीतिशास्त्र यांना वाट पुसतच कालिदासाने रघुदिग्विजयाच्या वर्णनाची दिशा निश्चित केली असली पाहिजे. रघुदिग्विजयाचा अभ्यास करताना सतत खुणावणारे ऐतिहासिक संदर्भ आणि राजनीतिशास्त्राचे संदर्भ यांचा सविस्तर मागोवा घेण्याचा हा प्रयत्न आहे.

### अ) दिग्विजयाची पूर्वपाठिका

प्रजापालन हे राजाचे पहिले आणि सर्वात महत्त्वाचे कर्तव्य आहे हे राजनीतिशास्त्र नेहमीच ठामपणे सांगत आले आहे. 'रञ्जिताश्च प्रजाः सर्वास्तेन राजेति शब्दते' अशी राजन् शब्दाची व्युत्पत्तीच महाभारताने दिली आहे.[१३] राजाचे व्यक्तिमत्त्व आणि कर्तृत्व असे असले पाहिजे की त्यामुळे प्रजा सुरक्षित, संपन्न आणि सुखी झाली पाहिजे. त्यासाठी 'दण्ड' हे प्रभावी साधन राजाच्या हाती असते. मात्र दंडाचा वापर करताना 'यथार्हदण्डः पूज्यः । सुविज्ञातप्रणीतो हि दण्डः प्रजा धर्मार्थकामैर्योजयति ।'[१४] हा नियम ध्यानात ठेवणे अगत्याचे आहे. दंडाच्या उपयोजनाने प्रजेला सुख प्राप्त व्हावे आणि त्याच बरोबर शत्रूवर जरब बसावी. अर्थातच या कामासाठी राजाला शास्त्राध्ययन आणि नीतिविशारद सल्लागारांचा सहवास या दोन गोष्टी अत्यंत आवश्यक आहेत.[१५]

अलाहाबादप्रशस्ती सांगते की, समुद्रगुप्ताने राज्यावर आल्यानंतर आपल्या 'सुचरिताने' आणि 'उत्तम कर्मांनी' प्रजेला संतुष्ट केले.[१६] त्याचबरोबर सतत त्रास देणाऱ्या (नित्यमुच्चापकाराः) शत्रूंना स्वबळावर जिंकून शरण यायला लावले.[१७] तो स्वतः ज्ञानी लोकांच्या सहवासात राहून शास्त्रांच्या उपदेशाचे सार ग्रहण करीत असे.[१८] विख्यात राजनीतिज्ञ कामन्दक हा तर द्वितीय चंद्रगुप्ताच्या पदरी अमात्य होता असे आर्.एन्. सॅलेटोर यांनी सिद्ध केले आहे.[१९] तज्ज्ञांच्या सल्ल्याचे महत्त्व सांगताना कामन्दक म्हणतो-'प्रभावोत्साहशक्तिभ्यां मन्त्रशक्तिः प्रशस्यते ।'[२०]

याच धर्तीवर कालिदास लिहितो की रघूने राज्यावर आल्यानंतर आपल्या गुणांनी प्रजेला दिलीपाचा विरह जाणवू दिला नाही.प्रजेची सतत भरभराट होत राहिली. तसेच दिलीपापुढे दबून राहिलेले राज्यालगतचे शत्रू आता

रघूची कुरापत काढू पहात होते, त्यांना पादाक्रान्त करून रघू 'लब्धप्रशमनस्वस्थ' झाला.[११] शास्त्राभ्यासामुळे त्याची सदसद्विवेकबुद्धी तीक्ष्ण झालीच होती, शिवाय त्याच्या नीतिविशारद सल्लागारांनीही आता सन्मार्ग आणि असन्मार्ग यांतील फरक समजावून दिला होता.[१२] म्हणून त्याला कवीने 'युक्तदण्ड'[१३] असे बिरुद बहाल केले आहे. कवी म्हणतो-

यथा प्रह्लादनाच्चन्द्रः प्रतापात्तपनो यथा।
तथैव सोऽभूदन्वर्थो राजा प्रकृतिरञ्जनात्॥[१४]

अशा श्रेष्ठ राजाच्या मनात साहजिकच विजिगीषा जन्म घेते. किंबहुना कौटिल्याच्या मते अशा राजासमोर विजिगीषू होण्याचेच ध्येय असली पाहिजे.[१५] कामन्दकाने विजिगीषूचे लक्षणवर्णन पुढीलप्रमाणे केले आहे.

रोचते सर्वभूतेभ्यः शशीवाखण्डमण्डलः ॥
सम्पूर्णमण्डलस्तमाद्विजिगीषु : सदा भवेत ॥
सम्पन्नस्तु प्रकृतिभिर्महोत्साहः कृतश्रमः ॥
जेतुमेषणशीलश्च विजिगीषुरिति स्मृतः ॥

अशा अनुकूल आणि उत्कर्षाच्या परिस्थितीत समुद्रगुप्ताने दिग्विजयाची महत्त्वाकांक्षा धरली. त्याच्याच पावलावर पाऊल टाकून द्वितीय चंद्रगुप्ताने 'कृत्स्नपृथ्वीजय' हे ध्येय ठेवून[१६] दिग्विजय संपूर्ण केला. त्याच विजिगीषेचे प्रतिबिंब रघूमध्ये पडलेले दिसते. नैसर्गिक साधनसंपत्तीचा उत्कर्ष, प्रजेचे प्रेम, मंडलातील राजांवर असलेले प्रभुत्व, स्वतःच्या ठिकाणी मुसमुसणारा उत्साह यांचा प्रकृष्ट संयोग झाल्याने रघू दिग्विजयाचे बेत रचू लागला.[१७]

दिग्विजययात्रा म्हणजे राजनीतिशास्त्रातील षाड्गुण्यापैकी 'यान' होय. यानाचा प्रारंभ शक्यतो शरद ऋतूत व्हावा असे मनुस्मृती सांगते.[१८] अनुकूल हवामान, नद्यांचे ओसरलेले पूर, पिके येऊन शेतीच्या कामातून मोकळीक झाल्याने शेतकरी पेशांच्या लोकांची सैन्यात भरती होण्याची तयारी वगैरे कारणांमुळे शरदऋतू हा मोहिमेचा काळ म्हणून मान्यता पावलेला आहे. त्यामुळे रघूची विजययात्रा शरत्कालात सुरू व्हावी हे स्वाभाविकच आहे.[१९]

दिग्विजयासाठी 'षड्विध बल' आवश्यक आहे असे राजनीतिशास्त्र सांगते.[२०] त्यापैकी अश्व, रथ, हत्ती आणि पदाती असे चार सैन्याचे प्रकार असतात. शिवाय आरमार, कोश आणि शिल्पी यांचाही समावेश बलामध्येच होतो. उदयगिरी-गुहालेखात द्वितीय चंद्रगुप्ताच्या दिग्विजयाच्या संदर्भात पदाती, घोडदळ, हत्तीदळ व आरमार अशा चार प्रकारच्या सैन्याच्या प्रमुखांचे उल्लेख येतात.[२१] रघू 'षड्विधबल समन्वित' होता, तसेच चतुरंग सैन्य घेऊन त्याने प्रस्थान ठेवले असे कवीने म्हटले आहे.[२२]

यात्रेला प्रारंभ करण्यापूर्वी राजधानीचा आणि राज्याच्या सीमांचा कडेकोट बंदोबस्त ठेवला पाहिजे, विशेषतः पिछाडीच्या बाजूने शत्रू हल्ला करणार नाही याची खबरदारी घेतली पाहिजे. हे शास्त्राचे महत्त्वाचे तत्त्व[२३] कवी विसरलेला नाही हे 'गुप्तमूलप्रत्यन्तः' व 'शुद्धपार्ष्णिः'[२४] या रघूच्या विशेषणावरून ध्यानी येते.

आपल्या राज्याची सीमा ज्याच्या सीमेला भिडलेली आहे तो आपला स्वाभाविक शत्रू होय हे राज्यशास्त्राचे-मग ते प्राचीन असो की आधुनिक-पहिले तत्त्व होय. अशा शत्रूंशी संधी न करता त्यांना पराभूत करून त्यांचे समूळ उच्चाटनच केले पाहिजे असा राजनीतीचा नियमच आहे[२५] त्यांची राज्ये आपल्या राज्याला जोडून घेतल्याने 'भूमिसंपादन' हे फळ विजिगीषूला प्राप्त होते.[२६] आणि त्याचे बळ वाढते. मग पुढच्या राजांशी संघर्ष करताना परिस्थितीप्रमाणे योजना आखावी लागते. दुर्बळ राजांसाठी साम व दाम आणि प्रबळ शत्रूंविरुद्ध दंड व भेद अशा उपायांचा अवलंब करून एकामागोमाग एका शत्रुराजावर अंमल गाजवीत पुढे जावे लागते.[२७] त्यांच्याशी संधी करून, त्यांच्या भूमीचा लोभ न धरता कररूपाने त्यांच्याकडून संपत्ती(हिरण्य) वसूल केली जाते. हे राजे विजिगीषूचे मांडलिक बनतात. मांडलिक राजांचा योग्य तो मान ठेवून त्यांच्याशी मैत्री हे तिसरे फळ विजिगीषुराजा मिळवतो. अशा प्रकारे भूमी, हिरण्य, मित्र असे त्रिविध

लाभ राजनीतिशास्त्र सांगते.[३९]

याच तत्त्वांचा अवलंब करून समुद्रगुप्ताने आर्यावर्तातील राजांचा पुरा विध्वंस करून आपले साम्राज्य वाढवले (आर्यावर्तराजप्रसभोद्धरणोद्वृत्त प्रभावमहतः) जे राजे त्याच्याशी संघर्ष करायला रणात उभे ठाकले, त्यांना जिंकून, पकडून, शरण आणून मग त्यांना मुक्त केले व त्यांची राज्ये त्यांना परत देऊन त्यांना मांडलिक बनवले (राजग्रहणमोक्षानुग्रहजनितप्रताप...). सीमावर्ती प्रदेशातील राजे, त्याच्या सामर्थ्यापुढे माघार घेऊन शरण आलेले राजे, आणि त्याचे श्रेष्ठत्व मान्य करून आपण होऊन मैत्रीची याचना करणारे राजे यांच्याकडून कर देणे, आज्ञापालन करणे वगैरे अटी मान्य करून घेण्यावर समाधान मानले व अशा प्रकारे आपले सार्वभौमत्व प्रस्थापित केले.[४०]

कालिदास आपल्या नायकाच्या संदर्भात हेच धोरण अनुसरताना दिसतो. रघूने प्रथम आपल्या लगतच्या शत्रूंना रणात खडे चारून उखडून टाकले आणि त्यांचे सर्वस्व हरण केले (त्याजितैःफलमुत्खातैर्भग्नैश्च बहुधा नृपैः)[४१] त्या पलीकडच्या राजांपैकी जे आपण होऊन शरण आले[४२] त्यांना रघूने त्रास दिला नाही, त्यांनी देऊ केलेल्या संपत्तीवर, नजराण्यांवर समाधान मानले. मात्र जे राजे आडवे आले, त्यांना रणात अद्दल घडवली.[४३] मात्र ते पराभूत होऊन शरण आल्यानंतर त्यांची राज्ये खालसा केली नाहीत. त्यांच्याकडून करभार घेऊन त्यांना मांडलिक बनवले.[४४] अशा प्रकारे रघूने आपले सार्वभौमत्व प्रस्थापित केले.

### आ) रघूचा पूर्वदिग्विजय

प्रथम पूर्वेला मोहरा वळवून रघूने सुह्म आणि वंग या देशांवर अंमल प्रस्थापित केला. सुह्म हे ब्रह्मदेशाचे नाव असे वल्लभ या टीकाकाराचे मत नोंदवले आहे.[४५] पण सुह्म हे नाव 'वंग' नावाच्या आधी येते. तसेच अयोध्येपासून पूर्वेकडे जाताना प्रथम सुह्मदेश लागला. शिवाय वंगीयांच्या प्रबळ आरमाराचा आणि गंगेच्या मुखातील बेटाच्या उल्लेख यावरून वंग म्हणजे पूर्व बंगाल असे अनुमान होईल. यावरून सुह्म हा पश्चिमबंगालचा उल्लेख असावा असे दिसते.

अलाहाबादप्रशस्तीमध्ये 'समतत' या देशाचा उल्लेख आहे. हा पूर्वबंगालचा दक्षिणभाग असावा असे अरणिकुमार भट्टाचार्य म्हणतात.[४६] मेहरौलीच्या स्तंभलेखात चंद्र नामक राजाने वंगदेश जिंकल्याचा उल्लेख आहे. फ्लीट, राधागोविंद बसक, एस्.कृष्णस्वामी अय्यंगार यांच्या मते हा उल्लेख पहिल्या चंद्रगुप्ताचा आहे,[४७] तर व्ही. स्मिथ, डी.सी. सिरकार, एन्.एन्. घोष, भट्टाचार्य यांच्या मते तो द्वितीय चंद्रगुप्ताचा उल्लेख आहे.[४८] सारांश, गुप्तांनी पूर्वेकडे बंगाल प्रांतावर प्रभुत्व मिळवले होते हे निश्चित आहे.

दोहोंपैकी सुह्मदेशीयांनी आधीच रघूला शरण जाऊन आपले राज्य राखले (आत्मा संरक्षितः)[४९] वंगदेशीयांची आरमारावर भिस्त होती, पण रघूने वेगाने



पारदर्शिका १

मुसंडी मारून त्यांचा निःपात केला (तरसा उत्खाय)[५०]. मग मात्र वंगांचा इलाज चालला नाही (आपादपदमप्रणताः) तेव्हा रघूने संधी करून वंगराजाला पुन्हा राज्यावर बसविले. (प्रतिरोपिताः) व त्याच्याकडून मोठा कर कबूल करून घेतला.[५१]

पूर्वदिग्विजयाची स्मृती म्हणून रघूने गंगेच्या मुखाकडील बेटावर 'जयस्तम्भ' उभारला. राधागोविंद बसक यांनी म्हटल्याप्रमाणे अशा तऱ्हेचे स्मृतिस्तंभ उभारणे ही गुप्तांची परंपराच होती असे मेहरौली, मथुरा, अलाहाबाद वगैरे स्तंभांकडे पाहून वाटते.[५२]

**इ) आग्नेय दिग्विजय**

बंगालमधून आग्नेयेला वळून रघूने कपिशा (संशोधकांच्या मते मिदनापूर जिल्ह्यातील कसई नदी किंवा उत्कल ओरिसातील सुवर्णरेखा नदी)[५३] ओलांडली व तो उत्कल म्हणजे उत्तर ओरिसात आला. उत्कलराजाने त्याला कलिंगदेशाचा मार्ग दाखविला (रघु.४.३८). असे दिसते की या राजाने रघूला मदत करून त्याची मैत्री संपादन केली असावी. अशा प्रकारच्या सामन्ताला कौटिल्याने 'मित्रभाविन्' म्हटले अ ाहे.[५४] कामन्दकाने अशा प्रकारच्या संधीबद्दल म्हटले आहे-

उपकारं करोम्यस्य ममाप्येष करिष्यति।
अयं चापि प्रतीकारो रामसुग्रीवयोरिव ॥[५५]

उत्कलराजाने आपल्या स्वाभाविक शत्रूला असा परस्पर शह दिला. कलिंग हा दक्षिण ओरिसातील महेंद्रगिरी आणि उत्तर सिरकारच्या टेकड्यांचा व अरण्यांचा प्रद्रेश असावा. साहजिकच त्या राजाचे हत्तीदळ प्रबळ असले पाहिजे. त्याच्याशी तुंबळ युद्ध करून त्याला पकडले; पण नंतर त्याचे राज्य त्याला परत दिले. (रघु ४.४०.४२)

समुद्रगुप्ताने 'कोसलदेश' म्हणजे मध्यप्रदेश व ओरिसा यांच्या दरम्यानचे विलासपूर, रायपूर, संबळपुर जिल्हे जिंकून ओरिसात प्रवेश केला असावा. ओरिसातील 'महाकान्तार' (दक्षिण ओरिसातील जयपूर जवळचा अरणयमय प्रदेश), 'केरल' किंवा 'कोरल' (कदाचित जयपूर जवळच्या कोटापाड भाग) अणि 'कोट्टर' (पूर्व ओरिसातील गंजम जिल्ह्यातील कोट्टूर) हे भाग समुद्रगुप्ताच्या अमलाखाली होते. या राजांशी त्याचे धोरण 'ग्रहण-मोक्ष-अनुग्रह' अशाच प्रकारचे होते.

**ई) दक्षिणदिग्विजय**

आता रघू दक्षिणेला कावेरीच्या मुखाकडे निघाला. आता त्याचे सामर्थ्य व दरारा इतके वाढले होता, की यश त्याला सहजी मिळत होते (अनाशास्ययशः रघु ४.४४). म्हणून कदाचित कालिदासाने पुढील काही श्लोकांमध्ये (रघु ४४ ते ४७) रघूच्या सैन्याने या प्रातांचा कसा स्वस्थपणे उपभोग घेतला याचे काव्यमय वर्णन केले आहे.

समुद्रगुप्त असाच ओरिसाच्या किनाऱ्याने आंध्रप्रदेशाच्या किनारी भागात शिरला होता. 'एरण्डपल्ल' (विजगापट्टन जिल्हा), 'देवराष्ट्र' (विजगापट्टन जिल्हा), 'पिष्टपुर' (पिठापुर-गोदावरी जिल्हा), 'वेंगी' (एलोरे-कृष्णा-गोदावरी भाग), 'अवमुक्त' (कांचीजवळचा भाग), 'कांची' (कांजीवरम्-तामिळनाडू), 'पल्लक' (वेलोर जिल्हा), 'कुस्थलपुर' (उत्तर अर्काट जिल्हा) अशा प्रदेशांवर अंमल बसवीत तो कावेरीमुखापर्यंत पोचलेला दिसतो. या ठिकाणांच्या राजांची नावे अलाहाबादप्रशस्ती देते. इतिहास सांगतो, की इसवी सनाच्या दुसऱ्या-तिसऱ्या शतकापासून या भागात पल्लवांचे राज्य होते. त्यांचेच हे छोट्यामोठ्या प्रदेशांवर राज्य करणारे मांडलिक राजे असावेत. या लहान लहान राजांवर कृपा केल्यामुळे समुद्रगुप्ताच्या कीर्तीत भरच पडली. (अनुग्रहजनितप्रतापोन्मिश्रमाहाभाग्यस्य)[५६]

त्यानंतर रघूने ताम्रपर्णी नदीच्या मुखाजवळच्या पांड्यराजाकडे मोहरा वळवला. पांड्यराजाने लगेचच शरणागती पत्करून आपल्या खजिन्यातील उत्कृष्ट मोत्यांचाच नजराणा दिला. (रघु ४.४९.५०) आणि कामान्दकाच्या परिभाषेत 'उपहारसंधी' केला.[५७]

पांड्य हा दक्षिण भारताच्या इतिहासातील

महत्त्वाचा राजवंश आहे. रामायण-महाभारतादि ग्रंथांमध्येही त्याचे उल्लेख येतात. [५८] इतिहासात इ.स. पूर्व पहिल्या शतकापासून पांड्यांचे संदर्भ मिळतात. त्यांचे राज्य मदुरेपासून कन्याकुमारीपर्यंत होते. ताम्रपर्णी ही मानारच्या आखाताला मिळणारी एक नदी असावी. [५९] मानारचे आखात मोत्यांच्या पैदाशीसाठी प्रसिद्ध आहेच.

### उ) पश्चिमदिग्विजय

दक्षिणेतील मलय व दर्दुर या पर्वतांवर रघूने काही काळ विश्राम केला. वेलदोड्याचे डोंगर, अनैमलाई टेकड्या, नीलगिरीचे डोंगर हा तो भाग असावा. तिथून कदाचित पालघाटच्या वाटेने त्याने सह्याद्री ओलांडला व तो केरळ भागात उतरला (रघु ४.५१ ते ५४)

केरळमध्ये चेर नामक राजवंशाचे राज्य इसवी सनाच्या सुरवातीपासूनच होते. चेर व पांड्य यांच्यात सतत चालणाऱ्या सत्तासंघर्षाचे संदर्भ इतिहासात पुष्कळ सापडतात. [६०]

केरळपासनू अपरान्ता (कोकण) पर्यंतचा भाग म्हणजे मलबार किनारा, कारवार, गोवा हा सगळाच प्रदेश ताड, माड, केवडा आणि इतर नाना सुगंधी फुलांसाठी प्रसिद्धच आहे. त्यामुळे ४.५५ ते ५७ या तिन्ही श्लोकांत कवीने सुगंधाचेच संदर्भ दिले आहेत.

अपरान्त ही सागराने परशुरामाला अर्पण केलेली भूमी. तिथल्या राजानेही रघूला कर देऊन संधी केला. (रघु.४.५८)

ठाणे जिल्हा राजपत्रानुसार इ.स. २५०च्या सुमारास आभीरांनी सातवाहनांचा पराभव केला तेव्हा अपरान्त आभीरांच्या ताब्यात आला व चौथ्या शतकापर्यंत आभीरांकडेच होता. [६१] समुद्रगुप्ताने आपल्या दिग्विजयात आभीरांचा पराभव केला होता. अपरान्ताच्या उत्तर भागात म्हणजे भडोच-कठियावाडमधील पश्चिमी क्षत्रपांवर द्वितीय चंद्रगुप्ताने विजय मिळवला, तेव्हा अपरान्त गुप्त साम्राज्यात समाविष्ट झाला असावा. येथील शूर्पारकसारखी बंदरे उपलब्ध झाल्याने गुप्तांच्या मध्यपूर्वेशी सागरी व्यापाराला चालना मिळाली असे दिसते. [६२]

अपरान्ताच्या उत्तरेकडील त्रिकूटपर्वतालाच रघूने आपला जयस्तंभ बनवले. (रघु.४.५९) त्रिकूट हा नाशिक जिल्ह्याच्या उत्तरेकडील साल्हेरच्या डोंगरांचा प्रदेश असावा. म.म.पां.वा. काणे यांच्या मते 'त्रिकूट' हा पर्वताचा उल्लेख नसून आभीरांपैकी त्रिकूटक नामक राजवंशाचा उल्लेख असावा. [६३]

अशा प्रकारे तिन्ही महासागरांवर रघूचे प्रभुत्व प्रस्थापित झाले [६४]. रघूच्या दक्षिण भारतातील विजययात्रेच्या संदर्भात असा प्रश्न निर्माण होऊ शकतो, की कालिदासाने दक्षिण भारताच्या किनारी भागांचाच उल्लेख केला आहे. दक्षिण भारताच्या मुख्य भूमीचा यात उल्लेख नाही. कदाचित् गुप्तांचा इतिहास या मुद्यावर प्रकाश टाकू शकेल. इसवीसनाच्या चौथ्या शतकात दक्षिण भारतांत वाकाटक राजवंश प्रबळ होता. हे राजे गुप्तांप्रमाणेच वैदिक धर्माभिमानी होते. शिवाय माळव्यात राज्यविस्तार करण्यासाठी समुद्रगुप्ताला शकांशी संघर्ष करावाच लागणार होता त्यासाठी शकांच्या सीमेला लागून असलेल्या वाकाटकांशी संघर्ष करण्याचे त्याने टाळले व आपली डावी बाजू सुरक्षित करून घेतली. पुढे द्वितीय चंद्रगुप्ताने हेच धोरण चालवले. वाकाटकांशी वैवाहिक संबंध जोडून राजकीय संबंध दृढ केले. पुढच्या काळात आपोआपच गुप्तांची वाकाटकांवर पकड दृढ होत गेली. त्यामुळे गुप्तांना दक्षिण भारताच्या मुख्य भूमीवर संघर्ष करण्याचे कारणच राहिले नसावे. [६५] या घटनेचा आणि रघूच्या दिग्विजयात दक्षिणभारताच्या मध्यभागाचा उल्लेख नसणे या गोष्टीचा कदाचित संबंध असू शकेल. कदाचित भारतवर्षाच्या चतुःसीमा रघूने पादाक्रान्त केल्या असे वर्णन केल्याने संपूर्ण भारतवर्ष रघूच्या अधिपत्याखाली आला असे सूचित करण्याचा कवीचा मानस असू शकेल.

### ऊ) वायव्यदिग्विजय

त्रिकूटापासून खुश्कीच्या मार्गाने रघुने वायव्येस मोर्चा वळवला आणि बाजूच्या प्रदेशातील पारसीक हूण आणि कांबोज यांच्यावर जे विजय संपादन केले त्याचे काव्यमय वर्णन कवी करतो (रघु.४.६०-७०). संयमी ज्याप्रमाणे इन्द्रियांना तत्त्वज्ञानाच्या योगाने जिंकून घेतो

त्याप्रमाणे रघू पाश्चिमात्यांना जिंकण्यास निघाला अशी समर्पक उपमा कवी योजतो (रघु.४.६०) हे शत्रू परकीय आहेत; त्यांना जिंकण्यासाठी संयमाने, विचारपूर्वक, चिकाटीने प्रयत्न करण्याची आवश्यकता या उपमेने सूचित केली आहे.

वायव्य भारतातील इ.स. पहिल्या शतकापासून चौथ्या शतकापर्यंतची राजकीय परिस्थिती पाहता असे लक्षात येते की सौराष्ट्र, काठियावाड, पूर्व राजस्थान या भागात शकसत्रप प्रबळ होते. यापलीकडे गुजराथपासून सिंधू नदीच्या मुखापर्यंत पर्शियनांच्या वसाहती होत्या.[६६] वायुपुराण, ब्रह्मांडपुराण यांत वायव्य भारतातील शक, पहलव (पर्शियन), पारद (पार्थियन), यवन या जमातींचे उल्लेख येतात[६७]. सप्तसिंधुप्रदेशापासून थेट आजच्या अफगाणिस्थान पर्यंत इ.स. पूर्व २५० ते इ.स. पूर्व ७५ पर्यंत इंडो-ग्रीक राजांची राज्ये होती. नंतर हा प्रदेश कुषाणांच्या ताब्यात आला[६८] कुषाणांनाही प्राचीन भारतात शक म्हणूनच ओळखले जाते.[६९] दैवपुत्र, शाही, शाहानुशाही या कुषाण राजांनी समुद्रगुप्ताशी युद्ध करण्याचे टाळून संधी केला होता.[७०] समुद्रगुप्ताच्या मृत्यूनंतर या कुषाण-शक राजांनी डोके वर काढले असावे. द्वितीय चंद्रगुप्ताचा मोठा भाऊ रामगुप्त याच्या पराभवाला आणि बेअब्रूला हेच राजे कारणीभूत झाले असाव.[७१] म्हणून द्वितीय चंद्रगुप्ताने शक-कुषाणांचा कायमचा बीमोड करण्याचा विडा उचलला असावा. मेहरौलीलेखानुसार सप्तसिंधूच्या पलीकडे जाऊन बाल्हीकांचा त्याने पूर्ण पराभव केला. गुजराथ-काठियावाडमधील शकक्षत्रपांना पूर्ण उखडून टाकले. लहानमोठी परकीय राज्ये खालसा करून अफगाणिस्थानपर्यंत साम्राज्य विस्तारले.[७२] या विजयानंतर त्याने 'शकारि-विक्रमादित्य' हे बिरुद धारण केले. या घटनांचे प्रतिबिंब रघूच्या वायव्यदिग्विजयात पडले असावे.


ह्या पाश्चिमात्य राजांचे घोडदळ प्रबळ होते (अश्वसाधनैः रघु.४.६२) असे कवी सांगतो. कंबोजचा कांबोजांनी रघूला घोडे नजर केल्याचे कवीने म्हटले आहे-(रघु.४.७०). रघूने पाश्चिमात्यांची 'श्मश्रुल' मस्तके (रघु ४.६३) रणांगणांत लोळवली. तेव्हा उरलेले लोक 'अपनीतशिरस्त्राण' (रघु.४.६४) होऊन शरण आले. पुराणांमध्ये पहलव व पारद लोकांचे 'लांब केस' व दाढीमिशा वाढवणारे असे वर्णन येते [७३]. या भागांत सापडलेल्या इंडोग्रीक व कुषाण यांच्या नाण्यांवर दाढी वाढवलेल्या व विशिष्ट प्रकारची शिरस्त्राणे धारण करणाऱ्या राजांची चित्रे आढळतात.[७४] कालिदासाचे वर्णन प्रत्यक्ष वस्तुपरिस्थितीला धरून असावेसे दिसते.

कांबोज हा सध्याच्या अफगाणिस्थानातील हिंदकुश पर्वताच्या ईशान्येचा भाग असावा.[७५] कवीने केलेले केशर, अक्रोडाची झाडे, द्राक्षवेली, द्राक्षार्क, इ. उल्लेख (रघु.४.६५,६७,६९) याच भागाचे प्रतिनिधित्व करतात.

कालिदासाने रघूच्या हूणांवरील विजयाचे वर्णन केले आहे. पण प्रत्यक्षात इ.स. ४०० पर्यंतच्या काळात भारतीय प्रदेशाला हूणांचा उपद्रव पोचला नव्हता. इ.स. तिसऱ्या, चौथ्या शतकात हूणांचे प्रबळ राज्य खोतान, ऑक्सस-मुर्धाब नद्यांचा परिसर या भागात होते. त्याची माहिती भारतीयांना-विशेषतः राजकीय वर्तुळात वावरणाऱ्या कालिदासासारख्या बहुश्रुत कवीला होती असे दिसते. [७६]

कृष्णस्वामी अय्यंगार यांच्या मते बऱ्याच हस्तलिखितांमध्ये 'सिंधुनदी' ऐवजी (रघु.४.६७) 'वंक्षु' नदीचा उल्लेख आहे. त्यावरून कालिदासाला रघूचा पुढील मार्ग अभिप्रेत असला पाहिजे.

गुजराथमधून पश्चिम पाकिस्तानातील सक्करमार्गे अफगाणिस्थानातील हेलमंड नदी ओलांडून पर्शियाच्या दक्षिण भागात रघू पोहोचला. तेथे पारसीकांशी युद्ध करून उत्तरेला वळून त्याने वंक्षू नदी गाठली. वंक्षू म्हणजे पामीरकडून निघून कॅस्पियन समुद्राला मिळणारी अमुदरिया नदी. त्या भागात हूणांचे वास्तव्य होतेच. त्यांचा पराभव करून तो पूर्वेकडे कांबोज म्हणजे बदक्षन प्रांतात गेला. 'बदक्षन' या शब्दाचा अर्थ 'सुर्वणमय वालुका वाहून नेणाऱ्या नद्यांचा प्रदेश' असा आहे, म्हणून तर कांबोजांनी रघूला द्रव्याच्या राशी नजर केल्याचे कवी म्हणतो. तेथून काराकोरम पर्वताच्या बाजूने रघू पामीर-लडाख या भागात प्रविष्ट झाला असावा.[७७]



पारदर्शिका २

## ए) उत्तर दिग्विजय

कांबोज देशानंतर रघूने हिमालयावर आरोहण केले. या भागात 'उत्सवसंकेत' नामक गणांशी त्याचे युद्ध झाले (रघु.४.७८). 'उत्सवसंकेताचा' उल्लेख महाभारतात असून पांडवांनी त्यांना जिंकले होते.[७८] मिराशींच्या मते तो लडाखचा भाग असावा.[७९] अन्य एका मताप्रमाणे उत्सवसंकेत हा नेपाळचा भाग (संदर्भ- नेपाळ गॅझेटियर) तिबेटी वंशाच्या लोकांची ही गणराज्ये असावी.[८०] दगडांच्या सहाय्याने युद्ध करणाऱ्या पर्वतीय वन्य टोळ्यांशीही रघूला संघर्ष करावा लागला. कवीने केलेले भूर्जवृक्षांची अरण्ये, कस्तुरीमृग, गंगा यांचे उल्लेख हिमालयांतील गंगोत्रीच्या जवळपासच्या भागाकडे निर्देश करतात (रघु.४.७३.७४).

रघू हिमालयपर्वत पश्चिमेकडून पूर्वेकडे असा पार करून लौहित्या (ब्रह्मपुत्रा) नदीच्या बाजूने खाली उतरला (रघु.४.८१) तेव्हा प्राग्ज्योतिषपुर (पूर्व आसाम)[८१] आणि कामरूप (पश्चिम आसाम) हे देश त्याला शरण आले.

अलाहाबादप्रशस्तीतील वर्णनानुसार समुद्रगुप्ताने कर्तृपुर (गढवाल-कुमाँऊ), नेपाळ, कामरूप आणि डवाक (आसामचा उत्तर भाग) या भारताच्या उत्तर सीमेवरील देशांना मांडलिक बनवले होते.

अशा प्रकारे आपली विजययात्रा पूर्ण करून रघू अयोध्येला परतला.




पारदर्शिका ३

दिग्विजयी राजांचे तीन प्रकार कौटिल्याने सांगतले आहेत- धर्मविजयी, लोभविजयी आणि आसुरविजयी.[८२] त्यांपैकी धर्मविजयी राजा नैतिक दृष्ट्या आदर्श मानला पाहिजे, कारण तो केवळ यश, कीर्ती संपादन करण्यासाठी युद्ध करतो. शत्रूंचे प्राण, भूमी, वित्त न लुबाडता, त्यांच्या कुटुंबियांना व प्रजेला त्रास न देता केवळ त्यांनी

पत्करलेल्या मांडलिकत्वावर समाधान मानतो. अशा श्रेष्ठ सम्राटाने सामन्तांना न्यायाने, आदराने वागवावे. त्यांना त्यांच्या राज्यावर प्रस्थापित करून त्यांचे वैभव परत बहाल करावे असे राजनीतिशास्त्र बजावून सांगते.[७] सर्वांत महत्त्वाचे म्हणजे नीती, न्याय आणि मानवता यांचा असा आदर्श केवळ सिद्धांत म्हणून ग्रंथातच राहिला असे नव्हे; तर भारतीय परंपरेत तो व्यवहारातही पाळला गेला. मॅगॅस्थेनिस (इ.स.पूर्व ३००) पासून युआन श्वांग (इसवी सनाचे सातवे शतक) पर्यंतचे परदेशी प्रवासी आश्चर्यचकित होऊन लिहितात, की युद्ध ही वारंवार घडणारी घटना नाही. आणि युद्धे झाली, तरी प्रजेच्या दैनंदिन जीवनातत फारशी उलथापालथ होत नाही. मांडलिकांवर सम्राटाचे आधिपत्य असले तरी आपल्या राज्याचा अंतर्गत कारभार तो स्वतंत्रपणे चालवतो.[८]

कालिदाससमोर ज्याचा आदर्श होता, तो समुद्रगुप्त सुद्धा धर्मविजयी सम्राट म्हणावा लागेल. तो महत्त्वाकांक्षी होता, पण महत्त्वाकांक्षेचा अतिरेक त्याने होऊ दिला नाही. 'अनेकभ्रष्टराज्योत्सन्नराजवंश प्रतिष्ठापनोद्‌भूतनिखिलभुवनविचरणशान्तयशस्', 'स्वभुजबलविजितानेकनरपतिविभवप्रत्यर्पण' असे प्रशस्तीमधील त्याचे वर्णन आणि दिग्विजयानंतर केलेला अश्वमेधयज्ञ या गोष्टी त्याचे धर्मविजयत्व सिद्ध करण्यास पुरेशा आहेत. दुसऱ्या चंद्रगुप्तानेही प्रजेची सुखसमृद्धी हे साध्य मानून युद्ध हे केवळ साधनीभूत मानले हे फा-हैन या प्रवाशाने केलेल्या वर्णनावरून स्पष्ट व्हावे.[९]

सिद्धांतामधून आणि आचरणातून प्रकट होणाऱ्या अशा आदर्शाचे काव्याच्या माध्यमातून चित्रण करण्याचा मोह कोणत्या जातिवंत कवीला होणार नाही? कालिदासाने चित्रित केलेला दिग्विजयी नायक 'धर्मविजयी' आहे (रघु.४.४३). युद्ध संपल्यावर जित राजांची सन्मानाने पाठवणी केली, त्यांच्या मनातील पराजयाचे शल्यच नाहीसे व्हावे अशीच त्याची वागणूक होती (रघु.४.८८). दिग्विजय पार पडल्यानंतर विश्वजित् यज्ञ करून रघूने जणू आपल्या धर्मविजयावर शिक्कामोर्तब केले.

ज्ञात इतिहासातील व वर्तमानातील प्रत्यक्ष घडामोडींच्या पार्श्वभूमीवर एक ओजस्वी दिग्विजय-गाथा रचण्याची प्रेरणा कवीला मिळाली; या गाथेचा नायक म्हणून रघुराजाची योजना कवीने जाणीवपूर्वक केली असावी. पुराणांमध्ये सगराचा आणि रामाचा दिग्विजय उल्लेखिला आहे; पण रघूच्या नावे कोणत्याही दिग्विजयाची नोंद केलेली नाही. त्यामुळे कवीला आपल्या सामग्रीचा पुरेपूर उपयोग करून घेता आला. मात्र ही वास्तवातल्या एखाद्या राजाची प्रशस्ती नव्हे किंवा ऐतिहासिक दस्तऐवजी नव्हे याची जाणीव कवीने सतत जागती ठेवलेली दिसते. अत्यंत प्राचीन काळी होऊन गेलेल्या रघूचा हा दिग्विजय आहे. त्यामुळे कवीने स्वतःच्या वर्तमानाचे प्रत्यक्ष संदर्भ देण्याची दक्षता घेतलेली आहे. वंग व कामरूप ही दोन देशांची वा राजांची नावे तो वापरीत नाही. त्याऐवजी महाभारत व पुराणे यांत उपलब्ध असलेली देशनामे वा लोकनामे तो वापरतो. समुद्रगुप्ताने पराभूत केलेल्या पल्लवांचा उल्लेख न करता त्या काळात असंगत झालेल्या पण रामायण-महाभारतात येऊन गेलेल्या पांड्यांचा; गुप्तांनी पराभूत केलेल्या शक-कुषाणांचा उल्लेख करता पारसीक, हूण, यवन यांचा उल्लेख रघूच्या शत्रूंमध्ये तो करतो. गुप्तांशी मैत्रीपूर्ण राजनैतिक संबंध ठेवणाऱ्या बलाढ्य वाकाटकांचे राज्य ज्या दक्षिण भारताच्या मुख्य भूमीवर होते, त्या दक्षिण भारताच्या मुख्य भूमीचा रघुदिग्विजयामध्ये अजिबात समावेशच कवीने केलेला नाही. असे वाटते की कालिदासाचे राजनैतिक शहाणपण यातून सूचित होत असावे.

अशा प्रकारे कालिदासाने ऐतिहासिक आणि तत्कालिन राजनैतिक घडामोडी आणि त्यांना आधारभूत असलेले राजनीतिशास्त्र या सामग्रीला प्रतिभेच्या मुशीतून काढून आगळे, रमणीय रूप दिले आणि रघुदिग्विजयासारखा कविताकामिनीला खुलवणारा अलौकिक अलंकार घडवला. 'क इह रघुकारे न रमते' या उक्तीतच सर्व काही आले!

टीपा :-

१) मिराशी वा.वि. कालिदास, मुंबई, १९६९, पान ३४,३७-३८
२) उपरोक्त, पान ३५
३) अय्यंगार एस्.के. एन्शंट इंडिया अँड साउथ इंडियन हिस्टरी अँड कल्चर, मद्रास, १९४१, पान ७२
४) भिडे एच्.बी. कालिदास अँड गुप्त किंग्ज, A.I.O.C., पुणे, १९२०, खंड १, पान २
५) विष्णुपुराण, गीता प्रेस, गोरखपुर, ४.४.८३-८५
६) मिराशी वा.वि., कालिदास, पान १८८
७) अय्यंगार एस्.के. उपरोक्त ग्रंथ, पाने ७२-७३
८) मिराशी, उपरोक्त ग्रंथ, पान ५४
९) पहा, वेणीप्रसाद, थिअरी ऑफ गव्हर्नमेंट इन एन्शंट इंडिया, अलाहाबाद, १९६८, पाने २७३-७४
१०) कंगले र.पं. कौटिलीय अर्थशास्त्र, मुंबई, १९६५, भाग ३, पाने २४३
११) मिराशी, उपरोक्त, पान ५५
१२) पहा, वेणीप्रसाद, उपरोक्त ग्रंथ, उपरोक्त पान
१३) महाभारत, शान्तिपर्व, ५९.१२५
१४) हिवरगावकर-भागवत, कौटिलीय अर्थशास्त्र, पुणे, १९८८, I.४
१५) उपरोक्त ग्रंथ, I.५
१६) पहा, भट्टाचार्य अरुणकुमार, ए हिस्टरी ऑफ एन्शंट इंडिया, नवी दिल्ली, १९७९, पान २८२
१७) अलाहाबाद-प्रशस्ती, श्लोक ५-६
१८) उपरोक्त, श्लोक ३
१९) सॅलेटोर आर्.एन्., लाइफ इन द गुप्त एज, मुंबई, १९४३, पान २२
२०) कामन्दकीय नीतिसार, १२.१७.७
२१) रघुवंश, ४.१४
२२) उपरोक्त, ४.१०-१३
२३) उपरोक्त, ४.८
२४) उपरोक्त, ४.१२
२५) कौटिलीय अर्थशास्त्र, ७.९९
२६) कामन्दक, ८.१२.२-६
२७) मिराशी, उपरोक्त, पान ३५, टीप ९७
२८) रघुवंश, ४.११,२०-२३
२९) मनुस्मृती, ७.८२
३०) रघुवंश, ४.२४
३१) मनुस्मृती, ७.८४
३२) भट्टाचार्य, उपरोक्त ग्रंथ, पान २९७
३३) रघुवंश, ४.२६; ३०
३४) मनुस्मृती, ७.८४
३५) रघुवंश, ४.२६
३६) कामन्दक, ८.१३.६२
३७) कौटिलीय अर्थशास्त्र, १३.१४५
३८) उपरोक्त,१३.४४; ७.११४
३९) उपरोक्त, ७.१०७, पहा , मनु
४०) अलाहाबाद प्रशस्ती,
४१) रघुवंश, ४.३३
४२) उपरोक्त, ४.३५
४३) उपरोक्त, ४.३५
४४) उपरोक्त, ४.३७
४५) पंडित एस्.पी., रघुवंश, मुंबई, १८६९, भाग १, पान ३५
४६) भट्टाचार्य, उपरोक्त, पान २८०
४७) दीक्षित डी.बी. सिलेक्शन्स फ्रॉम संस्कृत इन्स्क्रिप्शन्स, खंड १, भाग २, पाने १९-२१
४८) भट्टाचार्य, उपरोक्त, पान २८८-८९
४९) रघुवंश, ४.३५
५०) उपरोक्त, ४.३६
५१) उपरोक्त, ४.३७
५२) बसक राधागोविन्द, हिस्टॉरिकल बेसिस अँड मॉडेल फॉर कालिदासाज् डिस्क्रिप्शन ऑफ रघूज् कान्क्वेस्ट, A.I.O.C. कलकत्ता, १९२२, पान ३२८
५३) प्राचीन भारतीय स्थलकोश, भाग १, पान ३५६
५४) कौटिलीज अर्थशास्त्र , ७.११६
५५) कामन्दक, ९.१४.१२
५६) अलाहाबाद प्रशस्ती
५७) कामकन्द, ८.१४.६
५८) भारतीय संस्कृतिकोश, खंड ५, पान ४८४
५९) रघुवंश, (पंडित आवृत्ती) पान ३७

६०) भारतीय संस्कृतिकोश, खंड ३, पान ४४७
६१) ठाणे जिल्हा राजपत्र, मुंबई, १९८२, पान ६३
६२) रोमिला थापर, ए हिस्टरी ऑफ इंडिया, खंड १, दिल्ली, १९६६, पान १३९
६३) काणे पी.व्ही. , द एन्शंट हिस्टरी अँड जिओग्राफी ऑफ कोकण, A.I.O.C. पुणे, १९१९, पान ३७२
६४) पहा, मथुरा इन्स्क्रिप्शन ऑफ चंद्रगुप्त२, सॅलेटोर, उपरोक्त ग्रंथ, पान २४
६५) सॅलेटोर, उपरोक्त ग्रंथ, पान २५
६६) डे-दासगुप्ता, ए हिस्टरी ऑफ संस्कृत लिटरेचर, खंड १, कलकत्ता, १९३७, पाने cii, cvii
६७) विष्णुपुराण, ८८.१२५ ते १३६ ब्रह्माण्डपुराण मध्यमभाग, ३.४९.११.१२
६८) मिराशी, उपरोक्त ग्रंथ, पाने ४९-५०
६९) मिराशी, लिटररी अँड हिस्टॉरिकल स्टडीज इन इंडॉलॉजी, दिल्ली, १९७५, पान १२४
७०) मुखर्जी आर.के., द गुप्त एंपायर , दिल्ली, १९६९, पाने ६८-६९
७१) मिराशी, उपरोक्त ग्रंथ, पान १२४
७२) सॅलेटोर, उपरोक्त ग्रंथ, पान ४६६
७३) ब्रह्मांडपुराण, मध्यमभाग, ३.४९, २३.२४
७४) ढवळीकर एम्.के., भारतीय नाणकशास्त्र , पुणे, १९७९, पाने ४५; ११०-११
७५) प्राचीन भारतीय स्थलकोश, भाग १, पाने ३६५-६६
७६) सॅलेटोर, उपरोक्त ग्रंथ, पान ४६४-६५
७७) अय्यंगार के. एस, उपरोक्त ग्रंथ, पाने ७३-७६
७८) रघुवंश , चित्रशाळा आवृत्ती, पुणे, १९५६, भाग १, पान १८३
७९) मिराशी, उपरोक्त ग्रंथ, पान १६७
८०) रघुवंश, पंडित आवृत्ती, पान ३९
८१) उपरोक्त ग्रंथ, पान ३९
८२) कौटिलीय अर्थशास्त्र, १२.१३६
८३) उपरोक्त ग्रंथ, ७.११४
८४) आळतेकर ए.एस्. , स्टेट अँड गव्हर्नमेंट इन एन्शंट इंडिया, दिल्ली, १९५८, पाने १९७-९८
८५) मिराशी, उपरोक्त ग्रंथ, पान ६०

• • •

(पान क्र.४ वरून)

**सुभाषित**

अन्यस्य चिकीर्षितः दोषः) घातला; परिणामी कृष्णाने दुधाबरोबर तिचे प्राणही खेचून घेतले. 'आत्मानि आपतति' चे म्हणजेच 'इच्छी परा ते येई घरा' चें उत्कृष्ट उदाहरण.

५) श्लोकात, स्वतःची स्तुती अज्ञ लोकांत करून हास्यास्पद ठरणाऱ्या व्यक्तीबद्दल सांगितले. अति सामान्य असणारा पुरुषही 'स्त्रीजन संसदि' म्हणजे स्त्रियांच्या मेळाव्यात स्वतःची स्तुती करतो आणि गर्वाने बढाया मारतो (गर्वायते) हे खरे परंतु पितळ उघडे पडल्यावाचून राहत नाही. महाभारतातल्या उत्तर गोग्रहणाच्या प्रसंगात कौरवांनी गाई पळवून नेल्याचे कळल्यानंतर गवळीवाड्याच्या अधिकाऱ्याने विराटपुत्र उत्तराला गोधन मिळवून आणण्याची विनंती केली आणि 'असे जरि मी एकाकी लहान परि सर्वतें यश जोडितो' फक्त 'मिळवा सारथ' वगैरे 'बालिश बोलि' बायकांमाजि करणारा तो राजपुत्र बायकांत बडबडला.

'कुरुकटकासि पहाता, तो उत्तर बाळ फार गडबडला'
स्वपरबळाबळ नेणुनि बालिश बहु बायकात बडबडला'

आणि

'दुर्योधन, दुःशासन, कर्ण, कृप, द्रोण, भीष्म ज्याकटकीं
त्यांत मरेनचि शिरतां, कांट्यावरी घालियतां चिरे पट की''

असे म्हणण्याची त्याच्यावर पाळी आली हे कविवर्य मोरोपंतांनी आर्याभारतातील विराटपर्वात (अध्याय३) मध्ये म्हणून ठेवलेले आहे.

• • •

# 'अमर्त्यसेनच्या निमित्ताने'

श्री. यशवंत साने

एखाद्या विद्वानाला नोबेल प्राईझ मिळाले की सर्व जग त्याच्याकडे पाहू लागते. ह्यात अस्वाभाविक काहीच नाही. सध्यांच्या जगाचा हा नियम आहे. पण, त्याचा अर्थ असा बिलकूल नाही की, ह्या 'फोकस'च्या परिवर्तुळाच्या बाहेर गुणवत्ता अस्तित्वातच नाही !

उलट, सर्वसामान्य नियम असा आहे की प्रचलित जीवनव्यवस्थेला धक्का न लावता, थोडीशी सुधारणा सुचवणाऱ्या विचारांचा 'सन्मान' लवकर व सहज होतो.

अमर्त्य सेन यांची नोबेल प्राईझ मिळवणारी कामगिरी याच स्वरूपाची आहे. प्रचलित भांडवलदारी अर्थव्यवस्थेला निव्वळ 'मार्केट इकॉनॉमी' आणि व्यक्तिगत स्वार्थावर आधारलेली जीवनव्यवस्था, ह्यावर आधारलेली अर्थव्यवस्था, अशा ह्या 'सिस्टिम' ला, थोडासा अधिक 'मानवी चेहरा' असावा व तो शक्य आहे, असे गणित, स्टॅटिस्टिक्स ह्यांच्या व इकॉनोमेट्रिक्सच्या सहाय्याने पटवून द्यावयाचा प्रयत्न -म्हणजेच-अमर्त्य सेन यांचा- 'अर्थशास्त्रीय' प्रयत्न होय. हा प्रयत्न त्यांच्या परिभाषेत मार्जिनल आहे रॅडिकल नव्हे. त्यांची नैतिकता देखील मार्क्सिस्ट (Marxist) सारखी Promethean Ethics (मानव व समाज ) ह्या एकांगी पद्धती सारखी आहे. यातून निसर्ग बाद आहे !

हे जरा कठोर वाटेल. अमर्त्य सेन यांच्या वैयक्तिक जीवनाबद्दल, त्यांच्या हार्वर्ड स्कूल येथील उच्च शिक्षणाबद्दल व त्यांच्या तत्त्वज्ञान व अर्थशास्त्र यांमधील ज्ञानाबद्दल पुष्कळ लिहिले जात आहे. वर्तमानपत्रे, मासिके, टी.व्ही. व इतर प्रचारमाध्यमे ह्यांतून स्तुतिसुमनांचा वर्षावही चालला आहे. तेव्हा ह्या लेखात ही सर्व माहिती गृहीत धरून विचार करू या. अमर्त्य सेन व नोबेल प्राईझ या निमित्ताने जास्त मौलिक विचार करू या !

अमर्त्य सेन हे भारतीय आहेत व त्यांच्या भारतीयत्वाचेच प्रतिबिंब त्यांच्या अर्थशास्त्रातील बक्षीस मिळवणाऱ्या शोधांत आहे असा 'अतिसामान्य' आरडाओरडा ब्राऊन साहेब, प्रोग्रेसिव्हज् व सेक्युलर विचारवंत करीत आहेत, असे दृश्य आपल्याला दिसेल !

एवढेच काय पण आपण जर अमर्त्य सेन यांचा एप्रिल ८, १९९३ च्या न्यूयॉर्क टाइम्स रिव्ह्यू ऑफ बुक्स, ह्यातील लेख वाचलात व त्यातील बाबरी मशीद, व 'नव हिंदू अस्मिता दर्शनाचा' तिखट निषेध-वाचलात, तर खात्री पटेल, की ह्या त्यांच्या 'राजकीय विचारांच्या प्रात्यक्षिकावरच त्यांना उचलून धरून बक्षिसपात्र ठरवण्याचा निर्णय झाला असावा. असा दाट संशय यावयाला खूप जागा आहे !

हे नक्कीच आततायी वाटेल. पण, येणाऱ्या २१व्या शतकात काही मूलगामी स्थित्यंतरे होऊ घातली आहेत. ह्या नवीन भविष्यात भारताला व त्याच्या वैदिक, साक्षात्कारी ज्ञानपद्धतीला पुष्कळ कार्य आहे.

आज जगामध्ये अर्थशास्त्राच्या संदर्भाने दोन पद्धतींचा पगडा आहे. भांडवलदारी व समाजसत्तावादी. त्यातील समाजसत्तावादी पद्धतींचा बोजवारा रशिया व इतर कम्युनिष्ट राज्यपद्धतींच्या द्वारे दृष्टोपत्तीस येत आहे. तर भांडवलदारी पद्धतीचा १८व्या व १९व्या शतकांतील वैयक्तिक स्वार्थ, नफा, मार्केट व राजकीय सत्तेचा फायद्यासाठी वापर ह्या तत्त्वावर आधारलेल्या अर्थशास्त्राला, जेव्हां समानसत्तावादी जाणीवेला तोंड द्यावयाला लागले, तेव्हा थोडासा 'मानव सहृदयतेचा चेहरा' एक मुखवटा म्हणून घ्यावा लागला. त्यालाच 'वेल्फेअर इकॉनॉमिक्स' म्हणतात. ह्या भांडवलदारी 'वेल्फेअर इकॉनॉमिक्स' ह्या पद्धतीत सुद्धा जेव्हा पराभव पत्करावा लागतो, तेव्हा तिला सल्ला देणारे विचारवंत ह्यांना नोबेल प्राईझ मिळू शकते, नाही तर, ते कार्ल मार्क्स , एंजल्स किंवा महात्मा गांधींना ही मिळावयास

हवे होते. पण, 'स्वीडिश ॲकॅडेमी ऑफ सायन्स' ह्या संस्थेच्या समितीवर ज्या विचारधारेची माणसे अधिकारावर असतील त्यांच्या पसंतीला उतरणाऱ्या विचारालाच नोबेल प्राईझ मिळणार हे उघडच आहे.

पण, आपल्याला ह्या निमित्ताने जो विचार करावयाचा आहे तो असा की, 'अर्थशास्त्र' हे असे शास्त्र आहे का ? की दोन गुणीले दोन बरोबर चार ह्या गणिताप्रमाणे त्याला निश्चित फलप्राप्ती दर्शवता येते ? असे बिलकूल नाही. पण, हे सत्य सर्वसाधारण माणसाला विश्वासात घेऊन सांगितले जात नाही. याचे उघड कारण म्हणजे ज्या सत्ताधारी वर्गाला सर्वसाधारण मानवी समाजावर व निसर्गाच्या संपत्तीवर मालकी हकाने सुखोपभोग घ्यावयाचा असतो. त्यांना, त्या सत्तेखाली भरडून जाणाऱ्या जनतेवर एक वैज्ञानिक श्रद्धेचा पगडा ठेवणे आवश्यक असते. एका कृत्रिम न्यायव्यवस्थेचा आभास निर्माण करावयाचा असतो.

त्यामुळे, ह्या भांडवलदारी-बेगडी लोकशाही व जागतिक पोलिसी राजसत्ता लादणाऱ्या अमेरिकन, ब्रिटीश वगैरे युरोपियन राजसत्तेला उपयोगी पडणाऱ्या 'मर्त्य अर्थशास्त्राला' मधून मधून अमृताचा चमचा देणारी 'नैतिकता' अमर्त्य सेन आपल्या गाजावाजा झालेल्या 'अर्थशास्त्रातील नैतिकता' ह्या थिसीसने देत आहेत. आणि ती देखील अत्यंत क्लिष्ट अश्या गणिती पद्धतीने की ज्यामधील त्रुटी गणितशास्त्राचा परिचय नसलेल्या सामान्यांना अगम्य व म्हणून दुर्गम वाटाव्या. वास्तविक, दुष्काळ पडतात तेव्हा अन्नपुरवठ्याचा अभाव असतोच असे नाही त्याच्या वाटपामध्ये गोंधळ असतो म्हणून होतो. ह्या अमर्त्य सेन यांच्या गोष्टीमध्ये नवीन असा कोणता शोध आहे?

अन्नावर मालकी हक्क नाही असा भारतीय दृष्टीकोन आहे. विवरण हे विश्वस्त संस्थेप्रमाणे व्हावे. अन्नपुरवठा सृष्टीच्या नैसर्गिक कृतीमुळे होतो. मानवी प्रयत्न हा निमित्तमात्र असतो. तसेच, जेव्हढे जीवमान मात्र इथे पृथ्वीवर जगतात त्यांना पुरेसे अन्न इथेच निर्माण होते. पशु, पक्षी व मानव ह्यावर जगतात. त्यावर त्यांचा हक्क आहे. हे माओला आणि युरोपियनांना मानवणार नाही. पर्जन्याची जी चक्रे ऋतूप्रमाणे फिरतात त्यावर गीतेमध्येही भाष्य आहे. 'अन्न' ह्याची व्याख्या परस्पर नात्यावर अवलंबून असते. भक्ष्य व भोज्य ह्यांच्या व्याख्या प्राणिमात्रांच्या नैसर्गिक प्रवृत्तिवर बांधलेल्या दिसतील. ह्या 'वैदिक दर्शनाचा' ह्या अर्थशास्त्रीय विद्वानांना एक तर परिचय नाही किंवा ते या भारतीय ज्ञानाकडे जाणून बुजून दुर्लक्ष करतात. तेव्हां, मानवी समाजाने ज्या आपल्या 'स्टेट' म्हणजे राजकीय सत्ताकेंद्र व 'पैसा' म्हणजे अर्थसत्तेचे माध्यम - ह्या समीकरणाने 'अन्नासारख्या' मूलभूत जीवनोपयोगी वस्तूंमध्ये वितरण व्यवस्थेमध्ये (डिस्ट्रीब्यूशन सिस्टिम) गोंधळ घातले, त्यावर इतक्या उशीरा हे भाष्य कां यावे ? पश्चात् बुद्धी सारखे अन्नाच्या वाटपात गोंधळ हा आर्थिक अक्षमता गरीबांची असल्यामुळे व वितरणांत गोंधळामुळे असे म्हणून 'अन्न' हे मालकी हक्काचा विषय नसावा असे न म्हणता नवीन नैतिकता सांगणारे हे विद्वान कोणाची वकिली करताहेत बरे ? हे वकिली बुद्धीचे लक्षण नव्हे काय ? पण, मग याला नोबेल प्राईझ कां ?

तर, त्याचे कारण असे आहे की सर्वसामान्य जनतेला आता या अन्नाच्या काय किंवा संपत्तीच्या काय- वितरणांतील गोंधळाचे ज्ञान होऊ लागले आहे व त्यामुळे संघर्ष करून ते 'अशा' वर्गीय राजसत्तेला हाकलून , नव्या वैचारिक सत्तेला स्थापन करण्याचा उद्योग जगभर करू लागले आहेत.' तेव्हा या गरीब, अज्ञानी समाजाला, राष्ट्रांनी यापासून परावृत्त करून एखाद्या नव्या अर्थशास्त्रीय बेगडी समजाच्या भ्रमात गुंतवण्याची योजना व सुधारणा, हे अमर्त्य सेन सुचवताहेत. या परीक्षेवरच व गुणवत्तेवरच मग हे युरोपियन संस्कृतीचे हे मिळणारे 'नोबेल प्राईझ'. हे नवीन शहाणपण सुचवल्यामुळे 'अर्ध त्यजति पंडित: ' या न्यायाने समूळ नाशापासून वाचवणाऱ्या -'बादशहाच्या चतुर मंत्र्याला' बक्षीस नको का ?

हे लिहिण्याचे कारण असे की ह्या भांडवलदारी फ्री मार्केट ह्या बेगडी मुखवट्याचे मुखजन कार्ल

मार्क्सच्या विचाराने कधीच झाले होते. त्यातील न्याय, आसुरी संपत्ती संचय, क्रूर नफेखोरपणा केव्हाच उघडा पडला होता !

पण, काय कार्लमार्क्सच्या तत्त्वज्ञानावर आधारलेल्या राज्यपद्धतीत तर, ह्याहून मोठे घोटाळे घडताहेत त्याचे काय? भौतिकवादावर फार विश्वास ठेवणाऱ्या सत्तेला भौतिकवादातही सुखप्राप्ती करता येत नाही ? सुखाच्या कल्पनेवर काही विचार करावा हा साधा विचार सुद्धा सुचत नाही. हा भौतिकवादाचा पराभव आहे. तेव्हा या पार्श्वभूमीवर आता जरूर सांगावयाला हवे की, आता एका नवीन तिसऱ्या मार्गाचा उदय क्षितिजावर होऊ घातला आहे. तो आहे 'नूतन वैदिक राज्यपद्धती' व त्याला अनुलक्षून अर्थशास्त्र. आज त्याला हिंदू राष्ट्रवाद व विश्वहिंदू समाजरचना आणि त्यातील 'हिंदू इकॉनॉमिक्स' किंवा 'भारतीय अर्थशास्त्र' म्हणू या. अर्थात त्याचे सगळे अध्याय आज पूर्णावस्थेत आविष्कारलेले नाहीत, पण, त्याची मूलतत्त्वे जरूर पाहता येतील आणि मांडली जात आहेत. त्याला ज्या राजकीय व्यावहारिक सत्तेचा आधार व पाठिंबा लागतो त्या सत्तेचा चेहराही आकारू लागला आहे, त्या तत्त्वांना जी वैश्विक मूलतत्त्वांची बैठक असावी लागते तीही भारतीय दर्शनातील वैदिक ज्ञानावर आधारलेली उदयाला येत आहे. त्याची परिमिती व व्याप्ती निव्वळ जागतिक नव्हे तर वैश्विक आहे आणि त्याचे सध्याचे 'बालकृष्णी' स्वरूप 'हिंदू अर्थशास्त्र' असे आहे. कारण त्या शास्त्राचा आग्रह फक्त हिंदू समाजच करत आहे. हा हिंदू शब्द जाचत असेल त्याला नाइलाज आहे. 'रोमन लॉ' नाही का आज आपण सर्व पाळत आहोत.

अमर्त्य सेन ज्या वेल्फेअर, भांडवलदारी, लोकशाही व सेक्यूलर (निधर्मी) मार्केट इकॉनॉमिक्सच्या बाजूने सुधारणेचा मुखवटा घेऊन उभे आहेत त्यांची जातकुळी व दुसऱ्या बाजूला भारतीय तत्त्वज्ञानावर किंवा जास्त योग्य म्हणजे भारतीय दर्शनावर आधारलेल्या अर्थशास्त्रीय नीतीमध्ये मूलगामी फरक दर्शवणारी जात काय आहे हे थोडेसे सूत्रपद्धतीने पाहू या-

| 'क्ष' पंथ | 'ज्ञ' पंथ |
|---|---|
| वेस्टर्न वेलफेअर भांडवलदारी भौतिकवादी अर्थशास्त्र | भारतीय अर्थशास्त्र आध्यात्मिक आधार-स्पिरिच्युअल दर्शन |
| माणूस-अर्थशास्त्रातील यंत्रवत्-भौतिक वस्तूसमान घटक सोशल ॲनिमल | माणूस-स्पिरीच्यूअल बीइंग, आत्मस्वातंत्र्याचा अधिकारी, निसर्गातील बुद्धिमान पण जबाबदार घटक व पुढारी |
| माणूस-स्वार्थी, अर्थ व काम यांचा गुलाम, भौतिक सुखाचा भोक्ता, चंगळवादी | माणूस-धर्म, अर्थ, काम मोक्ष या चतुष्ट्याने आपला आत्मोद्धार शोधणारा |
| माणूस-वैयक्तिक स्वार्थ साधणारा | माणूस-व्यक्ती, समष्टी, सृष्टी यांचा समुच्चयाने उद्धार साधणारा |
| माणूस-भोगसाधनांचा साठा निसर्गाचा अपहार करणारा प्रोमेथियन-मानव केन्द्रित स्वार्थ हाच न्याय समजणारा. | माणूस-त्यागावर आधारलेली समाजरचना बघणारा, अपरिग्रही, अंत्योदयी कर्तव्य व ऋण ओळखणारा व सामाजिक, पितर, वारस, संतती, सृष्टी, प्राणी, वनस्पती यांचे ऋण फेडणारा. |
| माणूस-वैयक्तिक सुखासाठी आक्रमण, वैयक्तिक किंवा विशिष्ट गटसमूहाच्या फायद्यांसाठी आक्रमण करणारा हिंसक प्रवृत्ती आवश्यक मानणारा. या ऐहिक भौतिक जीवनाच्या-पलिकडे कोणतेही अस्तित्व न मानणारा (चार्वाक दर्शनी) | माणूस-अद्वैत वैश्विक धर्म मानणारा, सनातन चिरंतन वैश्विक सत्य, ऋततत्त्वे विश्वाच्या मुळाशी बघणारा विश्वाचा व्यवहार त्याग ह्या यज्ञव्यवहारांत बघणारा. |

| | |
|---|---|
| भौतिक वादी | भौतिक अस्तित्व व आध्यात्मिक धारणा यांमध्ये समन्वय साधणारा. |
| केवळ भौतिक उत्कर्षवादी आणि त्यांतच घोटाळा करणारा. व्यक्तिवादी व जीव जीवांत भेद बघणारा, संघर्ष बघणारा. | भौतिक व स्पिरिच्युअल समन्वयी उत्कर्ष साधणारा. वैश्विक उन्नतिपथावर चालणारा. |
| | ब्रह्मात्म ऐक्य सर्व जीवांत बघणारा, त्याग व सहकार ह्यावर जीवनधारणा बघणारा. |
| निसर्गावर बलात्कार करून उत्पादन घेणारा (फ्रान्सिस बेकनच्या वैज्ञानिक अहंकारासारखे). | निसर्गाचे 'दोहन' म्हणजे गायीचे दूध काढून उत्पन्न घ्यावे. निसर्गाला किंवा गायीला मारून किंवा असंतुष्ट ठेवून नव्हे. |

अमर्त्य सेन हे पूर्णपणे जरी नव्हे तरी मोठ्या प्रमाणात यांतील 'क्ष पंथ' यावर विश्वास ठेवणारे आहेत. ह्याच पंथात भांडवलदारी व साम्यवादी पंथ मोडतात. आणि ह्या दोन्हींचे वैश्विक दर्शन अपूर्ण, तोकडे व अज्ञानी आहे. ह्या विश्वाचे संपूर्ण दर्शन भारतीय दार्शनिकांनी दिले आहे, आणि, त्या तत्त्वावर चालण्यासाठी योग्य अशी समाजव्यवस्था, धर्म, आचरण, न्यायव्यवस्था व दैनंदिन जीवन यांचा आराखडा भारतात थोड्या अर्थाने राबवलेला होता. पण मोगल व युरोपियन आक्रमणांनी त्याचा विध्वंस करून त्याची प्रगती खुंटवून टाकली व त्यातील परंपरा, ज्ञान ह्यांची होळी पेटवली त्यातील धनसंपत्तीची लूट केली, हा ताजा इतिहास आहे. त्यांच्या 'रामासारख्या' आदर्शवादाची टिंगल अमर्त्य सेन करतात, यावरून त्यांच्या तत्त्वज्ञानाची बैठक कोणती आहे हे समजून यावे !

ह्याकरिताच टाइम्स ऑफ इंडियाचे विद्वान कॉलम्निस्ट श्री. प्रफुल बिडवाई १८ ऑक्टोबरच्या अंकात लिहितात की-

" The honouring of Sen indicates, the humanist-radical-secular project. It is a reaffirmaction of Modern Rationality Pluralism and the importance of Human agency in the World including its apparently Opaque economic processes, state structures and above all structures of mind."

ह्यातला मुख्य शब्द म्हणजे "सेक्युलॅरिझम'!! इकॉनॉमिक्स म्हणजे अर्थशास्त्रांत नैतिकता हवी असे अमर्त्य सेन म्हणतात. पण याचा अर्थ ती नैतिकता अर्थशास्त्रात आज नाही व अर्थशास्त्राच्या नियमांत आपसुकच नीती संभाळली जाईल याची योजना अंतर्भूत नाही हे उघड आहे ! मग, अर्थशास्त्राचा हेतू कोणता? राष्ट्राची संपत्ती फक्त वाढवणे हा होय ? संपत्ती कशी मोजावयाची ? कशांत मोजावयाची ? दगड, माती, पैसा, नाणी, डॉलर, क्रेडिट अकाउंट्स्, अमेरिकेतील आपली पत, जपानशी आपले व्यापारी संबंध आणि शेअर बाजारामध्ये होणाऱ्या चढउतारावर त्याचे मोजमाप! अमर्त्य सेन यांची ह्या पद्धतीवर मूलगामी अशी तक्रार नाही. तर हे सर्व चांगलेच आहे- शिवाय याला दुसरा पर्याय नाही-शोधण्याची गरजही नाही हा विश्वास ! हे थोड्या सुधारणेने राबवता येईल ही गणिते! मग, जास्तीत जास्त काय तर थोडी मलमपट्टी गरीबांना किंवा "हॅव्ह नॉट्स्' ना !! एवढा मोठ्ठा शोध त्यांनी लावला. आणि यावर सगळे 'भारतीय' प्रोग्रेसिव्हज् मार्क्सिस्ट, समाजवादी, कॉंग्रेसी खूष आहेत व कौतुके करीत आहेत. याहून भारतीय दर्शनाचा अपमान काय व्हायचा शिल्लक राहिलाय ? त्यांना समजत नाही किंवा आठवत नाही की संपत्ती जशी नैसर्गिक आहे तशीच ती जीवनपद्धतीत व मार्गक्रमणात आहे.

•

युद्ध व संघर्ष लादणाऱ्या राजसत्तेविरूद्ध 'ब्र' ही न काढणारे हे अमर्त्य सेन व त्यांचे चाहते भारताने संरक्षणासाठी पाऊल टाकले तर त्याचा दोष अमेरिकेला देत नाही. याहून पक्षपात कांही निराळा असू शकतो काय ? पण, जागतिकीकरणाचा उद्घोष करणारे हे सर्व

युद्धांत होणाऱ्या संपत्तीच्या नाशाबद्दल व त्या पोरणाच्या गुन्हेगारी राजसत्तेविरूद्ध आवाज काढीत नाहीत. आणि ती जबाबदारी कुणाची हे ठरवत नाहीत.

हा अधर्म का ? कारण त्याना आपल्या अर्थशास्त्रातून, राज्यशास्त्रातून, समाजशास्त्रातून उखडून टाकले आहे. तडीपार केले आहे. त्यांचा राग होता 'रिलिजन' व 'सेमेटिक रिलिजन' व 'मिशनरी रिलिजन' वर व योग्य होता, पण त्यांनी 'धर्म' म्हणजेच रिलिजन असा मूर्ख समजूतीचा घोटाळा घातला आहे. 'धर्म' म्हणजे 'वैश्विक जीवनाचा कायदा व त्याचे पालन' हे नियम भारतीय ऋषींमुनींनी अपरोक्ष चालले-जाणले व समाजाला सूत्रपद्धतीने सांगितले. ते नियम-ती नैतिकता काय आहे याकडे या विद्वानांचे पूर्ण दुर्लक्ष आहे आणि अमर्त्य सेन तर अपराधी आहेत कारण, खुद्द रवींद्रनाथ टागोरांच्या शांतिनिकेतनमध्ये त्यांचा जन्म झाला. आणि स्वतः तिसरे लग्न करून रामाच्या एकपत्नीत्वाच्या आदर्शाची आठवण बाळगणाऱ्या हिंदूंची टिंगल करण्याचा प्रमाद त्यांनी आपल्या ८एप्रिल १९९२ च्या न्यूयॉर्कच्या लेखात करून आपल्या नीतितत्त्वांचा बेगडीपणा उघडा केला आहे. समान नागरी कायदा संदर्भात मुसलमानांच्या चार बायका करण्याचा धार्मिक कायद्याला, विरोध करणाऱ्या भारतीयांच्या संदर्भात ते म्हणतात की हा हिंदूंचा, "Sexist Male point of view' आहे.

त्यांचा एक प्रबंध आहे की 'Economic Inequality' आर्थिक असमानता. पण, समाजातील तळागाळातील गरीबांपर्यंत राष्ट्रीय संपत्तीचा किंवा जागतिक संपत्तीचा झरा पोचत नाही यावर ते गणिती उत्तर शोधतात आणि ह्या नैतिक दृष्टीकोनाबद्दल वाहवा मिळवतात. मग, ह्या अनैतिकतेची जबाबदारी 'भांडवलदारी अर्थशास्त्राची' तात्त्विक भौतिकवादी बैठक आहे, त्यावर न टाकतां, केवळ गणितातील अडचण असे भासवतात. ही दिशाभूल ते कोणाची करूं इच्छितात ?

आणि या संशयाचे कारण म्हणजे-खुद्द अमेरिकेत हा 'झरा' निग्रो घेटोजना मिळतो आहे कां ? लोकशाही व हक्कांची जाणीव व साक्षरता असूनही !

एवढेच काय पण, ह्या जगात जी 'मागासलेली गरीब' राष्ट्रे आहेत त्यांची जी इतिहासांत 'ड्रेन' ह्या राक्षसी लूटमारीने राष्ट्रातील संपत्तीची लूट झाली व आज त्याचा परिणाम म्हणून ज्या कर्जाच्या ओझ्यात अडकलेल्या त्यांची टेक्नॉलॉजी भांडवलाची आयात करण्याची मनोवृत्ती, व्याजाचे दर, बॅलन्स ऑफ ट्रेड, डॉलर-रूपया नाते व डिव्हॅल्युएशन ऑफ करन्सी वगैरे नवीन अर्थशास्त्रीय नियमांनी लूट होते आहे. त्यांतील 'अनैतिकतेवर' ते आपले गणिती औषध का बरे सुचवत नाहीत ? जागतिक बँका व त्यामागे लपलेले भांडवलदार आणि मल्टि नॅशनल यांच्या मालाला दरवाजे खिडक्या व मार्केट खुली करा हे सांगणारे 'अर्थशास्त्रीय लांडगे तत्त्वज्ञान' ह्यावर ते का बरे भाष्य करत नाहीत ? कारण वकिलाला फक्त क्लायंटचा इंटरेस्ट पहावयाचा असतो. आणि, ह्या पार्श्वभूमीवर अमर्त्य सेन यांच्या 'मर्त्य अशा भौतिकवादी भांडवलदारी (जागतिक) पद्धतीवर' पुष्कळ भाष्य करता येईल पण त्याला ही पाने पुरी पडणार नाहीत.

मुख्य मुद्दा आहे की नैतिकता ही कशातून स्फुरते? जागतिक नैतिकतेच्या कल्पना ह्या कोणकोणत्या बदलांतून गेल्या ह्याचा विचार व्हावयाला हवा. अर्थशास्त्र त्यापासून कोरडे राहूच शकत नाही. राजसत्तेला हा सोयीस्कर आडोसा अर्थशास्त्राने देऊ नये.

सबंध मानवजात एका वैश्विक जीवनोद्धाराला व उन्नतिक्रमाला बांधलेली आहे. त्याचे नांव 'आत्मोन्नती' हे आहे. हे संक्रमण भौतिक व आध्यात्मिक अश्या दोन पातळीवर होत आहे. समन्वयी आहे.

महायोगी अरविंदांच्या भाषेत विश्व व सृष्टी यांच्या अविचल व नित्य नियमांत जीवन जगत असते. सामाजिक व आर्थिक संस्थांनी या सनातन धर्मसत्तेच्या नियमात 'युगानुकूल' बदल करून आपली उन्नती व उद्धार करावयाचा असतों धर्म ह्या संपूर्ण अर्थपूर्ण, अर्थगर्भित शब्दाला अभारतीय भाषेत वा संस्कृतीत प्रतिशब्द नाही.

(पान क्र. ३१ वर)

# अमर्त्य कुमार सेन - अर्थशास्त्राचा मानवी चेहरा

**डॉ. अशोक धोपेश्वरकर**

पुत्र व्हावा ऐसा गुंडा
ज्याचा तिन्ही लोकीं झेंडा ॥

१४ ऑक्टोबर १९९८ रोजी श्री. अमर्त्य कुमार सेन यांना १९९८ सालचे अर्थशास्त्राचे नोबेल पारितोषिक मिळाल्याचे वृत्त मिळताच सेन यांच्या मातोश्री श्रीमती अमिता सेन यांना धन्य वाटले असेल. त्यांच्या नामकरण प्रसंगी प्रत्यक्ष गुरुदेव रवींद्रनाथांनीच 'अमर्त्य' हे नाव सुचवलं होतं व हा मुलगा त्रिखंडात कीर्ती मिळवील असे भाकीत केले होते. गुरुदेवांप्रमाणेच नोबेल पारितोषिक मिळवून सेन यांनी ते बोल खरे केले आहेत. संपूर्ण भारत देशाच्या जनतेची हृदये आनंदाने उचंबळून यावीत अशीच ही घटना !

श्री. अमर्त्य सेन यांचा जन्म ३ नोव्हेंबर १९३३ सालचा. शांतिनिकेतनात जन्मलेल्या अमर्त्य यांना त्यांची आई व आजोबा क्षितिमोहन यांनी घडवले. आजोबा संस्कृतचे गाढे विद्वान. त्यांचा गाढा संस्कार व आईच्या दक्ष व डोळस पालनामुळे ते नेहमीच हुशार व चतुरस्र बुद्धिमत्तेचे म्हणून प्रसिद्ध होते. गणित, विज्ञान व संस्कृत सर्वच विषयात त्यांना रुची होती. त्यांचे मित्र श्री. सुखमय चक्रवर्ती- जे पुढे भारतीय नियोजन मंडळाचे उपाध्यक्ष झाले-यांनी सेनना आपल्याबरोबर अर्थशास्त्राच्या अभ्यासात खेचून आणले. सेन यांनी १९५३ मध्ये कलकत्याच्या प्रेसिडेन्सी कॉलेज मधून बी.ए. ची पदवी प्राप्त केली. तीही प्रथम क्रमांकाने! दुसरा अर्थात सुखमय चक्रवर्तींचा होता. एम.ए. नंतर ते जादवपुर विद्यापीठात १९५८ पर्यंत अर्थशास्त्राचे प्राध्यापक होतते. १९५९ साली केंब्रिज विद्यापीठाने दिलेली फेलोशिप स्वीकारून त्यांनी संशोधन केले व पी.एच.डी. करिता Choice of Techniques हा प्रबंध सादर केला. तंत्रज्ञानाची निवड करताना कोणते निकष असावेत याची चर्चा करताना त्यांनी अशियाई मागास देशानी-श्रमप्रधान तंत्रांचा अवलंब करणे हितावह आहे असे सेन यांचे प्रतिपादन होते.

१९६३ मध्ये दिल्ली स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स या संस्थेत प्राध्यापक म्हणून ते रुजू झाले. ते अत्यंत प्रभावी शिक्षक म्हणून विद्यार्थिप्रीय तर झालेच पण त्यांच्या खुल्या दिलाने विद्यार्थ्यांशी वागण्याने ते सर्वांनाच आपले वाटत. विद्यार्थ्यांच्या सतत गराड्यात राहून कोणत्याही विषयाची चर्चा करण्याच्या त्यांच्या सवयीमुळे १९६९ साली त्यांच्यावर नक्षलवादी असल्याचा आरोप झाला होता. कारण त्यांच्या भोवतीच्या विद्यार्थ्यांत नक्षलवादाने प्रभावित विद्यार्थीही असायचे. याच काळात त्यांनी भारतात वारंवार उद्भवणारे दुष्काळ व त्यांचे आर्थिक परिणाम अभ्यासतांना दुष्काळाचे दुष्परिणाम अन्नधान्याच्या अभावामुळे नव्हे तर क्रयशक्तीच्या अभावामुळे होतात हे सांगून, 'सरकारने लोकांची क्रयशक्ती वाढविण्याचे उपाय योजावेत असे सुचवले.

१९७१ ला त्यांना लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स या संस्थेने पाचारण केले. त्यानंतर ऑक्सफर्ड विद्यापीठात, अमेरिकेतील हार्वर्ड विद्यापीठ तसेच M.I.T. येथेही त्यांनी प्राध्यापकपद भूषविले. सध्या ते केंब्रिज विद्यापीठातील ट्रिनिटी कॉलेज येथे मास्टर आहेत. त्यांची आतापर्यंत २० पुस्तके व २२५ निबंध वेगवेगळ्या नियतकालिकातून प्रसिद्ध झाले आहेत. विद्यार्थ्यांत ते प्रिय आहेतच पण आपल्या सहकाऱ्यांनाही प्रिय आहेत. त्यांना नोबेल पारितोषिक दिल्याचा आनंद त्या साऱ्यांना तर झालाच, पण ते त्यांना मिळेलच किंबहुना या आधीच मिळायला हवे होते असा त्यांच्या सहकाऱ्यांचा कल होता. त्यांचे M.I.T. मधील सहकारी नोबेल पारितोषिक विजेते श्री. रॉबर्ट सोलो यांच्या मते, "सेन म्हणजे त्यांच्या व्यवसायातील सदसद्विवेकबुद्धीच. अर्थशास्त्राच्या सिद्धांताना मानवी चेहरा देण्याचा सेन यांचा आग्रह आता सर्वमान्य झाला आहे."

श्री. सेन यांनी सुचविलेल्या दारिद्र्यमापन पद्धतीचा संयुक्त राष्ट्रांनी (UNO) स्वीकार केला आहे व त्यावर

आधारित Human Development Index विकसित केला आहे.

श्री. सेन यांचे विचार व लेखन सुस्पष्ट आणि परखड आहेत. ते विचाराने आधुनिक, निधर्मी आहेत व औद्योगिक, खुल्या व विकासवादी अर्थव्यवस्थेचे पुरस्कर्ते आहेत. बाजारपेठेला महत्त्व देतानाच अनेक क्षेत्रात शासनाचा आवश्यक तितका व आवश्यक तेव्हा हस्तक्षेप असायला हवा असे सेन सुचवतात.

आर्थिक विकासासंबंधी विचार मांडतांना केवळ दरडोई उत्पादन हे परिपूर्ण निर्देशक नाही. दरडोई उत्पादनइतकेच देशातील उत्पन्नाचे वाटप कशा प्रकारे होते हे जाणणेही आवश्यक आहे असे सेन म्हणतात. बाजारपेठ, अनियंत्रित स्वातंत्र्य हेच फक्त विकासाचे अधिष्ठान मानणाऱ्या अर्थशास्त्रज्ञांना सेन यांनी बजावून सांगितले आहे की, बाजारातील करारमदारांच्या योग्य अंमलबजावणीसाठी आवश्यक असलेली कायद्याची चौकट फक्त शासन-कार्यक्षम शासनच- देऊ शकते. जेव्हा बाजारपेठेची यंत्रणा विकास घडवून आणण्यास अक्षम ठरते तेव्हा शासनाचा हस्तक्षेप आवश्यक ठरतो. रोजगारनिर्मिती व क्रयशक्तीचा अभाव दूर करणे तसेच अविकसित देशात नव्या बाजारपेठा (चलन बाजार, भांडवल बाजार इत्यादि) उभारण्यात व त्याद्वारेच जलद विकास घडवून आणण्यात शासन महत्त्वाची भूमिका बजावू शकतते. या ठिकाणी आग्नेय आशियाई देशातील सरकारांनी जलद विकासाच्यासाठी केलेल्या कार्याचा संदर्भ श्री. सेन यांनी दिला आहे. विकास हा फक्त दरडोई उत्पन्नाच्या वाढीत मोजू पहाणाऱ्या अर्थशास्त्राला त्यांनी मूल्ये व तत्त्वज्ञानाचे नवे परिमाण दिले आहे असे म्हणता येईल.

मागास देशांनी चिरस्थायी दीर्घकालीन आर्थिक विकास साधण्यासाठी मनुष्य धोरणे आखावयास हवीत. त्याकरिता उत्पन्नाचे अधिक समान वाटप, श्रमांची उत्पादकता वाढण्यासाठी श्रमिकांचे राहणीमान सुधारणे, प्राथमिक शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार, खेडोपाडी राहणाऱ्यांना चांगल्या आरोग्यसुविधा पुरविणे, तसेच स्त्रीवर्गाला विकासाच्या समान संधी उपलब्ध करून देऊन स्त्रियांना त्यांचे अधिकार बहाल करणे ही शासनाची आद्य कर्तव्ये आहेत असे सेन म्हणतात. गरिबी दूर करण्यासाठी त्यांच्यामध्ये क्रयशक्ती निर्माण करणे- रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे व अत्यावश्यक पायाभूत क्षेत्रात (उर्जा निर्मिती, वाहतूक, दळणवळण इ.) खाजगी गुंतवणूक होत नसेल तर ती करणे हे सरकारचे कामच आहे असे सेन मानतात. जोपर्यंत लोकांच्या सृजनशीलतेला समाजाच्या उत्पादनशक्तीला व सर्व स्त्रीपुरुषांच्या राजकीय स्वातंत्र्याला पूर्ण वाव मिळत नाही तोपर्यंत देश खऱ्या अर्थाने विकसित व सुसंस्कृत होऊ शकणार नाही असे सेन प्रतिपादन करतात. भारतात खुली अर्थव्यवस्था आणल्याबद्दल माजी अर्थमंत्री श्री. मनमोहन सिंग यांचे अभिनंदन करताना, आर्थिक विकास दीर्घकाळ व्हावयास हवा असेल तर भारताने भू-सुधारणा, सार्वत्रिक शिक्षण व सार्वजनिक आरोग्य सुविधा पुरविणे, गरीबीचा बीमोड व स्त्रीला स्वातंत्र्य व सत्तेत वाटेकरी करून घेणे आवश्यक असल्याचे सेन यांनी म्हटले आहे.

व्यक्ती म्हणून सेन बरेचसे अबोल असले तरी विद्यार्थ्यांचे , सहकाऱ्यांचे व नातेवाइकांचे , साऱ्यांचेच त्यांच्यावर प्रेम आहे. अर्थशास्त्राव्यतिरिक्त संस्कृत व बौद्ध तत्त्वज्ञानाचे ते अभ्यासक तर आहेतच. शिवाय सुतारकाम व चित्रकलेवर पण त्यांनी प्रेम केले आहे. नाट्यकला त्यांना खास आवडते आणि क्रिकेट ही त्यांना भावते-विशेषतः त्यांचा आवडता सौरभ गांगुली फलंदाजी करत असतो तेव्हा. वयाच्या १९व्या वर्षीच त्यांना कॅन्सर झाल्याचे निदान होऊन उपचार झाले पण नंतर तो कॅन्सर नव्हताच असे सिद्ध झाले. तोपर्यंत त्यांच्या शरीरावर प्रारणाचा (Radiation) इतका मारा झाला होता की जास्तीत जास्त ते पाच वर्षेपर्यंत जगतील असा डॉक्टरांचा कयास होता. सुदैवानं-भारताच्या आणि अर्थशास्त्राच्याही-ते सारे खोटं ठरले. त्यांनी अशाच प्रकारे अर्थशास्त्रात नवे संशोधन करावे आणि सर्व भारतीयांची मान अभिमानाने उंच व्हावी हीच साऱ्यांची ईश्वरचरणी प्रार्थना. श्री. सेन यांना देव दीर्घायुष्य देवो !

• • •

# ग्रंथांच्या वाढत्या किमती : माहिती उपलब्ध होण्यातील अडसर

प्रा. मोहन पाठक

माहिती संस्कृतीच्या आजच्या युगामध्ये माहिती ही समाजातील सामान्यातील सामान्य माणसाची गरज ठरली आहे. माहितीचे वितरण किंवा संक्रमण होण्याकरिता माध्यमांची उपलब्धता ही देखील मोठी गरज आहे. माहिती देणाऱ्यापासून मिळवणाऱ्यापर्यंत माहितीचे संक्रमण शक्य व्हावे यासाठी ग्रंथ, नियतकालिके व अन्य ग्रंथेतर साहित्य, सीडी-रॉम इत्यादी अनेक प्रकारची माध्यमे आपण आज वापरत असतो. गेल्या पन्नासएक वर्षात ग्रंथालयातील संग्रहांवरही या माध्यमांचा प्रभाव पडत असून ग्रंथ व मुद्रित स्वरूपाच्या माध्यमांना पर्यायी माध्यमे शोधली जात आहेत, त्यांचा वापर करण्याकडे माहितीच्या उपभोक्त्यांची प्रवृत्ती वाढत आहे. असे असले तरी औद्योगिक संस्कृतीकडून माहिती संस्कृतीकडे उत्क्रान्त होत असलेल्या आजच्या माहिती युगामध्ये बहुसंख्य ग्रंथालयांमध्ये मुद्रित स्वरूपातील साहित्याचाच मोठ्या प्रमाणात आढळ होतो. त्यामुळे नजिकच्या भविष्यकाळातील स्थिती प्रगतीचा विचार करू जाता पारंपरिक अशा मुद्रित साहित्याचाच पूर्ण पर्याय ठरू शकेल असे माध्यम निर्माण होण्याची शक्यता नाही.

या माहितीवितरणामध्ये ग्रंथालये व ग्रंथालय सेवक यांचे स्थान खूप महत्त्वाचे आहे. कागदविरहित समाज (paperless society) ही कल्पना भविष्याच्या सामाजिक स्थित्यंतराच्या संदर्भात समाजशास्त्रज्ञांना सुचत असली तरी कागदाचा , मुद्रणाचा वापर अटळ आहे व तिथवर ग्रंथालयाचे महत्व असेच टिकणार आहे. यामुळेच ग्रंथनिर्मितीचा व्यवसाय व या व्यवसायातील व्यावसायिक यांचा ग्रंथालयाशी असणारा संपर्क असाच राहणार आहे. व्यावसायिकांनी ग्रंथालयापर्यंत ग्रंथ उपलब्ध करून दिले व या ग्रंथांची ग्रंथालयांना कितीही गरज असली तरी या ग्रंथांचे मूल्य या घटकाचा ग्रंथालयांच्या खरेदीविषयक धोरणावर परिणाम होत असल्याने ग्रंथालयाला गरज असली तरी अनेक चांगले ग्रंथ घेता येत नाहीत. ग्रंथांची वाढती किंमत हा यामुळेच चिंतेचा विषय बनत चाललेला आहे. या वाढत्या किमतीमुळे व्यक्तिगतरीत्या ग्रंथ खरेदी करून वाचणाऱ्या किंवा त्यांचा संग्रह करणाऱ्या वाचकांच्या व संग्राहकांच्या विकत घेण्याच्या क्षमतांवर मर्यादा वाढत चाललेल्या आहेत. यामुळे ग्रंथव्यावसायिकांना प्रामुख्याने ग्रंथालयांच्या बाजारपेठेवरच अवलंबून राहणे अपरिहार्य ठरत चालले आहे. एखादा ग्रंथ प्रकाशित करताना आपल्या परिसरातील किती ग्रंथालयांपर्यंत आपण पोहोचणे शक्य आहे, त्यातील कितीजण विकत घेण्याची शक्यता आहे याचे हिशेब मांडून मगच प्रकाशनाचे गणित ठरवतात.

अनेक कारणांमुळे ग्रंथांच्या किमतींत होणारी वाढ व ग्रंथालयांच्या आर्थिक तरतुदीमध्ये होणारी वाढ यांच्यातील प्रमाण बरेच व्यस्त होत चालले आहे. जगभर वाढत जाणाऱ्या महागाईचा प्रश्न हा त्यामागील एक कारण आहेच. चारपाच वर्षांपूर्वी ग्रंथांची असणारी किंमत आज तीन ते चार पटीने वाढलेली असते, त्या मानाने ग्रंथालयांच्या आर्थिक तरतुदीमध्ये वाढ होत नाही.

केवळ ग्रंथांच्याच किमती वाढत असे नाही, तर मुद्रित स्वरूपात सहज उपलब्ध असावीत अशी नियतकालिकेही वर्गणीच्या दरात वाढ केल्याशिवाय प्रकाशित करणे शक्य उरलेले नाही. महाराष्ट्रातील महाविद्यालयांना दिले जाणारे तीन हजार रुपये वार्षिक अनुदान गेली कित्येक वर्षे तसेच आहे पण याच दरम्यान नियतकालिकांच्या किमती मात्र कल्पनातीत वाढल्या आहेत, हे उदाहरण या संदर्भात लक्षात घ्यावे असे आहे. त्यामुळे वर्गणी पाठवून पूर्वी अनेक चांगली नियतकालिके घेणे शक्य होते, या शक्यता कमी होत चालल्या आहेत. याचा परिणाम माहितीसेवेवर होत आहे. अद्ययावत् माहिती पुरवण्यासाठी नियतकालिक हे उत्तम संदर्भ माध्यम असते, परंतु आता ही सेवा देणे कठीण होत चालले आहे.

ग्रंथांच्या वाढत्या किमती हा जगभरातील प्रश्न आहे. सर्वसाधारणतः अभ्यासास उपयुक्त, माहितीपूर्ण अशा ग्रंथाची किंमत सुमारे (१५० ते २०० पृष्ठे) ३५० ते ४०० रुपयाच्या घरात आज पडते. याचा अर्थ ढोबळ मानाने २रुपये एका कागदासाठी मोजावे लागतात. ग्रंथ तयार करण्यासाठी लागणारे साहित्य व यात गुंतलेले मनुष्यबळ यांची वाढत जाणारी किंमत ही ग्रंथाच्या वाढीव किमतीत परावर्तित झालेली असते. कागद, मुद्रण, तंत्रे या सर्व निर्मितीतील घटकांबरोबरच ग्रंथवितरणासाठी असणारे विक्रीचे तंत्रही भाववाढीस जबाबदार असते. या वितरणाच्या साखळीत प्रकाशकाकडून ग्रंथ घाऊक विक्रेत्याकडे येणे, त्याच्याकडून किरकोळ विक्रेत्यापर्यंत येणे या प्रत्येक टप्प्यातील व्यावसायिकांचा टक्केवारीत मोजला जाणारा नफा, ग्रंथाच्या जाहिरातीसाठी केला जाणारा खर्च, व्यवसाय आस्थापनास लागणारा खर्च इ. अनेक घटक ग्रंथाच्या किमतीवर परिणाम घडवीत असतात. आणि किंमत जितकी जास्त तितकी ग्रंथ पोहोचण्याची शक्यता कमी होत जाते. याशिवाय दूरदर्शनसारख्या चुकीच्या पद्धतीने वापरल्या जाणाऱ्या माध्यमाचे अवाजावी आकर्षण, शहरी जीवनातील वाढते ताणतणाव यातून कमी होत जाणारी वाचनक्षमता हा घटकही ग्रंथांच्या किंमतीत होणाऱ्या वाढीस जबाबदार असणाऱ्या कारणांचा विचार करता लक्षात घ्यावा लागतो.

जे राष्ट्र वाचन करते ते संपूर्ण जगाला नेतृत्व देण्यास समर्थ असते. परंतु ग्रंथांच्या किंमतीतील उपरनिर्दिष्ट वाढ वाचनक्षमतांचा विकास घडविण्याऐवजी त्या भकास करीत चाललेली आहे. अशा वाचनक्षमतांचा विकास घडवावा अशी अपेक्षा ज्या ग्रंथालयांकडून आपण॰ करतो, ती ग्रंथालयेही अपेक्षा पूर्ण करण्यास असमर्थ ठरत चाललेली दिसतात. वाचनक्षमता कमी होत जाणे यासारखा लोकशाही देशाला दुसरा धोका नाही.

**समस्येवर तोडगा-काही विचार.**

ग्रंथपाल म्हणून काम करीत असताना या समस्येवर तोडगा काय असू शकेल याचा माझ्यापुरता निरीक्षणातून मी नेहमीच विचार करीत असतो. ही समस्या इतकी गुंतागुंतीची आहे की हिच्यावर कोणताही एक तोडगा नाही. अनेक प्रकारचे उपाय योजणे, निदान त्या दिशेने प्रामाणिक प्रयत्न करणे हे एकूण ग्रंथविश्वाशी संबंधित घटकांना शक्य आहे. मुळात सर्वच स्तरांवर असणारी ग्रंथालयांविषयीची उदासीन वृत्ती टाकून देऊन सर्व प्रकारच्या ग्रंथालयांकरिता विकास निधी व इमारत (इमारती!) निदान पुरेशी मोठी प्रशस्त जागा उपलब्ध करून देण्याची गरज आहे. ग्रंथालयांनी आपण देत असलेल्या माहितीसेवा व इतर पारंपारिक सेवाही अधिक वाचकाभिमुख करण्याची गरज आहे. याकरिता एकूणच समाजात सर्व प्रकारच्या ग्रंथालयांसाठी दहा ते पंधरा वर्षांकरिता शिस्तबद्ध कार्यक्रमांची आखणी झाली पाहिजे. ती अमलात आणली गेली पाहिजे. बहुसंख्य ग्रंथालये वस्तु संग्रहालयाप्रमाणे केवळ शोभेची बाब ठरत चालली आहेत. यातच संगणक हा प्रतिष्ठेचा (आवश्यकतेपेक्षा !) विषय केला जात आहे. याचे मूलभूत कारण आमच्याकडील शालेय शिक्षणात असल्याचे मला जाणवते. ते म्हणजे आमच्या शिक्षणातून Library mind तयारच होत नाही. याचाच परिपाक सामाजिक स्तरावरही होऊन ग्रंथालये हा उपेक्षेचा विषय ठरत जातो.

आपल्या देशाच्या संदर्भात बोलावयाचे झाल्यास भारतीय प्रकाशकांनी (प्रकाशकांच्या संघटनांनी) महत्त्वाच्या अशा ग्रंथांचे हक्क आंतरराष्ट्रीय प्रकाशन संस्थांकडून विकत घेण्याच्या योजना प्रभावीपणे अमलात आणल्या पाहिजेत. माहिती प्राप्त करणे हा लोकशाही राज्यातील नागरिकांच्या मूलभूत हक्कांपैकी एक हक्क आहे. त्यामुळे माहिती सहजपणे व योग्य त्या दरात उपलब्ध होणे व त्यासाठी शासनाने आपली जबाबदारी उचलणे आवश्यक आहे. कागदाची वाढती किंमत ही सर्व जगापुढील समस्या आहे. त्यामुळे कागद या

माध्यमास बाजवी, पर्यायी माध्यम तयार करण्याच्या संशोधनाची गरज आहे. प्रकाशकांच्या आंतरराष्ट्रीय संघटनांनी Third world countries करिता स्वस्तात उपलब्ध होतील अशा ग्रंथांच्या निर्मितीसाठी विशेष कार्यक्रम राबविल्यास वाढत्या किंमतींना काही प्रमाणात आळा घालता येईल. पूर्वी ELBS च्या काही प्रकाशकांच्या सहाय्याने तयार केलेल्या low priced editions, उपलब्ध होत्या. आता अशा low priced editions, student's edition आवृत्त्या निघत नाहीत.

ग्रंथ हा जर माहिती वितरित करणे, उपलब्ध होणे या प्रक्रियेमधील महत्त्वाचे माध्यम असेल व माहिती मिळविणे हा लोकशाही राज्यपद्धतीत राहणाऱ्या नागरिकाचा मूलभूत हक्क असेल तर वाचक ग्रंथापासून किंमत या घटकामुळे दूर रहाणे अत्यंत अयोग्य आहे. नाही तर याच पद्धतीने ग्रंथांच्या किमती वाढत राहिल्या व ग्रंथालयांच्या खरेदीविषयक धोरणांचीही पुनर्विचार न झाल्यास समाजशास्त्रज्ञांनी भाकीत केलेला कागदविरहित समाज (paperless society) अस्तित्वात येण्यास वेळ लागणार नाही. मात्र अशा समाजातील लोकशाही नागरिकाला या समाजातील माहितीचे माध्यम, साधने असणाऱ्या व्यवस्थांच्या किमती येती काही वर्षे तरी परवडणार नाहीत. शिवाय ग्रंथाच्या वाचनाचे समाधान या माध्यमांतून मिळणेही अवघड आहे!

• • •

(पान क्र. २६ वरून)


**'अमर्त्यसेनच्या निमित्ताने'**

रिलिजन ज्यांना समजला त्यांना धर्म समजला नाही. राजधर्म, अर्थधर्म, चार पुरुषार्थ हा धर्म (धर्म, अर्थ, काम, मोक्ष) हे ही काय हे उमजले नाही.

अर्थशास्त्र व नीती ह्यांची सांगड घालणे स्तुत्य असले तरी त्यांचे नातेसंबंध हे फक्त दोघांपुरतेच नव्हे तर सर्व विश्वव्यापार, विश्वधर्म, जीवनधर्माशी बांधले आहेत. धर्माधिष्ठित आहेत. वैश्विक सत्यदर्शन व त्यावर बांधलेल्या समाजावर, संस्कारावर, श्रद्धेवर, जीवनशैलीवर बांधलेले आहेत! त्यांची फक्त मर्त्य दर्शने अमर्त्य सेन यांनी मांडावीत पण ती तोकडी व अपूर्ण आहेत. जगाला आज एक संपूर्ण धार्मिक अर्थशास्त्र हवे आहे आणि ते फक्त भारतीय दर्शनातूनच उपलब्ध होईल. त्याला पूरक अशी राजसत्ता सुद्धा ह्याच भूमीतून आकारते असे भविष्य आमच्या थोर द्रष्ट्यांनी केव्हाच दिले आहे. ते पूर्ण आकारावे हाच आपला प्रयत्न असला पाहिजे!

• • •

*With Best Compliments From*



# STOP-N-SEE

**Gifts Collection**

1, Ram Gumpha, Lowar Aali, Chendni, Thane (West).
Tel.: 533 5823

# अत्तराच्या सुगंधात न्हालेले दिवस

प्रा. मोहन पाठक

सप्टेंबर महिन्याची सुरुवात महाविद्यालयात झाली ती प्राध्यापकांच्या संपाच्या छायेतच ! ११ ऑगष्टपासून पदवी महाविद्यालयातील प्राध्यापक संपावर असल्याने विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या नुकसानाची चिंता खुद्द प्राध्यापक मंडळीही खाजगीत व्यक्त करीत होती. पण सहा सप्टेंबर उजाडता व पाच तारखेला संप मिटण्याच्या शक्यता वर्तविल्या जात होत्या त्या खऱ्या ठरल्या सात तारखेपासून महाविद्यालयाचा परिसर पुन्हा एकदा कात टाकून गजबजून गेला.

दरम्यान महाविद्यालय परिसरातील पाचही ग्रंथालयांचा संगणकीकरण करणाऱ्या दृष्टीने एक सप्टेंबर पासून प्रत्यक्षात कामाला सुरूवात झाली. डॉ. विजय बेडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली ऑगष्टमध्ये झालेल्या अर्ध दिवसीय कार्यशाळेत या प्रकल्पाचे औपचारिक उद्‌घाटन झाले होते. या महत्त्वाकांक्षी अशा प्रकल्पाची ओळख करून देण्यासाठी वेगळा लेख मी देत आहे.

सात सप्टेंबरला महाविद्यालय सुरू झाल्याने पाच सप्टेंबर या शिक्षकदिनाच्या कार्यक्रमाची उणीव कला वाणिज्य महाविद्यालयातील गणेश खराडेला जाणवत होतीच. त्याने बि लेटेड शिक्षक दिन साजरा करून शिक्षकांप्रती असणारी कृतज्ञतेची भावना मित्रांसह व्यक्त केली. या निमित्ताने झालेल्या अनौपचारिक कार्यक्रमाची सुरुवात ईशस्तवनाने झाली. महाविद्यालयाचा सचिव सचिन ससाणे याने प्राचार्यांचा, तर इतर विद्यार्थी प्रतिनिधींनी उपस्थित शिक्षकांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. शिक्षकांच्या वतीने बोलताना प्राचार्य स.वा. गोखले म्हणाले, '' आम्ही शिक्षक विद्यार्थ्यांचे सदैव हितच चिंतीत असतो. संपामुळे विद्यार्थ्यांनाही चुकल्याचुकल्यासारखे वाटत होते. आज महाविद्यालय परिसरात विद्यार्थी मोठ्या संख्येने आले. त्यांची ही गर्दी त्यांच्या शिक्षणावरील प्रेमाचे प्रतीक आहे.''



**५ सप्टेंबर शिक्षक दिना निमित्ताने ७ सप्टेंबर रोजी झालेल्या कार्यक्रमात कथाकथन करताना.**

या समारंभात गणेश खराडे याने विनोदी कथा कथनकरून आगळीच रंगत आणली. शेवटी विद्यार्थिनी प्रतिनिधी कु. किरण कपटा हिने आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन कु. अर्चना पैठणकर हिने केले.

संप मिटल्यामुळे विद्यार्थ्यांचे चेहरे आनंदात होते खरे, पण मनात टर्मिनलची भीती, दिवाळीची सुटी आता जाणार ही चिंता आणि अभ्यास भरून काढायची चिंता या सर्व भावनांचे चित्रही त्यांच्या चेहऱ्यावर उमटले होते. देशभर २६ दिवस चाललेला हा संप मिटला याचा प्राध्यापक वर्गासही आनंद वाटल्याचे दिसत होते.

**शालेय परिसरातील शिक्षक दिन**

'' गणेशभक्तीला वेगळे परिमाण लावून डोळस श्रद्धा ठेवून शिक्षकांनी आपला पेशा भक्तीने करावा.'' असे उद्‌गार प्रा. डॉ. सी.ग. देसाई यांनी विद्याप्रसारक मंडळाने आयोजित केलेल्या शिक्षकदिनाच्या समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना काढले. समारंभाची सुरुवात गणेशस्तवन व स्वागतगीताने झाली. त्याच वेळी

डॉ. राधाकृष्णन यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालण्यात आला. विद्याप्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष श्री.श्री.वि.करंदीकर यांनी आपल्या प्रास्ताविकात डॉ. राधाकृष्णन यांच्या कार्याचा थोडक्यात परिचय करून दिला. माध्यमिक विभागातील कलाशिक्षिका सौ. मंजिरी दांडेकर यांनी प्रमुख पाहुण्यांची ओळख करून दिली.




शिक्ष क दिनाच्या समारंभासाठी उपस्थित असणारे मान्यवर.

आदर्श शिक्षिका म्हणून जिल्हा परिषदेतर्फे निवड झाल्याबद्दल माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. शुभांगी गोहाड व २० वर्षे अध्यापकीय सेवा पूर्ण केल्याबद्दल सौ. अनुराधा खोपकर(माध्यमिक विभाग), श्रीमती वसुधा मोने (पूर्व प्राथमिक विभाग), सौ. मैत्रेयी शेवडे, सौ. सुलेखा लोंढे (इंग्रजी माध्यम) यांचा गौरव करण्यात आला. कै. सौ. सुमतीबाई टिल्लू यांच्या स्मरणार्थ मंडळाचे कार्यवाह श्री. अ.धों. टिल्लू यांच्यातर्फे दिला जाणारा आदर्श शिक्षक पुरस्कार श्री. सुहास साठे यांना जाहीर करण्यात आला.

समारंभाचे अध्यक्षस्थान आमच्या मंडळाचे अध्यक्ष डॉ. वा. ना. बेडेकर यांनी भूषविले होते. आपल्या समारोपाच्या भाषणात ते म्हणाले, " खऱ्या परमेश्वराचा वास कोठे असल्यास मला पहावयाचे आहे. कारण परमेश्वर आता फार वेगळ्या स्वरूपात दिसत आहे." या प्रसंगी आभारप्रदर्शनापूर्वी बोलताना श्री. अ.धो. टिल्लू म्हणाले, " पाच सप्टेंबर हा विचारमंथनात व्यतीत करायचा दिवस आहे. एका थोर शिक्षकाच्या स्मृतीस उजाळा देवून त्यातून स्फूर्ती व प्रेरणा घेण्याचा , अंतर्मुख होण्याचा दिवस आहे. आपल्यातील उणेपणावर मात करून मी आदर्श शिक्षक होईन अशी शपथ शिक्षकांनी घेण्याचा हा दिवस आहे. " श्री. टिल्लू सरांनी आभारप्रदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सौ. सुनीता देशपांडे यांनी केले. समारंभास विद्याप्रसारक मंडळाचे कार्यकारी सदस्य, तीनही शाळांचे मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रीती-प्रिया निमकर भगिनींनी पसायदान सादर करून कार्यक्रमाची सांगता केली.

## सणांच्या उत्सवातून संस्कार



नागपंचमी

आमच्या मंडळाच्या प्राथमिक विभागाचे काही वैशिष्ट्यपूर्ण कार्यक्रम असतात. शैक्षणिक वर्षातील सत्र म्हणजे 'आला श्रावणाचा पोळा । सण होती सारे गोळा' अशा सणावारांनी गजबजलेलेच असते. त्यातून आमच्या छोट्या मुलांच्या शाळेत तर संस्काराचे महत्त्व जाणून अनेक सण अतिशय आनंदाने साजरे करण्याची परंपराच आहे. आषाढी एकादशी, व्यास पौर्णिमा, दीप पूजन, नागपंचमी, श्रावणी सोमवार व शुक्रवार, दही हंडी असे विविध सण साजरे केले जातात. यात लहान मुले, त्यांचे पालक या सर्वांचा मोठा सहभाग असतो. फक्त उत्सवच नाही, तर त्यांच्या माध्यमातून संस्कृतीची माहिती विद्यार्थ्यांना करवून देऊन संस्कार केले जातात. या सर्व सणांच्या कार्यक्रमांसाठी

शाळेतील सर्व शिक्षिका अपार मेहनत घेतात. विद्याप्रसारक मंडळाचे सर्व सहकार्य, मार्गदर्शन यासाठी शाळेला मिळते. या सणांतून सर्व घटकांत आत्मीयता निर्माण होते, प्रेम वृद्धिंगत होते.

### गोहाडबाईंचा गौरव

५ सप्टेंबर या शिक्षकदिनाच्या निमित्ताने आदर्श शिक्षक पुरस्कार घोषित करण्याची जिल्हा परिषदेची जुनी परंपरा. या पुरस्कारासाठी आमच्या संस्थेच्या माध्यमिक विभागात गणिताचे अध्यापन करणाऱ्या शाळेच्या उपमुख्याध्यापिका सौ. शुभांगी गोहाड यांची निवड झाली ही आमच्या आनंदाची व अभिमानाची घटना आहे. श्रीमती सुमतीबाई टिळू पुरस्कार, ब्राह्मण सेवा संघाचा आदर्श पुरस्कार मिळविणाऱ्या गोहाडबाईंचे या जिल्हा स्तरावरील मोठ्या पुरस्काराबद्दल ' दिशा' तर्फे हार्दिक अभिनंदन !

गेली ३१ वर्षे शाळेत अध्यापन करणाऱ्या गोहाडबाईंचा गणित हा अध्यापन विषय ! या विषयाशी त्या इतक्या एकरूप झालेल्या आहेत की गणित म्हणजे गोहाडबाई हे समीकरण अनेक पिढ्यांच्या मनात रुतले आहे. सतत हसतमुख, वक्तशीर, कष्टाळ अशा गोहाड बाईंचा परिचय त्याच दिवशीच्या 'सन्मित्र' या स्थानिक दैनिकात आलेला आहे.

### व्हॅलेंटिनो संस्थेत एक संध्याकाळ


ठाणे शहर सर्व दिशांनी पसरत चालले आहे. ठाण्यात रोज नवीन काही तरी घडतच असते. ठाणे पूर्व परिसर तसा आम्हाला, म्हणजे ठाणे पश्चिम मध्ये वावर असणाऱ्यांना नवखाच वाटतो. या पूर्व ठाण्यात व्हॅलेंटिनो नावाची सर्व प्रकारचे कलाशिक्षण देणारी एक मोठी संस्था आहे हे तसे माहीत होण्याचे तसे कारण नव्हते.

पण आमच्या माध्यमिक विभागाच्या शाळेतील कलाशिक्षक सौ. मंजिरी दांडेकर व विलास कोळी सर यांच्यामुळे हा योग आला. टाईम्स ठाणे प्लस पुरवणी व व्हॅलेंटिनो यांच्या संयुक्त विद्यमाने आमच्या शाळेतील या दोन गुणी शिक्षकांचे कलाप्रदर्शन ८ ते १३ सप्टेंबर या व्हॅलेंटिनो संस्थेत आयोजित केले गेले. त्याच्या उद्घाटनाची ही संध्याकाळ होती. प्रदर्शनाचे उद्घाटन रहेजा स्कूल ऑफ आर्ट्स्चे प्रा. जी.सी. वॉकर यांच्या हस्ते झाले. या उद्घाटनाच्या कार्यक्रमास डॉ. बेडेकर विद्यामंदिराचे मुख्याध्यापक श्री. अ. सहस्रबुद्धे, व्हॅलेंटिनोचे प्राचार्य श्री. लवाटे, चित्रकार श्री. शांताराम राऊत, व्ही. सित्ररकर आदी मान्यवर उपस्थित होते.

सौ. मंजिरी दांडेकर यांच्या चित्रांची प्रदर्शने यापूर्वी अनेक ठिकाणी झालेली आहेत. ठाणे, पुणे, मुंबई, हैद्राबाद इ. ठिकाणी रांगोळी प्रदर्शनातही त्यांचा सहभाग होता. चित्रकले बरोबरच निबंधलेखन, नाटकलेखन, दिग्दर्शन हा क्षेत्रात त्यांना अनेक पारितोषिके मिळाली आहेत. तर विलास कोळी यांनाही कलेचे अध्यापन करीत असतानाच छंद जोपासले आहेत. आमच्या संस्थेच्या शाळेतील शिक्षकांना चित्रे प्रदर्शित करण्याचा बहुमान मिळावा ही घटना आनंददायी आहे.

### महाविद्यालयीन प्राध्यापकांचे योगदान

ठाणे महाविद्यालय या नावाने ओळखल्या जाणाऱ्या परिसरातील अनेक प्राध्यापक समाजात सातत्याने मिसळत असतात. विविध क्षेत्रात लेखन, व्याख्याने यांच्या माध्यमातून स्वतःबरोबरच महाविद्यालयाचा लौकिक वाढवीत असतात. त्यांच्या या बाहेरील विधायक कामांची सांस्कृतिक, शैक्षणिक, सामाजिक कार्यक्रमांतील सहभागाची माहिती 'दिशा'च्या वाचकांना होणे महत्त्वाचे आहे. महाविद्यालयातील विविध घटकांचे यश, कार्य हेच महाविद्यालयातील परंपरेला मोठे करीत असते.



प्रा. मोझेस कोलट

आमच्या बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातील एन्.सी.सी. चे कंपनी कमांडर व वनस्पतिशास्त्र विभागातील प्रा. मोझेस कोलेट यांची दिल्ली येथील एन्.सी.सी. चे डायरेक्टर जनरल श्री. मलिक यांनी उत्कृष्ट अधिकारी म्हणून निवड केली. अशी निवड होणे ही दुर्मिळ संधी आहे. महाविद्यालय परिसरातील, या गौरवास पात्र होणारे प्रा. कोलेट हे पहिले एन्.सी.सी. अधिकारी आहेत.

या संदर्भात मुंबई येथे एन्.सी.सी. कार्यालयात झालेल्या एका समारंभात प्रा. मोझेस कोलेट यांचा रोख पारितोषिक देऊन श्री. मलिक यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. प्रा. मोझेस कोलेट मायकॉलॉजी या वनस्पतिशास्त्र या विषयाच्या शाखेत पी एच्.डी. करीत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली गेली ३ वर्षे सातत्याने आमच्या महाविद्यालयातील विद्यार्थी प्रजासत्ताकदिनाच्या दिल्ली येथे होणाऱ्या संचालनात सहभागी होत आहेत. सातत्याने ३ वर्षे विद्यार्थी निवडले जाणे हे दुर्मिळ यश होय !

आमच्या बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या पदार्थ-विज्ञान विभागातील डॉ. मनोहर न्यायते यांनी मुंबई सायन्स सेंटरच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'क्वाण्टम फिजिक्स' कार्यशाळेत सहभाग घेतला. या कार्यशाळेत " Magnetic Probe in Sollid Physics" या विषयावर त्यांनी शोध निबंध सादर केला. मुंबईच्या इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स या संस्थेत सदर कार्यशाळा संपन्न झाली.

कला वाणिज्य महाविद्यालयातील मराठी विभागाचे प्रमुख व साहित्यिक प्रा. दामोदर मोरे अनेक सभासंमेलनांमध्ये सहभागी होत असतात. अलीकडेच गुरव समाजाने ठाण्यात आयोजित केलेल्या एका पारितोषिक वितरण समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते गेले होते. 'समाजरूपी नौका जर प्रगतीच्या प्रकाशाकडे जायची असेल तर तिला तत्त्वज्ञानरूपी होकायंत्राची गरज असते.' या विचार सूत्राच्या आधारे त्यांनी या समारंभात मार्गदर्शन केले. प्रा. मोरे विद्यानगरी येथील महिला मंडळाच्या कार्यक्रमातही प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. प्रज्ञा या विषयावरील चिंतन त्यांनी व्याख्यानरूपाने मांडले. भारतीय जनभाषा प्रचार समिती, जनभाषा पुस्तकालय आणि अखिल भारतीय साहित्य परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने भांडुप येथे साजऱ्या करण्यात आलेल्या हिंदीदिनाच्या कविसंमेलनाचे अध्यक्षपद प्रा. मोरे यांनी भूषविले. आपल्या हिंदी व मराठी कविता त्यांनी सादर केल्या. सदर संमेलनात हिंदीतील अनेक मान्यवर कवी उपस्थित होते.

**कला वाणिज्य महाविद्यालयातील कार्यक्रम**

कला वाणिज्य महाविद्यालयातील वाङ्मय मंडळाने विभागाच्या वतीने हिंदी दिवसाच्या निमित्ताने एक आगळे वेगळे कविसंमेलन आयोजित केले. या बहुभाषी कविसंमेलनाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य प्रा. शोभा दोशी होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून झुनझुनवाला महाविद्यालयाचे हिंदी विभागाचे प्राध्यापक इंद्रबहादुर सिंग उपस्थित होते. या संमेलनात हिंदीतील नामवंत कवी नादान, कवी रघवंशी यांचीही उपस्थिती होती. कनिष्ठ महाविद्यालय उपप्राचार्य प्रा. श्रीमती पिंगे यांही आवर्जुन उपस्थित होत्या.

संमेलनाचे प्रास्ताविक करणाऱ्या मराठी विभाग प्रमुख प्रा. मोरे यांनी बहुभाषी कविसंमेलनामागील भूमिका स्पष्ट केली. तर प्रमुख पाहुणे श्री. इंद्रबहादुर सिंग यांनी हिंदी भाषेचे महत्त्व सांगताना ती देशभाषा, जनभाषा असल्याचे सांगितले.

या संमेलनात विद्यार्थ्यांमधील कवींप्रमाणेच प्रा. मोरे, प्रा. भिडे, प्रा. संतोष राणे, प्रा. मोहन पाठक आदी कवींनीही आपल्या हिंदी मराठी व इंग्रजी कविता सादर केल्या. विद्यार्थ्यांचा उत्साह व काव्यविषयक जाण, रसिकता यांचा वेगळा अविष्कार या निमित्ताने अनुभवण्यास मिळाला.

संपापूर्वीच्या वर्षाच्या सुरुवातीस कला विभाग व वाङ्मय मंडळाच्या उद्घाटनाचा सोहोळा संस्थेच्या थोरले बाजीराव पेशवे सभागृहात संपन्न झाला. या समारंभातच 'स्फूर्ति' या विद्यार्थ्यांच्या साहित्य निर्मितीचे प्रकाशन ही झाले. या वेळी अभिनेत्री कविता लाड उपस्थित होत्या. कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्य श्रीमती पिंगे यांनी विद्यार्थिनी म्हणून कविता लाड यांचा परिचय करून दिला.

प्रा. गौरी तिरमारे व प्रा. शैलजा नायर यांनी अनुक्रमे कला व वाङ्मय मंडळाच्या आगामी कार्यक्रमांची माहिती देऊन या उपक्रमांचे महत्त्व विशद केले.



अभिनेत्री कविता लाड दीपप्रज्ज्वलनाने उद्घाटन करताना.

याच महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी असणाऱ्या कविता लाड यांनी आपल्या जडणघडणीचे श्रेय महाविद्यालयास असल्याचे सांगून अभिनय क्षेत्रात नशिबाबरोबरच संधी आणि प्रयत्न यांचे असणारे महत्त्व स्पष्ट केले. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांस त्यांनी मोकळेपणाने उत्तरे दिली. या घरगुती व अनौपचारिक कार्यक्रमात बोलताना प्राचार्य स.वा. गोखले यांनी अभिनय क्षेत्रातील प्रगतीबद्दल कविता लाड यांचे कौतुक केले. कला, गुण असणाऱ्या विद्यार्थ्यांना महाविद्यालय नेहमीच संधी देत असते व त्यांचे व्यक्तिमत्त्व विकसित झालेले पाहण्यात आम्हाला धन्यता वाटते असेही त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. संगीता दीक्षित यांनी केले तर प्रा. प्रतिभा माथुर यांनी आभारप्रदर्शन केले.

### राष्ट्रीय सेवा योजना-विद्यार्थ्यांचे खरे शिक्षण

विद्यार्थ्यांना समाज सेवेचा अनुभव मिळण्याच्या दृष्टीने व त्यांना खरे शिक्षण मिळण्याच्या दृष्टीने एन्.एस्.एस्. हा उपक्रम उपयुक्त असतो. मे महिन्यात झालेले १० दिवसांचे नेतृत्वशिबिर, नागरी संरक्षण प्रकल्प अशा विविध उपक्रमांत अनेक विद्यार्थ्यांचा सहभाग होताच. पण याशिवाय अलीकडे झालेल्या नोंद घ्यावी अशा कार्यक्रमात ६ ऑगस्ट रोजी पाळण्यात आलेला शांतिदिन. जागतिक स्तरावर, हिरोशिमा नागासकी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांना या दिवशी श्रद्धांजली वाहण्यात येते. महाविद्यालयात या निमित्ताने झालेल्या कार्यक्रमास उपप्राचार्य प्रा. शोभा दोशी यांनी मार्गदर्शन केले. या दिवशी व ७ तारखेला नेतृत्वविकासशिबिराचेही आयोजन करण्यात आले. त्यात शहरातील जोशी बेडेकर, बांदोडकर, ज्ञानसाधना, के.बी., एन्.के टी. या पाच महाविद्यालयांतील १०० स्वयंसेवक सहभागी झाले होते.



पथनाटकातील एक दृश्य !

प्राध्यापकांच्या संपाच्या काळातही स्वयंसेवक उत्साहाने कार्यरत होते. १५ ऑगस्ट रोजी 'रंग' हा नाट्याविष्कार सादर करण्यात आला. तर १६ तारखेस स्वयंसेवकांनीच स्वयंसेवकांसाठी एका नेतृत्वशिबिराचे आयोजन केले होते. दि. २१ ऑगस्ट पासून 'असा हा गणेशोत्सव' हे पथनाट्य ठाणे, उल्हासनगर, विठ्ठलवाडी आदी परिसरात ठाण्याच्या पोलीस आयुक्तालयाच्या सहकार्याने विद्यार्थ्यांनी सादर केले. या पथनाट्याचे लेखन महाविद्यालयाची राष्ट्रीय सेवा योजनेची सचिव कु. अर्चना शरद पैठणकर हिने केले तर दिग्दर्शन कु. वर्षा जाधव हिचे होते. कनिष्ठ महाविद्यालयाच्या पर्यवेक्षिका प्रा. अनघा देशपांडे यांनी यासाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले होते. ठाण्याचे पोलीस आयुक्त भुजंगराव मोहिते, प्रभाग क्र. १

च्या उपायुक्त सौ. अर्चना त्यागी-शर्मा यांच्या साहाय्याने या पथनाटकाचे हिंदुजा केबलवरून प्रक्षेपण केले गेले. विशेष म्हणजे पथ नाट्याच्या ३० चित्रफिती बनवून संपूर्ण महाराष्ट्रात त्या पाठविण्यात आल्या.

गणेश विसर्जन सोहोळ्यात दि. १ व ५ सप्टेंबर रोजी २१० स्वयंसेवकांनी 'पोलीस मित्र' म्हणून काम केले. यात काहीजणांना आयुक्तांतर्फे विशेष पोलिस अधिकारी म्हणून ओळखपत्रेही देण्यात आली. या सर्वकार्यक्रमांना प्राचार्य स.वा. गोखले व प्रा. यशंवतराव भिडे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले होते.

**बांदोडकर महाविद्यालय**

आमच्या बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातील प्रथम वर्ष कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या पालकांची सभा ८ सप्टेंबर रोजी पेशवे सभागृहात झाली. या सभेत सुमारे २०० पालक उपस्थित होते. पालकांच्या या सभेचे वैशिष्ट्य म्हणजे आपल्या पाल्याच्या प्रगतबद्दल असणारी जागृता होय!

या सभेचे प्रास्ताविक प्राचार्य सी. जी. पाटील यांनी केले. महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. मकरंद दीक्षित यांनी परीक्षापद्धतीसंबंधी पालकांना माहिती दिली. अनेक पालकांनी प्रश्न विचारले. त्यांना प्राचार्य सी.जी. पाटील यांनी माहितीपूर्ण उत्तरे दिली. काही पालकांनी उपयुक्त अशा सूचना केल्या. त्यांची नोंद सभेत घेतली गेली. अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात २ तास सभा झाली. पदवी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. सी.म. सारंग यांनी आभारप्रदर्शन केले.

**विधि महाविद्यालय**

विधि महाविद्यालयातील अनिलकुमार तुलसीराम यादव यांना 'पब्लिक इंटरनॅशनल लॉ' या तृतीय वर्ष स्तरावरील परीक्षेत सर्वाधिक गुण मिळाले. त्याबद्दल त्यांना 'दामोदर वाडेगावकर अंध संघटनेचे' १००० रु. चे पारितोषिक प्राप्त झाले. ही परीक्षा एप्रिल ९८ मध्ये झाली. श्री. यादव यांचे 'दिशा' तर्फे विशेष अभिनंदन.

तसेच विधि महाविद्यालयाच्या द्वितीय वर्षातील विद्यार्थी श्री. धनंजय भागवत व श्री. आनंद शिरगावकर यांना मुंबई विभागाच्या पंजाब नॅशनल बँकेने आयोजित केलेल्या प्रश्नमंजुषेत द्वितीय क्रमांक मिळाला. 'भारतीय स्वातंत्र्याची ५० वर्षे' या विषयावरील या स्पर्धेत याच वर्गातील श्री. गिरीश चौधरी यांना तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. हार्दिक अभिनंदन!

**तंत्रनिकेतन**

आमच्या तंत्रनिकेतनातील आय.एस्.टी.ई. स्टुडण्टस् चॅप्टर चा शुभारंभ दि. ११ सप्टेंबर रोजी पेशवे सभागृहात झाला. या प्रसंगी भगुबाई तंत्रनिकेतनचे ज्येष्ठ प्राध्यापक श्री. सी.सी. जुनेजा उपस्थित होते. समारंभाचे अध्यक्षस्थान विद्याप्रसारक मंडळाचे कार्यवाह श्री. अ.धो. टिल्लू यांनी भूषविले.

दीपज्ज्वलाने कार्यक्रमाची सुरुवात झाल्यावर प्राचार्य श्री. सी.श्री. मुजुमदार यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. ९७-९८ च्या परीक्षेत बोर्डाच्या गुणवत्ता यादीत आलेल्या दोन विद्यार्थ्यांचा पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या प्रकल्पाचा अनुभव असणारे प्रा. जुनेजा यांनी या प्रकल्पाचा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्यया दृष्टीने कसा फायदा होतो हे सांगितले. एखाद्या मोठ्या उद्योगसमूहात अधिकारी म्हणून काम करण्याच्या दृष्टीनेही हा प्रकल्प लाभदायक ठरणारा आहे असेही ते म्हणाले.

आपल्या अध्यक्षीयस्थानी भाषणात श्री. टिल्लू यांनी विद्याप्रसारक मंडळ विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकासासाठी झटणारी संस्था असल्याचे नमूद करून अलीकडेच उपलब्ध करून देण्यात आलेल्या इंटरनेट सेवेची माहिती देऊन या संधीचा फायदा विद्यार्थ्यांनी घ्यावा असे आवाहन श्री. टिल्लू यांनी केले.

या प्रकल्पाच्या कार्यवाह सौ. उषा राघवन व उपप्राचार्य डी.के. नायक यांचीही प्रसंगोचित भाषणे झाली. श्री. अमेय जोशी यांनी आभारप्रदर्शन केले.

### क्रीडांगणांवरील यश

कला,वाणिज्य महाविद्यालयातील हिमांशु ठकार, भूषण पैठणकर व सुमेध देवरुखकर यांनी राज्यस्तरीय खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत चँपियनशिप पटकावली.

हिमांशू कनिष्ठ गटातून (मुले) खेळताना एकेरी स्पर्धेत आमच्याच महाविद्यालयातील 'अमोघ कुलकर्णी बरोबर सरळ सामन्यात जिंकला. तसेच भूषण पैठणकर व हिमांशूने मुंबईच्या खेळाडूंचा पराभव करून दुहेरी स्पर्धेतही आपले वर्चस्व सिद्ध केले.



हिमांशु ठकार



सुमेध देवरुखकर

अकरावीतील सुमेधने ही सब ज्युनिअर स्पर्धेत (दुहेरी) स्टेट चँपियनशिपचा किताब मिळविला. या नवीन खेळाडूंचे प्राचार्य गोखले सरांनी अभिनंदन केले.

### लेखाव्यवसायासाठी माहिती तंत्रज्ञान

या विषयावरील एका अर्ध दिवसीय कार्यशाळेचे आयोजन रविवार दि. २० सप्टेंबर रोजी आमच्या विद्याप्रसारक मंडळाने केले होते. कार्यशाळेचे प्रास्ताविक करताना माहिती तंत्रज्ञानाच्या क्रांतीचा आपण अनुभव घेत असल्याचे सांगून डॉ. विजय बेडेकर या तंत्रज्ञानाच्या विकासाचा त्रोटक आढावा घेतला.

इंदिराजी विकास संशोधन संस्थेतील प्रा. डॉ. अजित रानडे, गुर्जर फडके, साहनी चार्टर्ड अकाउंटंट कंपनीचे श्री. एस्.जी. साहनी, व स्पक्ट्रम बिझिनेस स्पोर्ट कंपनीचे श्री. डी.वी. मोडक यांनी शोधनिबंध सादर करताना या विषयाच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकला.

आय.सी.ए.आय.चे माजी अध्यक्ष श्री. एम्.एम्. चितळे यांचे प्रमुख भाषण झाले. त्यांनी लेखाव्यवसायाच्या विविध अंगांचा परिचय करून देऊन स्वॉट ॲनालिसिसची गरज, या व्यवसायाचे भवितव्य इ. मुद्दे आपल्या भाषणात मांडले. कार्यशाळेचा समारोप उपस्थित व्यावसायिकांनी विचारलेल्या प्रश्नांवरील चर्चेने झाला.

### अमित भरम

हा मजकूर लिहून संपवता संपवता विधि महाविद्यालयाकडून आलेल्या बातमीनुसार प्रथम वर्ष विधि या वर्गातील अमित भरमने ९व्या राज्यस्तरीय ॲक्रोबॅटिक्स् चँपियनशिपमध्ये प्रथम क्रमांक संपादन केला. सांगली जिल्हा क्रीडा व ॲक्रोबॅटिक्स संघटनेने मिरज येथे २० सप्टेंबर रोजी ही स्पर्धा आयोजित केली होती. त्यात मेन्स् टम्बलिंग मध्ये अमितने हे यश संपादन केले. अमित आमच्या बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी आहे.


### आगामी चाहूल

दरम्यान कला वाणिज्य महाविद्यालयातून न मिळालेल्या नाटकासहच्या अनेक बातम्या, शाळेतल्या अनेक बातम्या मनाला चुटपुट लावीत आहेत. वारंवार 'दिशा'साठी आवाहन करण्याचे काम सदरातून करीत आहे. संकलन करण्याच्या दृष्टीने काम सुलभ व्हावे यासाठी हे आवाहन आहे...

तर आता ऑक्टोबरचे 'हीट' वारे वहायला लागतील. प्राध्यापकांच्या संपामुळे दिवाळीच्या सुट्या कमी झाल्या आहेत. विद्यार्थी दिवाळीच्या आगेमागे असणाऱ्या टर्मिनल्स् च्या टेन्शनमध्ये आहेत. प्रॉजेक्टसाठी धावपळ करीत आहेत. ग्रंथालयाचे उंबरठे मात्र चांगलेच झिजायला लागलेत. कारण या वर्षापासून प्रथम वर्षाला अनिवार्य करण्यात आलेल्या प्रॉजेक्ट वर्कने ग्रंथालयांना पर्याय नाही. ऑक्टोबरनंतर पुन्हा भेटू याच सदरात याच ठिकाणी ! नमस्कार !!

• • •

*With Best Compliments*
*From*



**SHAH BHARAT LALJI**

(मुखपृष्ठ २ वरून)

**संपादकीय**

बंदी घातली होती. साहजिकच हे सर्व वैज्ञानिक गोरे होते. आणि त्यामुळे त्यांचे मानव अधिकारही विशेष होते. दक्षिण आफ्रिकेतील वैज्ञानिकांचा तेथील सरकारच्या धोरणांशी काहीही संबंध नाही, आणि म्हणून अशा प्रकारे त्यांच्या हालचालींवर नियंत्रण आणले तर तो एक वंशभेदासारखाच प्रकार ठरेल, असा युक्तिवाद पाश्चात्य वैज्ञानीक करीत असत. १९९० मध्ये न्यूझीलंड येथील अशाच एका जागतिक वैज्ञानिक परिषदेमध्ये दक्षिण आफ्रिकी वैज्ञानिकांना प्रवेश देऊ नये म्हणून फैजी या भारतीय वैज्ञानिकाने आवाज उठविला होता. तेथे हजर असलेल्या २००० वैज्ञानिकांपैकी एकानेही फैजी यांना पाठिंबा दिला नाही उलट आंतरराष्ट्रीय वैज्ञानीक परीषदांमध्ये अशा प्रकारचे भेदभाव करणे किती चूक आहे असे डोस त्यांना पाजण्यात आले.

सर्व आंतरराष्ट्रीय वैज्ञानिक संस्थांची International Council of Scientific Union अशी एक संस्था आहे. जगातल्या बहुतेक राष्ट्रांच्या राष्ट्रीय वैज्ञानिक संस्था या संस्थेच्या सभासद आहेत. Indian National Science Academy ही भारताचे या संस्थेमध्ये प्रतिनिधीत्व करते. ही जागतिक संघटना वैज्ञानिकांच्या मुक्त प्रवेशाची हिरिरीने पुरस्कार करते, आणि अशा प्रकारे निर्बंध कोठे येत असतील तर हस्तक्षेप करते.

१९६३ सालच्या त्यांच्या सर्वसाधारण सभेमध्ये केवळ याच प्रश्नाकरिता म्हणून त्यांनी एका समितीचे गठन केले. विशेषतः शीत युद्धाच्या काळात, रशियन व इतर साम्यवादी देशांमधील वैज्ञानिकांच्या मुक्त प्रवासावर बाधा येत नाही ना याकडे या संघटनेचे लक्ष असे.

भारताच्या बाबतीत मात्र अजूनपर्यंत या संघटनेने विशेष दखल घेतलेली दिसत नाही. दक्षिण आफ्रिकेमध्ये जेव्हा वंशभेदी सरकार होते, तेव्हा भारतामध्ये होणाऱ्या एका आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये सहभागी होणाऱ्या एका दक्षिण आफ्रिकी वैज्ञानिकाला आपण वंशभेदाचा पुरस्कार करीत नाही असे लिहून देण्यास भारत सरकारने सांगितले होते अशी भूमीका घेतल्याबद्दल ICSV ने भारतीय वैज्ञानिकांवर कडाडून हल्ला केला होता. या जागतिक संस्थांच्या दुटप्पी धोरणांची आणखी किती उदाहरणे पाहिजेत? दुर्दैवाने भारतीय वैज्ञानिक व वैज्ञानिक संघटनांनी पाहिजे तेवढा आवाज आज उठवलेला दिसत नाही. राष्ट्रीय हितापेक्षा उगीचच कशाला, अमेरिकेचा रोष ओढवून घ्या, हीच भुमिका यामागे जास्त दिसते. या उलट अमेरिकेतील कांही स्वतंत्र वैज्ञानिकांनी मात्र कडाडून या घटनेचा विरोध केला आहे.

Committee of Concerned Scientists या अमेरिकेतील संघटनेने तावडतोब आपला निषेध पत्राद्वारे नोंदविला. NAS या संघटनेचे अध्यक्ष Bruce Alberts यांनी अमेरिकन अधीकाऱ्यांबरोबर चर्चा करून त्यांना जाब विचारावयास सुरुवात केली. अमेरिकेतील New York Academy of Science या प्रभावी संघटनेनेही आपला विरोध तात्काळ नोंदविला. या संघटनेच्या वैज्ञानिकांच्या मानवी हक्क संघटनेच्या शाखेचे अध्यक्ष Joseph Burman यांनी एक पत्र Bill clinton यांना लिहिले व त्याच्या प्रती संबंधित सर्व अमेरिकेतील संस्थांना पाठविल्या.

मानवी अधिकार, पर्यावरण आणि जागतिक शांतता या गोष्टी कितीही चांगल्या असल्या तरी राजकारणाने प्रेरित होऊन त्यांचा वापर करणे हिताचे नाही. अमेरिका व चीनची मैत्री आणि धोरणे यापेक्षा वेगळे काहीही दाखवत नाही. दुबळा हा फक्त दयेला पात्र असतो. तो शांततेचा अधिकारी कधीही नसतो. दुर्दैवाने या देशामध्ये राष्ट्रीय अस्मिते पेक्षा भोंगळ मानवतावादाचे गुऱ्हाळ लावणाऱ्या वैज्ञानिक व तत्त्ववेत्यांची गर्दी झाली आहे. त्यांची संख्या जेवढी वाढत आहे तेवढा हा देश अधिक दुबळा होत आहे. जनतेनी अशा बोलघेवड्या आणि धोकादायक वैज्ञानिकांपासून सावध असायला हवे. विज्ञानापेक्षा अशा वैज्ञानिकांची नाळ ही सिद्धांतवादाला जोडलेली असते. प्रत्यक्ष शत्रूपेक्षाही जास्त धोका देशाला अशा 'रजकिय' वैज्ञानिकांकडून असतो.

• • •

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

## थोरले बाजीराव पेशवे सभागृह

३०० आसने, आधुनिक दृक्‌श्राव्य यंत्रणा उपलब्ध,
प्रसन्न वातावरण, उपाहाराची व्यवस्था,
वहाने उभी करण्यासाठी प्रशस्थ जागा.

संपर्क

कार्यवाह,
विद्याप्रसारक मंडळ, ठाणे
दूरध्वनी : ५४२ ६२७०